जून २०२३/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## सर्वांसाठी शिक्षण-प्रशिक्षण
## सदैव अग्रेसर शासन

आज़ादी का अमृत महोत्सव | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | G20 भारत 2023 INDIA



**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# योजना कल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारी!




## अंमलबजावणी वेगवान

## अभियानाची वैशिष्ट्ये

प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५००० लाभार्थ्यांना एकाच छताखाली लाभ देण्यात येणार

शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ, कमीतकमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी

पहिल्यांदाच सर्व प्रशासन 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून प्रत्येकाला योजनांची माहिती देणार



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

# अंतरंग

## ६ विद्यार्थी हाच केंद्रबिंदू

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यामुळे विद्यार्थी केंद्रबिंदू मानून दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शिक्षण हा शासनाचा प्राधान्याचा विषय असून गुणवत्ता वाढ होण्यासाठी पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने मिशन मोडवर काम केले जात आहे.

## ८ ओबीसी : शिष्यवृत्ती योजना

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ९ मार्च २०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये 'इतर मागास बहुजन कल्याण' या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

## १२ रोजगार उपलब्धतेवर भर

भारताला जगाची मानवी संसाधन राजधानी बनवण्याच्या प्रधानमंत्री यांच्या दृष्टिक्षेपात योगदान देण्यासाठी सरकारने राज्यातील प्रत्येक नोकरीइच्छुक तरुण -तरुणींना उद्योजकता विकास कार्यक्रमांची सर्व माहिती मिळावी, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

## १६ सामाजिक न्याय विभागाच्या विविध शिष्यवृत्ती योजना

सामाजिक न्याय विभागामार्फत शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबवले जातात. राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष प्रवर्ग, दिव्यांग, निराश्रित इत्यादींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, विकासासाठी शासन जाणिवेने प्रयत्न करत आहे. जनजातीतील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर योजना राबवण्यात येतात.



## २० वृद्धी आणि विकास

भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व देण्यात येत आहे. देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. माहिती तंत्रज्ञान हे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे.

## २४ मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रांतील करिअर संधी

विद्यार्थी व पालकांनी करिअरसंबंधी निर्णय घेताना 'मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील संधी' व त्याचबरोबर आव्हाने यांचा सांगोपांग विचार करणे हितावह आहे. वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज आहे.

## २६ कृषी व्यावसायिक शिक्षण

सध्या भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. याचबरोबर, जागतिक लोकसंख्येतही वाढ होत आहे. या वाढत्या लोकसंख्येची गरज भागवण्यासाठी कृषी उत्पादनात अधिकाधिक वाढ करणे आवश्यक आहे.

## ५२ शासन आपल्या दारी

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आणि सेवांचा लाभ सर्वसामान्य जनतेला देण्यासाठी राज्यात सध्या 'शासन आपल्या दारी' अभियान सुरू आहे. १४ मे २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे शुभारंभ झालेल्या या अभियानामुळे आजपर्यंत राज्यातील सुमारे ३५ लाख लाभार्थ्यांना विविध लाभ मिळाले आहेत.


| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थी हाच केंद्रबिंदू | ६ | बहुजनांच्या विकासासाठी | ३० |
| ओबीसी : शिष्यवृत्ती योजना | ८ | 'सारथी'च्या विशेष योजना | ३२ |
| रोजगार उपलब्धतेवर भर | १२ | शैक्षणिक संस्थांची उपयुक्तता | ३४ |
| कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी | १५ | शिवराज्याभिषेक महोत्सव | ३६ |
| सामाजिक न्याय विभागाच्या | | तेजोमय शिवराज्याभिषेक | ३८ |
| विविध शिष्यवृत्ती योजना | १६ | मंत्रिमंडळात ठरले! | ४०-४६ |
| वृद्धी आणि विकास | २० | पेंच व्याघ्र प्रकल्प पर्यटकांना | |
| मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रांतील करिअर संधी | २४ | विशेष पर्वणीच! | ४७ |
| कृषी व्यावसायिक शिक्षण | २६ | लोकवाहिनी सक्षम | ५० |
| समता व सामाजिक न्याय | २८ | शासन आपल्या दारी | ५२-५९ |

वर्ष ७४ वे | अंक ८ | जून २०२३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

## ३५०व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त

# विशेष बोधचिन्हाचे लोकार्पण




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने विशेष बोधचिन्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी हे बोधचिन्ह वापरण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने हे बोधचिन्ह तयार करण्यात आले आहे.

शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५०व्या वर्ष सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनामनात व्हावा, जगभरात जिथे जिथे मराठी माणूस आहे, तिथे या कार्यक्रमांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार पोहोचावेत, यासाठी राज्य शासनाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्यासाठी खास हा लोगो (बोधचिन्ह) वापरण्यात येणार आहे.

शिवकालीन मंगल चिन्हे आणि महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणारे संदर्भ या बोधचिन्हाचे वैशिष्ट्य असून राज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे सुनील कदम यांनी हे बोधचिन्ह तयार केले आहे. जगातील कानाकोपऱ्यात राहणारा प्रत्येक शिवप्रेमी या माध्यमातून जोडला जावा आणि महाराजांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा राज्य शासनाचा संकल्प आहे.

# शिक्षण-प्रशिक्षणाने उजळणार वाटा...

आपल्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी तर मुलांसह, मुलीही शिकाव्यात, यासाठी टाकलेले क्रांतिकारी पाऊल अज्ञानाचे साखळदंड तोडणारे होते.

*'विद्येविना मती गेली,*
*मतीविना नीती गेली,*
*नीतिविना गती गेली,*
*गतिविना वित्त गेले,*
*वित्तविना शूद्र खचले,*
*इतके अनर्थ एका अविद्येने केले'*

शिक्षणापासून दूर राहिलेली प्रत्येक व्यक्ती अंधारात चाचपडत राहील असे महात्मा फुले यांना वाटायचे. सर्वच भारतीय महापुरुषांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्य आणि विचारांचा वारसा महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत जपला आहे. शिवाय तो आणखी गतीने व व्यापकपणे पुढे नेण्याचा प्रयत्नही केला जात आहे.



जगभरातील शिक्षण आता कूस बदलताना दिसत आहे, यात भारतदेखील मागे नाही. तसेच राज्य शासनसुद्धा शिक्षणाच्या वाटा अधिक सहजसोप्या करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

शिक्षण हे जीवन परिवर्तन, प्रगती अन् स्वप्नपूर्तीचे मोठे द्वार ठरले आहे. शिक्षणामुळे प्रवाहाबाहेरील घटक मुख्य प्रवाहात आले आणि याच घटकांसह शिक्षणातील धोरणात्मक बदलांसह शासन सर्वांसाठी काम करत आहे. शिक्षणाने अनेकांचे आयुष्य बदलून टाकल्याची अनंत उदाहरणे आपल्यासमोर आहेत. शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते. सर्जनशीलतेने तुमच्यात प्रगल्भ विचार येतात, विचाराने ज्ञान वाढते आणि ज्ञानाने माणूस महान बनतो, हा माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा विचार शिक्षणाबद्दलचे महत्त्व सांगणारा आहे.

शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, कौशल्य व रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण आदी विभागांच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या वैविध्यपूर्ण योजना, नवे बदल, प्रगती आणि त्यातून झालेल्या परिणामांकडे लक्ष वेधणारा 'लोकराज्य'चा शिक्षण-प्रशिक्षण विशेषांक आम्ही प्रकाशित करत आहोत. शिक्षणाने सुशिक्षित होता येते, पण गतिमान होण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, विविध प्रकारची कौशल्ये तितकीच महत्त्वाची आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे कोणाचे शिक्षण थांबू नये, यासाठी महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्ती तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजना; इतकेच नव्हे, तर बार्टी, महाज्योती, सारथी यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून विविध योजनांची उपलब्धता करून दिली आहे.

शिक्षणाच्या अनेक संधी असून त्यापैकी वैद्यकीय व पॅरामेडिकल शिक्षणाच्या उपलब्ध संधी, तद्वतच कृषी क्षेत्र व कौशल्याधारित शिक्षणाच्या संधींची इत्यंभूत माहिती या अंकातील विविध लेखांतून देण्यात आली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्ताने राज्य शासनाची वर्षभरातील कार्यक्रमांची आखणी यावरही प्रकाश टाकणारे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच 'शासन आपल्या दारी' या अभिनव उपक्रमाची माहिती देण्यात आली आहे. विद्यार्थी निपुण व्हावेत, हा शासनाचा उद्देश आहे. जगाशी स्पर्धा करताना अंगभूत कौशल्य मौलिक ठरावीत, शिक्षणासह प्रशिक्षणातून विविध कौशल्यदेखील तरुणांनी आत्मसात करावीत, यासाठी शासनाने विविध योजना हाती घेतल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या शैक्षणिक धोरणांमध्ये सर्वांगीण शिक्षण प्रणालीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

अज्ञानाला नेहमी अंधार हवा असतो, तर ज्ञान सतत प्रकाशाकडे जाते. येणाऱ्या नव्या पिढीने शिक्षणातून आणखी प्रगती साधावी, स्वतःला आणि समाजाला स्वयंप्रकाशित करावे, विविध आधुनिक कौशल्य आत्मसात करावीत, शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून हा विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे. 'लोकराज्य'चा हा शिक्षण-प्रशिक्षण विशेषांक निश्चितच आपल्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

**विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यामुळे विद्यार्थी केंद्रबिंदू मानून दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शिक्षण हा शासनाचा प्राधान्याचा विषय असून गुणवत्ता वाढ होण्यासाठी पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने मिशन मोडवर काम केले जात आहे.**

# विद्यार्थी हाच केंद्रबिंदू

**दीपक केसरकर,**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समिती गठित केली आहे. मातृभाषेतून शिक्षण अधिक परिणामकारक ठरत असल्याने विशेष प्रयत्न करण्यात येत असून बोलीभाषा संवर्धन तसेच इंग्रजी, विज्ञान, गणित या विषयांची आवड निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांमध्येही शिक्षण सुलभ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिला जात आहे. आपण इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झालो, आता इंग्रजीच्या आहारी जाणे थांबवावे लागणार आहे. विविध विकसित देशांमध्ये मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते, त्याचप्रमाणे भारतातदेखील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणाला अधिक महत्त्व दिले गेले आहे. विविध सकारात्मक निर्णय घेताना खासगी अनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. नवीन शाळांच्या मान्यतेसाठी ऑनलाइन प्रक्रिया राबवली जात असून स्वयंअर्थसाहाय्यित शाळांनाही मान्यता देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीतदेखील वाढ करण्यात आली आहे. आता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना ५,००० रुपये, तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना ७,५०० रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

## विविध उपक्रम

शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या मुलांच्या स्वागतासाठी 'पहिले पाऊल' उपक्रम राबवण्यात येत आहे. भारतीय संस्कृतीच्या एकत्र कुटुंब पद्धतीत आजी आजोबा हे आधारस्तंभ आहेत. त्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने १० सप्टेंबर रोजी सर्व शाळांमध्ये 'आजी आजोबा दिवस' साजरा करण्यात येणार आहे.



## अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद

राज्य शासन शिक्षकांच्या समस्या सोडवण्यालादेखील प्राधान्य देत आहे. नुकताच ६१ हजार शिक्षकांच्या अनुदानाचा प्रश्न सोडवण्यात आला आहे. शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ, शिक्षकांचे समायोजन, शिक्षक पदभरतीत दिव्यांगांसाठी पदे सुनिश्चित करणे आदी निर्णयही घेण्यातही आले आहेत. विविध समस्या दूर करून शिक्षण क्षेत्रातील समस्या, प्रश्न, अडचणी दूर करून या क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणण्याचा राज्य शासन प्रयत्न करत आहे. विद्यार्थ्यांना शिस्त लागावी, स्वावलंबन, श्रम आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व समजावे यासाठीदेखील प्रयत्न केले जात आहेत. २०२३-२४च्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागातील विविध योजनांसाठी २ हजार ७०७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## कौशल्य विकासावर भर

तरुण पिढीला रोजगार आणि स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न आहे. त्यादृष्टीने कौशल्य शिक्षण/प्रशिक्षण अत्यावश्यक ठरणार असून कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा तसेच कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्यात येत आहे. यासाठी मुंबईत ३० मजल्यांची इमारत उभारण्यात येणार असून त्यात 'सेंटर फॉर एक्सलन्स'सुद्धा सुरू करण्यात येणार आहे.

व्यावसायिक शिक्षणावरही भर दिला जात असून एचसीएल, टीसीएस, टीआयएसएस, ॲमेझॉन आदींसारख्या संस्थांशी करार करण्यात आले आहेत. टीआयएसएसद्वारे पदविका व पदवी प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याअंतर्गत 'कमवा व शिका' या तत्त्वावर कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी बारावीनंतर प्रवेश घेऊ शकणार

आहेत, तर टीआयएसएस आणि एचसीएल सोबतच्या दोन करारांद्वारे ४० हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

## जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांसोबत सहकार्य करार

सर्वोत्तम क्षमतेनुसार शैक्षणिक क्षेत्र अधिक विकसित व सक्षम करण्यासाठी नामांकित शिक्षण संस्थांसोबत करार करण्यात येत आहेत. परदेशात विद्यार्थ्यास शिक्षण व प्रशिक्षणास प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासन व न्यूयार्क येथील सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयार्क मॅनहटन कम्युनिटी कॉलेज बरो यांच्यात शैक्षणिक सहकार्य करार झालेला आहे. या करारामुळे संशोधन, अध्यापन व अभ्यासक्रम यादी क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढणार आहे. जर्मनीला कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विविध क्षेत्रातील परस्पर सहकार्यासाठी जर्मनीचे शिष्टमंडळ नुकतेच मुंबईत येऊन गेले. जर्मनीसोबतदेखील सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबर गायन, नाट्य, वक्तृत्व यांमध्ये आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी सेलिब्रिटी स्कूलसोबत टायअप करून सेलिब्रिटी स्कूलची संकल्पना राबवली जाणार आहे. इंजिनीअरिंग व मेडिकलचे विषय मातृभाषेतून शिकवले जाणार आहेत. सर्वांगीण विकासामध्ये खेळाला खूप महत्त्व आहे. खेळाला प्रोत्साहन देऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत, यासाठी विशेष पाठबळ राज्य सरकार देणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ५०० विद्यार्थीक्षमता असलेली नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा स्थापन केली जात आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. यामध्ये शासकीय ग्रंथालयांची भूमिकाही महत्त्वाची आहे. या ग्रंथालयांकडून अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी रिड इंडिया राबवून ग्रंथालयांची संख्या वाढवण्यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

## शासकीय शाळांना समान गणवेश

शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना या वर्षीपासून गणवेश, बूट आणि सॉक्स देण्यात येणार आहेत. येत्या वर्षासाठी आठवड्यातील तीन दिवस शाळेचा पूर्वीचा गणवेश, तर नंतरचे तीन दिवस नवीन डिझाईनचा गणवेश असेल. नवीन डिझाईनचा गणवेश स्काऊट गाईडच्या गणवेशाशी साधर्म्य साधणारा असल्याने तो त्यासाठीही वापरता येईल.

## मानधनात वाढ

राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात दोन, चार व सहा हजारांऐवजी भरघोस वाढ केली आहे. आता प्राथमिक विद्यालयातील शिक्षण सेवकांना १६ हजार, माध्यमिकसाठी १८ हजार, तर उच्च माध्यमिकसाठी २० हजार रुपये इतके करण्यात आले आहे.



खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पहिल्या तीन वर्षांसाठी ग्रंथपालांना १४ हजार रुपये, प्रयोगशाळा सहायकांना १२ हजार रुपये, कनिष्ठ लिपिकांना १० हजार रुपये, तर केवळ अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती असलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आठ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

## शाळांना अनुदान

राज्यातील घोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील त्रुटीत असलेल्या शाळांना अनुदानासाठी निधीसह पात्र करणे, यापूर्वी अनुदान घेत असलेल्या शाळांना अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा मंजूर करणे; तसेच अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्यासाठी १,१६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

उत्कृष्ट शाळा म्हणून 'पीएमश्री' योजनेंतर्गत शाळा विकसित करण्यात येणार आहेत. या शाळा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे विविध पैलू दर्शवणाऱ्या आदर्श शाळा म्हणून उदयास येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ५१६ शाळांना केंद्राने मान्यता दिली असून या प्रत्येक शाळेवर १.५ कोटींपेक्षा अधिक खर्च करण्यात येईल.

'पवित्र' या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणाऱ्या शिक्षक पदभरतीच्या अनुषंगाने शिक्षक भरतीतील तरतुदी सुधारित करणे/वगळणे व नवीन तरतुदी समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

## लेट्स चेंज

विद्यार्थ्यांना स्वच्छतेची आवश्यकता लक्षात घेऊन राज्य सरकाने इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्ससोबत सामंजस्य करार केला आहे. मुलांना स्वच्छतेची सवय लागावी, या उद्देशाने महात्मा गांधी जयंती आणि 'मिशन स्वच्छ भारत'च्या वर्धापन दिनानिमित्त हा उपक्रम हाती घेतला. याद्वारे विद्यार्थ्यांना 'स्वच्छता मॉनिटर्स' बनण्याची संधी मिळाली.

प्राथमिक अथवा माध्यमिक शाळेत इयत्ता पहिली ते दहावीच्या वर्गात प्रवेशासाठी अन्य शाळेतून आलेल्या विद्यार्थ्याला आता सुलभरितीने प्रवेश घेता येणार आहे. टीसी (Transfer Certificate) अभावी प्रवेश नाकारण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. शालेय प्रवेशित न झालेल्या विद्यार्थ्यास जन्मतारखेचा दाखला पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येऊन वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये, याची दक्षता शाळा प्रमुखांमार्फत घेतली जाणार आहे.

येणाऱ्या काळात शैक्षणिक क्षेत्राला नवी दिशा देण्याचे गुणवत्तापूर्व काम शालेय शिक्षण विभाग अधिक सक्षमपणे करणार आहे.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ९ मार्च २०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये 'इतर मागास बहुजन कल्याण' या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या विभागामार्फत विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येतात.

# ओबीसी : शिष्यवृत्ती योजना

**अतुल सावे**
मंत्री, सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण

आर्थिक अडचणीमुळे परराज्यात व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी इच्छुक व्हीजेएनटी, एसबीसी, ओबीसी आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती सुरू करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

## भारत सरकारच्या डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (डी.एन.टी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र ७५% व राज्य हिस्सा २५%) योजना

**योजनेचे स्वरूप** : केंद्र शासनाची ही योजना आहे. विजाभजमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. १००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. १,०००/-शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच नववी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. १५०/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. १,५००/-शिष्यवृत्ती दिली जाते.

**संपर्क** : या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

## भारत सरकारच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : केंद्र शासनाची योजना असून यामध्ये केंद्र ७५ टक्के व राज्याचा २५ टक्के हिस्सा असतो. वसतिगृहात राहणारे तसेच न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहा महिन्यांकरिता ही योजना अनुज्ञेय असेल. गट-१ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १,२०० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ५५० रुपये, गट-२ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८२० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५३० रुपये, गट-३ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५७० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ३,००० रुपये, गट-४ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ३८० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यासाठी २३० रुपये दिले जातात.

**संपर्क** : या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

## भारत सरकारची इतर मागास प्रवर्गासाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत केंद्र ५० टक्के, तर राज्याचा ५० टक्के हिस्सा असतो. ही दरमहा शिष्यवृत्ती १० महिन्यांकरिता देण्यात येते. अनिवासी इयत्ता पहिली ते दहावीसाठी रुपये १०० तसेच निवासी इयत्ता तिसरी ते दहावीसाठी रुपये ५०० देण्यात येतात. अनिवासी इयत्ता पहिली ते दहावीसाठी रुपये ५०० तसेच निवासी इयत्ता तिसरी ते दहावीसाठी रुपये ५०० देण्यात येतात.

**संपर्क** : या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.



## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता पाचवी आणि सातवीमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत इयत्ता पाचवी ते सातवीमधील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींना प्रतिमहा रुपये २५०/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रुपये २५००/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

**संपर्क** : योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्यांशी संपर्क साधावा.

## इ.मा.व.मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत इयत्ता आठवी ते दहावीमधील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींना प्रतिमहा रुपये ३००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रुपये ३,०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

**संपर्क** : संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क (मॅट्रिकपूर्व) प्रदान करणे विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेंतर्गत संबंधित शाळांना जे शुल्क अनुज्ञेय आहे, ते प्रवेश शुल्क, वाचनालय, क्रीडा, प्रयोगशाळा अशा स्वरूपाचे शुल्क संबंधित शाळांना परस्पर अदा केले जाते. तसेच एक वेळ नापास झालेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते.

**संपर्क** : या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

## विजाभज व विमाप्र प्रवर्गातील इयत्ता पाचवी आणि सातवीमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत इयत्ता पाचवी ते सातवीमधील विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थिनींना प्रतिमहा रुपये ६०/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रुपये ६००/- शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेच्या शिष्यवृत्तीचे दर कमी असल्याने शिष्यवृत्तीच्या दरामध्ये वाढ करण्याचा राज्य सरकारचा विचार असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**संपर्क** : योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक.

## विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत इयत्ता पाचवी ते सातवीसाठी दरमहा रु. २० रुपये प्रमाणे १० महिन्यांकरिता रु. २०० रुपये प्रति विद्यार्थी व इयत्ता आठवी ते दहावीसाठी दरमहा रु. ४० रुपयांप्रमाणे १० महिन्यांकरिता रु. ४०० रुपये प्रतिविद्यार्थी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेच्या शिष्यवृत्तीचे दर कमी असल्याने या शिष्यवृत्तीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**संपर्क** : योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्यांशी संपर्क करावा.

## विजाभज व विमाप्र प्रवर्गातील इयत्ता पाचवी आणि सातवीमध्ये शिकणाऱ्या, सैनिक शाळेत शिकणाऱ्या मुलींसाठी, विजाभज, विमाप्र मुलींसाठी निर्वाह भत्ता योजना

**योजनेचे स्वरूप** : या योजनेत राज्यातील शासन मान्य सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज/विमाप्र प्रतिविद्यार्थ्यांना रु. १५,००० रुपयांप्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येतो.

**संपर्क** : योजनेच्या अधिक माहितीकरिता संबधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

## स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार योजना

**योजनेचे स्वरूप** : राज्यातून व विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १०वी व १२ वीच्या परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विमुक्त जाती / भटक्या जमाती प्रवर्गातून इतर मागास प्रवर्गातील सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी रुपये १ लाख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते.

विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १०वी व १२ वी परीक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी रु. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते.

**संपर्क** : अधिक माहितीकरिता संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यांशी संपर्क साधावा.

वरील सर्व योजनांच्या सविस्तर माहितीसाठी obcbahujankalyan.maharashtra.gov.in संपर्क साधावा.

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग मॅट्रिकोत्तर योजना (शिक्षण )

### राज्य सरकारची शालान्त परीक्षोत्तर योजना

www//mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण तसेच संबंधित शाळा महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा.

## ओबीसी विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असून ही इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू केलेली आहे. या योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा www//mahadbtmahait.gov.in

उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण व संबंधित शाळा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

## विमाप्र विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सवलत

ऑनलाइन फॉर्म भरण्याची www//mahadbtmahait.gov.in वर सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण तसेच संबंधित शाळा/ महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा.

## शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने (विजाभज)

**योजनेचे स्वरूप** : ही राज्यस्तरीय योजना आहे. ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. www//mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर लाभार्थ्यांनी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने (विजाभज) या योजनेचा अर्ज भरून महाविद्यालयास सादर करावा. संबंधित महाविद्यालयाने सर्व कागदपत्रांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधित साहाय्यक आयुक्त यांना मंजुरीसाठी पाठवावेत.

**संपर्क** : या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण तसेच संबंधित शाळा/ महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा.

## शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने (इमाव)

**योजनेचे स्वरूप** : ही राज्यस्तरीय योजना आहे. या योजनेचे संपूर्णतः संगणकीकरण झालेले आहे. www//mahadbtmahait.gov .in ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या संकेतस्थळावर लाभार्थ्यांनी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने (विजाभज) या योजनेचा अर्ज भरून महाविद्यालयास सादर करावा. संबंधित महाविद्यालयाने सर्व कागदपत्रांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवावे.

**संपर्क** : अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण व संबंधित शाळा/महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरूप** : इयत्ता १०वीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून इयत्ता ११ वीमध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच इयत्ता १२ वीमध्ये शिकणाऱ्या विजाभज / विमाप्र वर्गाच्या मुला-मुलींना ही राज्यस्तरीय योजना असून विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग विजाभज / विमाप्र प्रवर्गाच्या मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा, त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचेही संगणकीकरण झालेले असून ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा www//mahadbtmahait. gov.in वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**संपर्क** : अधिक माहितीकरिता संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण व संबंधित शाळा व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्यांशी संपर्क साधावा.

## पात्र विद्यार्थ्यांना विद्यावेतन

**योजनेचे स्वरूप** : व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या शासकीय वसतिगृहाच्या बाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी ही योजना आहे. या योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा www//mahadbtmahait.gov.in उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**संपर्क** : संबंधित लाभार्थ्यांनी या योजनेचा अर्ज भरून महाविद्यालयास सादर करावा. संबंधित महाविद्यालयाने सर्व कागदपत्रांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे मंजुरीसाठी फॉरवर्ड करावे.

अधिक माहितीकरिता संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण व संबंधित शाळा व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

**अभ्यासक्रमाचा प्रकार/कालावधी**

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार आणि कालावधी | वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन (१० महिन्यांसाठी) | वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन (१० महिन्यांसाठी) |
|---|---|---|---|
| १ | ४ ते ५ वर्षांचे वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र, इ. अभ्यासक्रम | ७०००/- | १००००/- |
| २ | २ ते ३ वर्षांचे अभियांत्रिकी, पदविका, पदवी, एमबीए, एमएसडब्ल्यू इ. | ५०००/- | ७०००/- |
| ३ | २ वर्ष किंवा बीएड,डीएड इ.त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम. उदा. बीएड, डीएड इ. | ५०००/- | ५०००/- |

## व्यावसायिक प्रशिक्षण

**योजनेचे स्वरूप** : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज व विमाप्र प्रवर्गातील उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला



प्रशिक्षण) ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

**संपर्क** : अधिक माहितीकरिता संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन

ही राज्यस्तरीय योजना विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्गाकरिता आहे. संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी अधिक माहितीकरिता संपर्क साधावा.

## परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**योजनेचे स्वरूप** : विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी/ विद्यार्थिनी आर्थिक परिस्थितीमुळे परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून गुणवंत मुला-मुलींची शैक्षणिक प्रगती करणे व उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना राबवण्यात येते.

**अटी व शर्ती** : विद्यार्थी हा विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रवर्गातील असावा. विद्यार्थ्याला परदेशातील THE/QS अद्ययावत वर्ल्ड रँकिंगमध्ये २००च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा. विद्यार्थी हा पूर्ण वेळ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असावा. विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठामधून किमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

## गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी

परदेशातील शैक्षणिक संस्थेने शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण शुल्क, प्रवेश घेतलेल्या वर्षाचे शैक्षणिक प्रवेश शुल्क, भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च महाराष्ट्र शासन वेळोवेळी प्रयोजनासाठी जाहीर करेल. परदेशातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यास प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जवळच्या मार्गाचा (shortest route) इकॉनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा खर्च दराप्रमाणे देण्यात येतो. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.


**शब्दांकन : संध्या गरवारे-खंडारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**भारताला जगाची मानवी संसाधन राजधानी बनवण्याच्या प्रधानमंत्री यांच्या दृष्टिक्षेपात योगदान देण्यासाठी सरकारने राज्यातील प्रत्येक नोकरीइच्छुक तरुण –तरुणींना रोजगार मिळवून देणे, त्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे, रोजगार मेळावे भरवणे, कौशल्यसंबंधित उपक्रमाचे समाकलन करणे, उद्योजकता विकास कार्यक्रमांची सर्व माहिती इच्छुकांना मिळावी, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.**

# रोजगार उपलब्धतेवर भर

**मंगल प्रभात लोढा,**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास

मागील काही वर्षांत आपला देश विकासविषयक विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नोव्हेंबर २०१४ मध्ये युवकांमधील नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी कौशल्य विकासाची सुरुवात केली. राज्यामध्येही त्यानंतर लगेच जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य विकास विभाग सुरू करण्यात आला. राज्यातील प्रत्येक नोकरीइच्छुक उमेदवाराला रोजगार मिळवून देणे, युवक-युवती, महिला, विद्यार्थी यांना कौशल्य प्रशिक्षण देणे, नवनवीन संकल्पनांना जन्म देणाऱ्या स्टार्टअप्स्ना प्रोत्साहन आणि चालना देणे, उद्योगांमधील बदलत्या तंत्रज्ञानास अनुसरून आयटीआयमधील अभ्यासक्रमांचे तसेच आयटीआयचे आधुनिकीकरण करणे,



यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने पुढाकार घेतला आहे.

## युवाशक्ती करिअर शिबिर

कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र घडवण्याच्या उद्देशाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थी, युवक-युवतींसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांत जिल्हास्तरावर तसेच राज्यातील सर्व २८८ मतदारसंघात ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्ष आता सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या करिअरविषयक विविध संधींची माहिती या शिबिरांमधून दिली जात आहे. या करिअर शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक-युवतींना विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळाले. करिअर शिबिराच्या ठिकाणी विविध स्टॉलच्या माध्यमातून विविध अभ्यासक्रमांची तसेच इतर माहिती देण्यात आली. इयत्ता दहावीनंतर करिअर कसे निवडावे, दहावीनंतरच्या शिक्षणाच्या विविध संधी, बारावीनंतरचे अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा, या प्रक्रियेबाबत माहिती, व्यक्तिमत्व विकास यासोबतच इतर विविध विषयांबाबत मार्गदर्शन देण्यात आले. आयटीआय व्यवसाय अभ्यासक्रम, इंजीनियरिंग व तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ व त्यातील विविध अभ्यासक्रम, शैक्षणिक कर्ज व शिष्यवृत्तीविषयक विविध योजना, रोजगार व स्वयंरोजगारविषयक विविध योजना, स्थानिक शैक्षणिक संस्था आदींविषयी या शिबिरांमधून सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. परदेशातील उच्च शिक्षणासंबंधीही मार्गदर्शन देण्यात आले.

## रोजगार मेळावे

विभागामार्फत राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. ठिकठिकाणी हजारो विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी होत असून नोकरीसाठी विविध कंपन्यांकडे मुलाखती देत आहेत.

या मेळाव्यात अगदी पाचवी पास उमेदवारापासून बीई, एमबीए, आयटीआय अशा विविध पदवी, पदविकाप्राप्त उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. याशिवाय महास्वयं वेबपोर्टल आणि विभागाच्या इतर विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योगांमध्ये एप्रिल २०२३ मध्ये १३ हजार ८२ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला. महास्वयं वेबपोर्टल, रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात उपक्रमांमधून वेळोवेळी करतात. त्यामुळे नोकरीइच्छुक उमेदवारांना कौशल्य विकास विभागाच्या उपक्रमांमधून नोकरी मिळवण्यासाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

रोजगार मेळाव्यांच्या आयोजनासाठी आमच्या सरकारने भरीव आर्थिक तरतूद केली असून विभागीय तसेच जिल्हास्तरावरील प्रत्येक मेळाव्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत विभागीय प्रकल्प, उपक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यांमध्ये किमान १ मॉडेल आयटीआय आणि राज्यात मुलींसाठी १७ मॉडेल आयटीआय असे एकूण ५३ मॉडेल आयटीआय निर्माण करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्व सुविधांयुक्त असे जागतिक स्किल सेंटर उभारण्यात येणार आहे. एकात्मिक कौशल्य भवन उभारण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे. मागील काही वर्षांपासून आयटीआयच्या विविध अभ्यासक्रमांकडे



नोकरीसाठी इच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. यासाठी विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागाकडे तसेच महास्वयं वेबपोर्टलवर आतापर्यंत १ लाख ४ हजार ८७ इतक्या सार्वजनिक व खासगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे. यापैकी अनेक उद्योजक आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील रिक्त पदांची भरती महास्वयं वेबपोर्टल तसेच रोजगार मेळावे आदी रोजगार मेळाव्यासाठी १ लाख रुपये, तर जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा होती.

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराची उपलब्धता व्हावी, यासाठी राज्यातील ४४ नामांकित उद्योजक, कॉर्पोरेट संस्था, औद्योगिक संघटना, प्लेसमेंट एजन्सिज यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले. या करारामार्फत राज्यातील १ लाख २१ हजार युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

जागतिक बँकेच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यातून विभागात विविध विद्यार्थ्यांचा कल वाढत असून अधिकाधिक विद्यार्थी कौशल्याधारित प्रशिक्षण घेऊन रोजगार किंवा स्वयंरोजगार करत आहेत. आता उद्योगांमधील बदलत्या नवनव्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आयटीआय अभ्यासक्रमांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी विभागाने पुढाकार घेतला असून, यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून 'सुचवा तुमच्या आवडीचे कौशल्य अभ्यासक्रम' ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली.

कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन

करण्यात आले आहे. या विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरू होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, मशिन लर्निंग, बिझनेस इंटेलिजन्स आणि इनोव्हेशन, बीबीए तसेच न्यू व्हेंचर मॅनेजमेंटमधील टेक्नॉलॉजी डोमेनमधील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. अशा विविध अभ्यासक्रमांसह विद्यापीठाचा शैक्षणिक प्रारंभ करण्यात आला आहे. विद्यापीठासाठी पनवेल येथे इमारत उभारण्यात येणार असून नुकतेच त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे. विद्यापीठ आणि रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आरएआय) यांच्या दरम्यान बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए) या अभ्यासक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे बिझनेस आणि रिटेलचे आवश्यक ज्ञान आणि उद्योगाचा अनुभव मिळेल.

देशामध्ये युवकांमधील नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स यांना चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप कॅपिटल आहे. देशात नव्याने सुरू झालेल्या ४२ युनिकॉर्नपैकी ११ युनिकॉर्न महाराष्ट्रातील आहेत. स्टार्टअपविषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत राज्याने मोठी आघाडी घेतली आहे. भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाद्वारे (DPIIT) मान्यताप्राप्त असलेल्या देशातील एकूण ८८ हजार १३६ स्टार्टअपपैकी सर्वाधिक १६ हजार २५० स्टार्टअप (१८ टक्के) महाराष्ट्रातील आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मान्यताप्राप्त स्टार्टअप आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागात नवनवीन संकल्पनांचा वापर करण्याच्या अनुषंगाने स्टार्टअप सप्ताह उपक्रम दरवर्षी राबवण्यात येतो. यंदाच्या सप्ताहात देशभरातील स्टार्टअप्स सहभागी झाले होते. यामधील निवडक उत्कृष्ट स्टार्टअप्सना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या विजेत्यांना शासनाच्या विविध विभागांमध्ये काम करण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांचे कार्यादेश देण्यात येतात. याशिवाय राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र स्टार्टअप आणि नावीन्यता यात्रा संपन्न झाली. यामधील उत्कृष्ट स्टार्टअप्सना सन्मानित करण्यात आले. युवक-युवतींनी कृषी, शिक्षण, गव्हर्नन्स, पर्यावरण, ई-कॉमर्स, रोबोटिक्स, स्मार्ट इन्फ्रा आणि मोबिलिटी, शाश्वतता, आरोग्य आदी क्षेत्रातील स्टार्टअप्स सादर केले. प्रथम विजेत्या तसेच सर्वोत्तम महिला स्टार्टअप्सना प्रत्येकी १ लाख रुपयांचे, तर द्वितीय विजेत्या स्टार्टअप्सना ७५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

## अर्थसंकल्पात भरीव तरतुदी

राज्याचा २०२३-२४चा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या सर्वांगीण विकासाची ग्वाही या



अर्थसंकल्पातून देण्यात आली. स्टार्टअप्स सुरू करण्याकरिता आवश्यक प्रशिक्षणासाठी कळंबोली, नवी मुंबई येथे निवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था उभारण्यात येणार आहे. गावांतून शहरांकडे होणारे स्थलांतर थांबावे, यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ५०० ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. लहान मुलांमध्ये कौशल्य शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून महानगरपालिका व जिल्हा परिषद शाळांमध्ये कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येतील. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून मुंबईतील २०० शाळांमध्ये प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात येईल. कौशल्यवर्धनाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनवण्याकरिता पुढील तीन वर्षात २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्यात येईल. तसेच ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ६१० कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येईल. उद्योगांना आवश्यक व तंत्रप्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती, उद्योगांशी प्रभावी समन्वय व नवीन संशोधन यातून रोजगार निर्मितीसाठी दहा उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहेत. राज्याचे लॉजिस्टिक धोरण, सर्क्युलर इकॉनॉमी पार्क, वस्त्रोद्योग आणि खनिकर्म धोरण, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती, रत्ने व दागिने याबाबतचे धोरण, मधाचे गाव यासारखे उपक्रम याबाबतही अर्थसंकल्पात विविध निर्णय आणि धोरणे जाहीर करण्यात आली आहेत. या सर्वांमधून राज्यात रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. राज्यातील पर्यटनाला चालना देताना प्रत्येक जिल्ह्यातील किमान ५०० युवकांना जलपर्यटन, कृषी पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, साहसी पर्यटन, शाश्वत पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्रात प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्यात येणार आहे. अर्थसंकल्पात चतुर्थ अमृत 'रोजगार निर्मिती : सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा' यासाठी कार्यक्रम खर्चाकरिता एकूण ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील युवक, शेतकरी, महिला अशा सर्व घटकांना सामावून घेत त्यांना कौशल्याबरोबरच शाश्वत रोजगार मिळण्याच्या अनुषंगाने राज्य शासन आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभाग कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य शासनाने १५ जानेवारी २०१५ रोजी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना केली. आता या विभागाचे नाव 'कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग' असे आहे. कौशल्य विकास, रोजगाराची उपलब्धता, स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी या विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. यात विशेष करून कौशल्य प्रशिक्षणासाठीच्या विविध योजना विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत.**

# कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी

**इर्शाद बागवान**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत असलेल्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ, महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्यामार्फत प्रशिक्षण, कौशल्य विकासविषयक विविध अभ्यासक्रम, योजना राबवण्यात येतात.

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये दोन उपविभागांतर्गत उपक्रम /योजना राबवण्यात येतात. प्रशिक्षण शाखेंतर्गत शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना (सीटीएस), शिकाऊ उमेदवारी योजना (एटीएस), प्रगत प्रशिक्षण योजना (एव्हीटीएस), हायटेक प्रशिक्षण योजना, मेंटेनन्स युनिट आणि कौशल्य विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याअंतर्गत चालवण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी या शाखेमार्फत करण्यात येते. व्यवसाय शिक्षण शाखेमार्फत पूर्व माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम, +२ दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळांतर्गत येणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम या योजना या शाखेमार्फत राबवण्यात येतात. उद्योगांसाठी विविध व्यवसायामधील कुशल कामगारांचा स्थिर प्रवाह सुनिश्चित करणे, त्यांना प्रशिक्षण देऊन मात्रात्मक औद्योगिक उत्पादन वाढवणे, शिक्षित तरुणांमधील बेरोजगारी कमी करणे, तरुणांच्या मनात तांत्रिक आणि औद्योगिक वृत्ती विकसित करणे, याबरोबरच त्यांना रोजगारयुक्त प्रशिक्षण देण्यासाठी शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना राबवण्यात येते. संचालनालयांतर्गत असलेल्या शासकीय आणि खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामार्फत (आयटीआय) हे विविध प्रशिक्षण अभ्यासक्रम चालवले जातात. https://www.dvet.gov.या संकेतस्थळावर सविस्तर माहिती उपलब्ध आहे.



## कौशल्य विकास परीक्षा मंडळ

राज्यात मध्यम व मोठ्या औद्योगिक आस्थापनांची तसेच लघु उद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झाली आहे. त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध झाल्या आहेत. त्याकरिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ययुक्त करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. या अभ्यासक्रमांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार बदल होत आहेत. तसेच औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये असलेली तांत्रिक मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढत आहे. मंडळाच्या बऱ्याच अभ्यासक्रमांना शिकाऊ उमेदवारी योजना लागू असल्याने उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना त्याचा लाभ घेता येतो. औद्योगिक आस्थापनांच्या गरजेप्रमाणे तसेच नवीन तंत्रज्ञानावर आधारित नवनवीन अभ्यासक्रम मंडळामार्फत तयार करण्यात येत असतात. मंडळाला असणाऱ्या स्वायत्ततेमुळे त्यांचे सर्व अभ्यासक्रम तत्काळ अद्ययावत करण्यात येतात. शासनाच्या वतीने राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विविध गटातील शैक्षणिक अर्हतेनुसार, तसेच ६ महिने कालावधीचे एकूण १५२, १ वर्ष कालावधीचे एकूण ९६ आणि २ वर्ष कालावधीचे एकूण ४४ अर्धवेळ व पूर्णवेळ असे एकूण मिळून २९२ अभ्यासक्रम राबवण्यात येतात.

## महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबवण्यात येतात. केंद्र पुरस्कृत आणि राज्य व्यवस्थापित प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY २.०), प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKV २.०) विशेष कृषी प्रकल्प, Recognition to Prior Learning/RPL (गटशेती प्रशिक्षण : Mass Skillng), वैयक्तिक कौशल्य प्रशिक्षण (Individual Skill Training), दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM), उपजीविकेसाठी कौशल्य संपादन ज्ञान जागरूकता अभियान (Skill Acquisition Aknowledge Awareness for Livelihood-SANKALP), प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA), किमान कौशल्य विकास कार्यक्रम -जिल्हा नियोजन समिती आदी योजना राबवण्यात येतात. सोसायटीच्या https://kaushalya.mahaswayam.gov.in/ या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**सामाजिक न्याय विभागामार्फत शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबवले जातात. समाजाच्या शेवटच्या घटकाचा विकास हाच राज्याचा खरा विकास या धारणेने सरकार काम करत आहे. त्या दृष्टीने राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष प्रवर्ग, दिव्यांग, निराश्रित इत्यादींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, विकासासाठी शासन जाणिवेने प्रयत्न करत आहे. जनजातीतील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर योजना राबवण्यात येतात.**

# सामाजिक न्याय विभागाच्या विविध शिष्यवृत्ती योजना

**संध्या गरवारे-खंडारे**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागमार्फत विविध कल्याणकारी योजना राबवल्या जातात.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व, शिष्यवृत्ती योजना, माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिकपूर्व शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्क इत्यादी योजना खालीलप्रमाणे राबवण्यात येतात.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

**उद्दिष्ट** : इयत्ता पाचवी ते सातवीमधील मुलींची गळती थांबवण्यासाठी प्राथमिक शाळा व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमातील व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या मुलींना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. पाचवी ते सातवीसाठी १९९६, तर आठवी ते दहावीसाठी २००३ पासून ही योजना सुरू करण्यात आली आहे.



**अटी व शर्ती** : उत्पन्न व गुणांची अट नाही, अर्ज करण्याची आवश्यकता नाही, वर्षातून तीन वेळा शिष्यवृत्ती देण्यात येते.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप** : इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा ६० रुपये (दहा महिन्यांसाठी ६०० रुपये) व आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये (दहा महिन्यांसाठी १,००० रुपये)

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिकपूर्व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदाने

**उद्दिष्ट** : शालेय शिक्षण विभागाच्या १३ जून १९९६च्या शासन निर्णयान्वये प्रमाणित दराने शुल्क आकारणाऱ्या शासन मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व सत्र शुल्क अदा केले जाते. २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती, विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची परिपूर्ती १० महिन्यांच्या कालावधीकरिता करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती** : विद्यार्थी अनुसूचित जाती प्रगवर्गातील असावा. इयत्ता पहिली ते दहावीमध्ये शिकत असलेला असावा. विद्यार्थी व पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावे. विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती भरलेली नसावी.

**लाभाचे स्वरूप** : अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय प्रतिपूर्ती दर अ.क्र. इयत्ता विद्यार्थ्यांना द्यावयाची दरमहा शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती (वर्षातून दहा महिने कालावधीसाठी) पहिली ते चौथी रु.१००/- दरमहा, पाचवी ते सातवी रु.१५०/- दरमहा, आठवी ते दहावी रु.२००/- दरमहा.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

अनुसूचित जातीच्या मुला/मुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून राहावेत, यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती** : इयत्ता दहावीमध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला/मुलींसाठी ही योजना लागू आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आहे.

**स्वरूप** : अनुसूचित जाती कल्याण समितीने ३ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या विधान भवन, मुंबई येथे झालेल्या बैठकीत समितीने शासनास शिष्यवृत्ती दरात वाढ करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारित दर प्रस्तावित केले आहे. इयत्ता ११ वी दरमहा रु. ३००/- (१० महिन्यांसाठी ३,००० रु.), तसेच इयत्ता १२ वी दरमहा रु. ३००/- (१० महिन्यांसाठी ३,००० रु.) शा.नि.क्र.इबीसी-२००३/प्र.क्र.११५/ मावक-२ दि. ११ जून २००३ अन्वये.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार

इयत्ता १० वी १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवून विशेष उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना हा पुरस्कार देण्यात येतो.

**स्वरूप** : सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रर्वगाच्या विद्यार्थ्याला रुपये १ लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास रु. ५० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्ह्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास रु. २५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून तालुक्यात प्रथम आलेल्या अनु.जातीच्या विद्यार्थ्यास रु. १० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयामधून इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत प्रथम आलेल्या अनु.जातीच्या विद्यार्थ्यास रु. ५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते.

## अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

ही योजना केंद्र पुरस्कृत असून अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण संधी उपलब्ध करून देण्यासाठी व त्यांना मुख्य समाज प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकारने सदर शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

**पात्रतेचे निकष** : अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते, सर्व जाती-धर्माला लागू आहे. अनु.जातीमध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे. उत्पन्नाची अट नाही. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप** : इयत्ता पहिली ते दुसरीच्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ११० /- व तदर्थ अनुदान रु. ७५० /-, तिसरी ते दहावीच्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ११० /- व तदर्थ अनुदान रु. ७५० /-, तिसरी ते दहावीच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. ७०० /- व तदर्थ अनुदान रु. १००० /- देण्यात येत.

## सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

सन १९७६ पासून सदर योजना राबवण्यात येते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न विद्यार्थीदशेतच निर्माण व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, शौर्य, सांघिक वृत्ती, नेतृत्व, देशभक्ती, देशप्रेम, निडरता इत्यादी गुणांची वाढ व जोपासना व्हावी, यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**पात्रतेचे निकष** : विद्यार्थी पाचवी ते दहावीपर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा. विद्यार्थी मागासवर्गीय अथवा अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा जास्त नसावे.

**लाभाचे स्वरूप** : नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेटमनी इत्यादींवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती देय सरकारकडून केली जाते. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी १५,०००/- निर्वाह भत्ता देण्यात येतो.

## भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना (केंद्र ६०% व राज्य ४०%)

इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, त्यांच्यामध्ये शैक्षणिक भावना वाढीस लागावी या उद्देशाने केंद्र शासनाने ही योजना २०१३ पासून सुरू केली आहे.

**स्वरूप** : ही योजना शासकीय मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यास लागू राहील.

या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा २ लाख रुपये असून यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही. या योजनेंतर्गत विद्यार्थ्याने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही. एकाच लाभार्थ्यांस दोन योजनेचा लाभ घेता येणार नाही.

## माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

सन १९९५ पासून ही योजना राबवण्यात येत आहे. इयत्ता पाचवी ते सातवीमधील दोन गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना; तसेच इयत्ता आठवी ते दहावी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

दिली जाते.

**पात्रतेचे निकष :** मान्यताप्राप्त प्राथमिक तसेच माध्यमिक शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गामध्ये शिकणारा मागासवर्गीय विद्यार्थी असावा. मागील वार्षिक परीक्षेत कमीत-कमी ५० % व त्याहून अधिक गुण मिळवूण मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेला असावा. शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट नाही. ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नसते.

**लाभाचे स्वरूप :** इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये (५०० रुपये १० महिन्यांसाठी) आणि इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये (१,००० रुपये १० महिन्यांसाठी) देण्यात येतात.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना विविध क्षेत्रात व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. ही योजना १९८२ पासून राबवण्यात आली आहे.

**पात्रतेचे निकष :** विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावा.विद्यार्थी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणारा असावा. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ६५,२९०/-पेक्षा जास्त नसावे.

**लाभाचे स्वरूप :** संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा रु. ६०/- विद्यावेतन देण्यात येते त्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. ४०/- पूरक विद्यावेतन देण्यात येते.

तंत्रशिक्षण विभागाकडून ज्यांना विद्यावेतन देण्यात येत नाही, त्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. १००/- विद्यावेतन देण्यात येते.

## उच्च शिक्षणासाठीच्या योजना

**(शिष्यवृत्ती योजना - महाडिबीटी पोर्टलवरील योजना एकूण ४)**

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (GOI PMS SC)

**योजनेची अंमलबजावणी :** ऑनलाइन महाडिबीटी पोर्टल (https://mahadbtmahait.gov.in)

**पात्रतेचे निकष :** विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावा. विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे. विद्यार्थी शालान्त परीक्षेत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरूप :** विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क प्रदान केले जातात. दरमहा रु. २३० ते रु. ४५० या दराने निर्वाह भत्ता दिला जातो. वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या



विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. ३८० ते रु. १,२०० निर्वाह भत्ता दिला जातो.

## मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना (FREESHIP)

**योजनेची अंमलबजावणी :** ऑनलाइन महाडिबीटी पोर्टल (https://mahadbtmahait.gov.in)

**पात्रतेचे निकष :** विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवगातील असावा. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपेक्षा जास्त असावे. विद्यार्थी शालान्त परीक्षेत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरूप :** शालांत परीक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थांना त्यांचे वय विचारात न घेता मान्यताप्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबीवरील विहित केलेले शुल्क इ. दिले जाते.

## राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना (इ. ११ वी १२ वी) (RSMS)

**योजनेची अंमलबजावणी :** ऑनलाइन महाडिबीटी पोर्टल (https://mahadbtmahait.gov.in)

**पात्रतेचे निकष :** इयत्ता १०वीमध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलीसांठी आहे.

**लाभाचे स्वरूप :** ११ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यांसाठी रु. ३,०००/-),१२ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यासाठी रु. ३,०००/-)

## व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना

**योजनेची अंमलबजावणी :** ऑनलाइन महाडिबीटी पोर्टल (https://mahadbtmahait.gov.in)

**पात्रतेचे निकष :** विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेशित असावा, विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा.

भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्नाची मर्यादा आहे.(रु.२.५ लाखांपेक्षा कमी)

**लाभाचे स्वरूप :** शिष्यवृत्तीद्वारे मिळणाऱ्या निर्वाहभत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, स्टेशनरी, निवास, भोजन इत्यादी बाबींचा खर्च भागवण्यात येतो. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात, शासकीय वसतिगृहात व इतर वसतिगृहात राहतात अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व्यतिरिक्त या योजनेंतर्गत निर्वाह भत्ता देण्यात येतो. या निर्वाह भत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास,

भोजन, स्टेशनरी इत्यादी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते.

## उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश :** अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची स्पर्धात्मक युगामध्ये जडणघडण व्हावी, याकरिता देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी उपरोक्त योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**योजनेच्या प्रमुख अटी :** विद्यार्थी अनुसूचित जाती/नवबौद्ध व महाराष्ट्र रहिवासी असावा. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ६ लाखपर्यंत असावे. विद्यार्थी या योजनेसाठी शासन निर्णय ८ नोव्हेंबर २०१७ सोबत जोडलेल्या शासन परिशिष्ठ-ब अन्वये महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेशित असावा. (उदा. IIM, IIT, NIT, IISER, IIIT, IIIM इ.) या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी, १२वी ची परीक्षा मंडळ महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्ड / केंद्रीय बोर्ड (CBSC) यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक परीक्षांमध्ये किमान ५५% गुण असावेत.

**लाभाचे स्वरूप :** संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक संपूर्ण शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क. क्रमिक पुस्तके रु. ५,०००/- व शैक्षणिक साहित्य रु. ५,०००/- असे एकूण प्रतिवर्षी रु. १०,०००/- देण्यात येतात.

## राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील मुलांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून ११ जून २००३ च्या शासन निर्णयान्वये राज्यात राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे.




परदेश शिष्यवृत्तीची लाभार्थी संख्या ही योजना सुरू झाली तेव्हा १० अशी होती. या योजनेची सर्वंकष एकत्रित नियमावली २७ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली असून, शासन निर्णय ३ जून २०१८ अन्वये या योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ करून ती ७५ निर्धारित करण्यात आलेली आहे.

**अटी शर्ती :** सदर नियमावलींतर्गत देण्यात येणाऱ्या काही लाभाच्या संदर्भात व इतर मुद्यांच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व विविध लोकप्रतिनिधी व संघटनेनी केलेली मागणी व काळाची गरज विचारात घेता त्यातील काही अटी शर्तीमध्ये २४ सप्टेंबर २०२०, १० मार्च २०२१, १६ मार्च २०२१ व १७ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णय / परिपत्रक / ज्ञापनान्वये सुधारणा करण्यात येऊन प्रतीक्षाधीन यादीची निर्मिती, Post study Work Visa तसेच प्रवासभाड्याची रक्कम आगाऊ स्वरूपात देण्यात येत आहे.

उत्पन्न मर्यादा रु. ६ लाख (QSWR जर १०० च्या आत असेल तर उत्पन्नाची अट नाही)

**लाभाचे स्वरूप :** संपूर्ण शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता, येण्या-जाण्याचे भाडे देण्यात येते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक, सामाजिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणासाठी सन १९१३ मध्ये कोलंबिया येथे प्रस्थान केले होते. या घटनेच्या स्मरणार्थ बार्टी मार्फत सन २०१३ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सुरू करण्यात आली. अनुसूचित जातीतील एम. फिल व पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता प्रोत्साहनपर व आर्थिक साहाय्य देण्याकरिता अधिछात्रवृत्ती देण्यात येते.

**अटी व शर्ती :** अर्ज करण्यासाठी उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. उमेदवार हा अनुसूचित जातीतील असणे आवश्यक आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये महाराष्ट्र किंवा भारतातील युजीसी नामांकित विद्यापीठ/महाविद्यालय, संस्था येथे पीएच. डी.साठी कायम नोंद असणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णवेळ संशोधन करण्याकरिता (BANRF) या योजनेच्या लाभास पात्र राहतात. **संपर्क :** या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्यांशी संपर्क साधावा.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व देण्यात येत आहे. देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. माहिती तंत्रज्ञान हे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे. भारताच्या प्रगतीला गती देताना शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीबरोबरच नैतिक मूल्य, संस्कृती, ज्ञान याचा योग्य समन्वय करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला अधिक प्राधान्य दिले पाहिजे.**

# वृद्धी आणि विकास


**काशीबाई थोरात**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २००० तयार केले आहे. हे २१व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण असून भारताला जागतिक ज्ञानसत्ता बनवणे, हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणानुसार बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्ययन शाखांची रचना, संधी, समानता, समावेशकता, आणि दर्जा ही उद्दिष्टे समोर ठेऊन धोरण तयार करण्यात आले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत अभ्यासक्रमातील लवचिकता, बहुविद्याशाखीय शिक्षण, इंटर्नशिप, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट. बहुविध प्रवेश-निर्गमन याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

## अंमलबजावणीसाठी कार्यगटाची स्थापना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी अहवालातील शिफारशींनुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. कार्यगटाच्या सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश असणार आहे. राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या अनुषंगिक शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणाऱ्यासाठी या कार्यगटाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्य स्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील दृष्टिकोनानुसार, गुंतवणूक आणि संसाधने यांचा समनव्य तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी हा कार्यगट असून उच्च शिक्षणात करावयाचे बदल, याविषयी धोरणात्मक निर्णय घेणे ही या कार्यगटाची कार्यकक्षा आहे.



## भारत आणि अमेरिका–संयुक्त उच्च शिक्षण परिषद

भारताने अमेरिकेप्रमाणेच ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत लक्षणीय प्रगती केली आहे. भारत आणि अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये उच्च शैक्षणिक सहकार्याच्या दृष्टीने विचारमंथन व्हावे, यासाठी राज्यपालांच्या पुढाकाराने राजभवन मुंबई येथे उच्च शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये अमेरिका आणि भारत यांच्यातील अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया, संशोधन यावर सखोल चर्चा करण्यात आली. राज्यातील विद्यापीठे आणि अमेरिकेतील विद्यापीठे एकत्र आल्यास शैक्षणिक उद्दिष्टे नक्कीच पूर्ण होतील. यावेळी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य करण्यावर ही चर्चा करण्यात आली.

## भारतरत्न लता मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत अभ्यासक्रम

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुल येथे जागा निश्चित करण्यात आली आहे. सध्या तात्पुरत्या स्वरूपात पु. ल. देशपांडे कला

अकादमीची जागा उपलब्ध करून देण्यात आली. भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयांतील पहिले सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पु. ल. देशपांडे अकादमीमध्ये तात्पुरता सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये एकूण एक वर्ष कालावधीचे सहा अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

### सदस्य सचिवांच्या मानधनात वाढ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जागतिक दर्जाचे लेखन आणि भाषणे संकलित, संपादित करून प्रकाशित करण्याचे अतिशय महत्त्वाचे आणि ऐतिहासिक काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती करत आहे. या समितीत कार्यरत असलेल्या सदस्य सचिव व सदस्यांच्या मानधनात वाढ करून सदस्य सचिवांना १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये मानधन आणि समितीला सोयी सुविधासह समितीचे संशोधन व प्रकाशनाचे काम जलद गतीने होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या ५ लाख

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची आवड निर्माण व्हावी, सामाजिक प्रश्नांची जाणीव होऊन राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग वाढावा, यासाठी या योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या आता ५ लाख करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत किंवा सामजिक अडचणी दूर करण्यासाठी झाला पाहिजे. सामाजिक अडचणीवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी आणि समाजाप्रती सामजिक बांधिलकी जोपासण्यासाठी नेतृत्व गुण धारण करून लोकशाही प्रवृत्तीचा विकास आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी या विद्यार्थ्यांची संख्या ३ लाख ७० हजारावरून आता ५ लाख करण्यात येणार आहे. ही संख्या जवळपास दीडपट वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढीव विद्यार्थ्यांचा खर्च राज्य शासन करणार आहे.

### महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकनास गती

राज्यशासन आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने अकृषी विद्यापीठे संलग्न महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन करून घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच दर पाच वर्षांनी नॅक पुनर्मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. राज्यातील अद्यापही नॅक मूल्यांकन पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांना लवकरच नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### नवीन ग्रंथ विक्रीसाठी ग्रंथालय व्यवस्थापनाला अधिकार

राज्यातील तालुकापातळीवर ग्रंथ विक्रीची पुरेशा प्रमाणात व्यवस्था नसल्याने ग्रंथालयात वाचकांची गैरसोय होत होती. यासाठी संबंधित ग्रंथालय व्यवस्थापनाने ग्रंथ प्रकाशक/ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीस परवानगी देऊन व्यवस्था करण्यासाठी जिल्हा तालुका पातळीवरील ‘अ’ दर्जा वर्ग शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात प्रकाशक ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीस ग्रंथालय व्यवस्थापनाला अधिकार देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक ग्रंथालयांच्या दर्जात वाढ करताना आवश्यक तेवढेच पॅरामीटर्स ठेवून दर्जावाढ देण्यात येत आहे. तसेच वाचकांना सहज ग्रंथसंपदा उपलब्ध व्हावी, यासाठी फिरत्या वाचनालयांची संख्या वाढवण्यात येणार आहे. ग्रंथालय विभाग ऑटोमोव्हिंग करून पुस्तक देवघेव, अनुदान वितरण ऑनलाइन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

### परदेशी विद्यार्थ्यांना राज्यातील विद्यापीठातील प्रवेशाच्या मार्ग सोपा

राज्यातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना परदेशी विद्यार्थ्यांना सुविधा निर्माण व्हावी, तसेच विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी) नवीन वेबपोर्टल विकसित करण्यात आले आहे.

### तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ

कला, वाणिज्य, विज्ञान पदवी अभ्यासक्रमाकरिता ६२५ रुपयांवरून १ हजार रुपये, पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ७५० रुपयांवरून १ हजार रुपये प्रति तास, शिक्षणशास्त्र / शारीरिक शिक्षण / विधि (पदवी / पदव्युत्तर) या व्यावसायिक अभ्याक्रमांकरिता ७५० रुपयांवरून १ हजार रुपये प्रति तास, उद्योग व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित तज्ज्ञ / अनुभव संपन्न ज्येष्ठ अभियंता यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान १ हजार रुपयांवरून १,५०० रुपये प्रति तास, पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मानधन दर ६०० रुपयांवरून १ हजार रुपये प्रति तास, पदविका अभ्याक्रमांसाठी मानधन दर ५०० रुपयांवरून ८०० रुपये प्रति तास, उद्योग व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित तज्ज्ञ / अनुभव संपन्न ज्येष्ठ व्यवस्थापक यांचे व्याख्यान मानधन दर ७५० रुपयांवरून १,५०० रुपये प्रति तास, कला शिक्षण पदविका तसेच पदवी/पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी अभ्याक्रम मानधन दर ६२५ रुपयांवरून १ हजार रुपये प्रति तासाप्रमाणे याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.



### विविध पदे भरण्यास मान्यता

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व महाविद्यालयाच्या प्रशासनिक बाबींवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता, सहायक प्राध्यापक, प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सहायक प्राध्यापक २ हजार ८८ पदे, प्राचार्य १०० टक्के पदे मान्यता देण्यात आलेली आहे.

ग्रंथपाल - १२१ व शारीरिक शिक्षण संचालक - १०२ असे एकूण २२३ पदे भरण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे.

## शिक्षण संस्थांना ५०० कोटींचा निधी

डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई लक्ष्मी नारायण इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, नागपूर या संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देऊन विशेष अनुदान देण्यात येणार आहे.

## तंत्रशिक्षणात महाराष्ट्राची निवड

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या शिफारशींनुसार केंद्र सरकारकडून जागतिक बँक अर्थसाहाय्यित तंत्र शिक्षणातील बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन सुधारणा प्रकल्प (Multidisciplinary Education and Research Improvement in Technical Education) राबवण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्राची निवड केली आहे. या प्रकल्पासाठी देशातील साधारणतः १५० ते १७५ पदवी संस्था आणि १०० पदविका संस्थांची निवड प्रकल्पाच्या निकषांच्या आधारे केंद्र व राज्याद्वारे करण्यात येणार आहे. हा प्रकल्प एकूण ४ हजार २०० कोटी इतक्या निधीचा असून प्रकल्प कालावधी ५ वर्ष आहे. प्रकल्पात निवड झालेल्या प्रत्येक पदवी संस्थेला १० कोटी, तर पदविका संस्थेला प्रत्येकी ५ कोटी रुपये असे अनुदान प्रकल्प कालावधीमध्ये केंद्र सरकारकडून प्राप्त होणार आहेत.

## नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कोल्हापूर येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याकरिता टप्प्याटप्प्याने एकूण ६५ शिक्षकीय व ५० शिक्षकेत्तर अशा एकूण ११५ पदे मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी एकूण २२१.४८ कोटी रुपये इतक्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. या महाविद्यालयात



आर्टिफिशिअल इंटिलिजन्स ॲण्ड डाटा सायन्स, मेकॅनिकल ॲण्ड ऑटोमेशन इंजिनीअरिंग, कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग ही अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

## अध्यासन केंद्रासाठी समिती गठित

मुंबई विद्यापीठांत जेष्ठ मार्गदर्शक प्रा. कै. बाळासाहेब आपटे यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करण्याची या अध्यायनासाठी जागा निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या अध्यायनासाठी आवश्यक त्या निधीची उपलब्धता आणि पद निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना

खासगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना आहे. अभिमत विद्यापीठांकरिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे २१ अभिमत विद्यापीठातील १४ हजार २३२ विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे

## चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर येथे एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र

रोजगाराभिमुख आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याला प्राधान्य देण्यात आले असून एसएनडीटी विद्यापीठाने महिलांना सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका केली असून, दुर्गम भागातील हे केंद्र महिलांना आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे ठरेल.

## युनिसेफ, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग यांच्यात सामंजस्य करार

सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (सीईई) इंडिया आणि ॲक्वाडॅम (ACWADAM) पुणे यांच्या तांत्रिक साहाय्याने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफ मुंबई यांनी एकत्र येऊन या अभ्यासक्रमाची रचना केली आहे. हा अभ्यासक्रम विनामूल्य असून इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील कोणीही या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो. उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफने एकत्र येऊन १३ जिल्ह्यांतील, ६ विद्यापीठांतील ३, हजार महाविद्यालयातील विद्यार्थी जोडले जातील. या कार्यक्रमादरम्यान ६,२०० हून अधिक प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले जाईल आणि ३,००० महाविद्यालयांमध्ये 'ग्रीन क्लब' तयार करून अध्यापन सामग्री तयार करणे, जलसंधारण उपक्रमांबद्दल अल्पकालीन मोहिमांचे प्रशिक्षण आदी उपक्रम राबवले जातील.

पर्यावरणविषयक कौशल्य, उद्योजकता हे सुद्धा ग्रीन क्लब अंतर्गत उपक्रमांचा एक भाग आहे. त्यात तरुणांना पाण्याची बचत करण्यासंबंधी सात उपाययोजना शिकवल्या जातील. ज्यामुळे पुढील ३ वर्षांमध्ये महाविद्यालयांमध्ये ४३ दशलक्ष घनलिटर पाण्याची बचत होईल.

## जागतिक पातळीवर भारतीय विद्यार्थी यशस्वी व्हावेत, यासाठी प्रयत्न




विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देऊन जागतिक पातळीवर विद्यार्थी यशस्वी व्हावेत आणि आदर्श जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि ब्रिटिश काऊन्सिल यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे जागतिक पातळीवर स्टार्टअप, नवीन संशोधन, इनोव्हेशन याला अधिक महत्त्व मिळणार आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्यपूर्ण विकास व्हावा, नवीन शैक्षणिक धोरणामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. उच्च शिक्षणाची गुणवत्ता अधिक बळकट करण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच भारत आणि यूके (UK) यांच्यातील शैक्षणिक सहकार्य अधिक वाढेल विद्यार्थ्यांना संशोधन आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. विद्यार्थी हे आपल्या देशाचे भवितव्य, राष्ट्राची संपत्ती व उद्याची उमेद आहे. राज्यातील शैक्षणिक परिस्थिती पाहता आणि भविष्याचा विचार करता विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि कमी खर्चात उच्च शिक्षण उपलब्ध करून देणे मोठे आव्हान आहे. शिक्षण हे जीवननिर्मित, मानवनिर्मित आणि चारित्र संपन्न व्यक्तिमत्त्व निर्माण करणारे असले पाहिजे. उच्च शिक्षणातसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण व्हावी, यासाठी विद्यार्थीहिताला प्राधान्य देण्यात येत आहे. भारताला ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्य व ज्ञानप्राप्ती आणि विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी, भारतातील लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षण व संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० लागू केलेले आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ



शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ करून वाचनसंस्कृतीला बळ देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील सुमारे १२ हजार ग्रंथालयांना लाभ जिल्हा व तालुका स्तरावरील अ आणि ब तसेच क आणि ड ग्रंथालयांना याचा लाभ.

नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील सुविधांसाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच कोविड-१९मुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचबरोबर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे 'लोक विद्यापीठ' झाले पाहिजे. समाजातील ज्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचले नाही. त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचून प्रमाणपत्र ते पदव्युत्तर असे गरजेनुसार शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाकडून विशेष प्रयत्न करून शिक्षणाचे प्रमाण अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न आहेत.

**विद्यार्थी व पालकांनी करिअरसंबंधी निर्णय घेताना 'मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील संधी' व त्याचबरोबर आव्हाने यांचा सांगोपांग विचार करणे हितावह आहे. वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी गरज आहे. डॉक्टर, दंततज्ज्ञ, वैद्य, फिजिओथेरपिस्ट, नर्स, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, फार्मासिस्ट इत्यादींची समाजाला आरोग्यसेवा मिळण्यासाठी गरज आहे.**

# मेडिकल व पॅरामेडिकल **क्षेत्रांतील करिअर संधी**

**डॉ. प्रीती सोनजे-सलगर**

मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रात करिअर करण्यासाठी दहावीनंतर अकरावीला विज्ञान शाखा निवडावी लागते. फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी विषय आवश्यक असतात. महाविद्यालयीन शिक्षणाच्या या टप्प्यावर पालकांनी विद्यार्थ्यांची ॲप्टिट्युड टेस्ट (कलचाचणी) करून घेतल्यास करिअरची योग्य दिशा व नियोजन करणे सुलभ होते. डॉक्टर होण्यासाठी पेशाची आवड व कष्ट करण्याची मानसिकता असणे आवश्यक ठरते.

बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण व राष्ट्रीय स्तरावरील नीट (NEET) परीक्षेच्या गुणवत्तेवर वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो. नॅशनल मेडिकल कमिशन (पूर्वीची मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडिया) या परीक्षांचे आयोजन करतात. मान्यताप्राप्त शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयांतून वैद्यकीय शिक्षण पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

आधुनिक वैद्यकक्षेत्रात (ॲलोपॅथी) बॅचलर ऑफ मेडिसीन ॲण्ड बॅचलर ऑफ सर्जरी (एमबीबीएस) हा साडेचार वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम असून एक वर्षाची इंटर्नशिप आहे. प्रथम वर्षाला अनॉटॉमी, फिजिऑलॉजी व बायोकेमिस्ट्री हे विषय अभ्यासावे लागतात. द्वितीय वर्षाला पॅथॉलॉजी, मायक्रोबायोलॉजी, फार्मकॉलॉजी, फॉरेन्सिक मेडिसीन, कम्युनिटी मेडिसीन हे विषय असतात. तृतीय वर्षाला ऑप्थॅल्मॉलॉजी, इएनटी (कान, नाक, घसा शास्त्र) मेडिसीन सर्जरी, ऑब्स्टोट्रिक्स व गायनॅकॉलॉजी, पेडिॲट्रिक्स, ऑर्थोपेडिक्स इत्यादी विषय अभ्यासक्रमात आहेत.

एमबीबीएस उत्तीर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर प्रवेशपरीक्षा 'नीट पी.जी.'च्या गुणवत्तेनुसार पदवीव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवता येतो. स्पेशालिस्ट बनण्यासाठी एम.डी./एम.एस. हे तीन वर्षाचे पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेसचे डी.एन.बी. पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

'सुपरस्पेशॅलिटी नीट'ची परीक्षा देऊन







डी.एम./एम.सी. एच. हे अतिविशेषोपचार (सुपर स्पेशॅलिटी) अभ्यासक्रम निवडता येतात. काही मोजक्याच वैद्यकीय महाविद्यालयात हे अभ्यासक्रम उपलब्ध असून या जागाही मर्यादित आहेत. त्यामुळे मेडिकल क्षेत्रात करिअर करण्यापूर्वी तीव्र स्पर्धा, विस्तृत अभ्यासक्रम व दीर्घकालीन अभ्यास करण्याची क्षमता यांचा कस लागतो. म्हणूनच करिअरचा निर्णय घेताना आवड लक्षात घ्यावी. भारतात वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर 'मेडिकल काऊन्सिल'चा परवाना मिळतो, पण परदेशात (उदा. चीन, रशिया इ.) वैद्यकीय शिक्षण घेतल्यास भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी 'फ्रॉईन मेडिकल ग्रॅज्युएट टेस्ट' परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

स्वतंत्र वैद्यकीय व्यवसायासाठी प्रचंड खर्च व प्रॅक्टिस सुरू राहण्यासाठी अपार मेहनत घ्यावी लागते. शासकीय नोकरी किंवा कॉर्पोरेट रुग्णालयात नोकरी हे पर्याय सुद्धा उपलब्ध आहेत.

ॲलोपॅथीव्यतिरिक्त आयुर्वेद, होमिओपॅथी तसेच युनानी या पॅथींचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना निवडता येतात.

आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयातून बीएएमएस (साडेचार) + १ वर्ष इंटर्नशीप असा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

दंततज्ज्ञ म्हणून करिअर करण्यासाठी चार वर्षांचा बी.डी.एस. अभ्यासक्रम असून एक वर्षाची इंटर्नशिप करावी लागते. त्यानंतर एम.डी.एस.चे पदवीव्युत्तर शिक्षण घेता येते. सध्या समाजात जागरूकता वाढत असल्यामुळे दंततज्ज्ञांना स्वतंत्र व्यवसाय किंवा नोकरी हे पर्याय निवडता येतात.

मान्यताप्राप्त महाविद्यालयातून बी.पी.टी. एच. हा पदवी अभ्यासक्रम शिकून फिजिओथेरपिस्ट म्हणून करिअर निवडता येते. फिजिओथेरपीमध्ये सुद्धा एम.पी.टी. एच. हा स्पेशलायझेशनचा भौतिकोपचार अभ्यासक्रम पूर्ण करता येतो.

तसेच निवडक महाविद्यालयांतून बीओटीएच हा ॲक्युपेशनल थेरपिस्टचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. ऑडिओलॉजिस्ट व स्पीचथेरपिस्ट म्हणून करिअर करण्यासाठी बी.ए.एस.एल.पी.चा अभ्यासक्रम निवडता येतो. काही विशिष्ट संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

ऑप्टोमेट्रिस्ट हे करिअर निवडण्यासाठी बी.एस.सी. (ऑप्टोमेट्री) हा अभ्यासक्रम निवडक संस्थांतून उपलब्ध आहे.

बॅचलर इन पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) हा नवीन अभ्यासक्रम विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांमधून उपलब्ध आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कॅथलॅब टेक्निशिअन, डायलिसिस टेक्निशिअन, ऑपरेशन थिएटर, रेडिऑलॉजी टेक्निशिअन इ. अभ्यासक्रम बारावी विज्ञानशाखा उत्तीर्ण झाल्यावर गुणवत्तेनुसार उपलब्ध आहेत.

नर्सिंग क्षेत्रात बी.एस.सी. (नर्सिंग) हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदवीव्युत्तर एम.एम.सी. नर्सिंग तसेच पी.एच.डी. नर्सिंग हे अभ्यासक्रम निवडक महाविद्यालयांतून उपलब्ध आहेत. मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील या संधी सेवा संशोधन तसेच शिक्षण या विविध पातळ्यांवर उपलब्ध आहेत. मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील या संधी शोधताना आव्हानांचाही ऊहापोह करणे गरजेचे वाटते. सर्व अभ्यासक्रम ज्ञानाधिष्ठित आहेत. अभ्यासक्रम पूर्ण करताना व नंतरही अनुभव हा घटक खूप महत्त्वाचा ठरतो. म्हणून कलचाचणी योग्य वेळी करून समुपदेशनाने आवड निवड लक्षात घेऊन करिअरचा निर्णय पालकांनी घ्यावा. केवळ पालकांची इच्छा म्हणून पाल्यांना मेडिकल क्षेत्रात जबरदस्तीने पाठवू नये.

**इंजिनीअरिंग व इतर -** कला, वाणिज्य इ. क्षेत्राशी तुलना करता मेडिकल अभ्यासक्रम दीर्घकालीन आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्याला समाधान देणारे करिअर निवडावे.

**(प्राध्यापक, शरीररचना शास्त्र, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, पुणे)**

**सध्या भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. याचबरोबर, जागतिक लोकसंख्येतही वाढ होत आहे. या वाढत्या लोकसंख्येची गरज भागवण्यासाठी कृषी उत्पादनात अधिकाधिक वाढ करणे आवश्यक आहे. जागतिक अन्न सुरक्षेची ही गरज भागवण्यासाठी कुशल, शिक्षित आणि व्यावसायिक कृषी मनुष्यबळाची गरज लागणार आहे. त्यामुळेच कृषी व्यावसायिक शिक्षण ही आताच्या काळाची गरज बनली आहे.**

# कृषी व्यावसायिक शिक्षण

**दीपक चव्हाण**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाच कृषी हा घटक आहे. देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. दिवसेंदिवस शेती या क्षेत्रात मोठे आधुनिक बदल होत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती या क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न होतो आहे. शेती क्षेत्राचा विकास आणि संशोधन होण्यासाठी राज्यातील अनेक कृषी विद्यापीठे कार्यरत आहेत. जगाच्या लोकसंख्येपैकी १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे. देशात उपलब्ध मनुष्यबळाच्या सुमारे ५२ टक्के रोजगार एकट्या कृषी क्षेत्रामध्ये उपलब्ध आहे.

## कृषी व्यवसाय

शेती हा व्यवसाय म्हणून उत्तम पद्धतीने केल्यास त्यामध्ये करिअर करता येते. शेती व्यवसायासाठी प्रशिक्षित तरुणांची गरज मोठ्या प्रमाणात भासत आहे. देशात ५३ कृषी विद्यापीठे, पाच अभिमत विद्यापीठे, एक केंद्रीय आणि केंद्रीय विद्यापीठ कार्यरत आहेत. या सर्व संस्थांमधून उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते. परदेशातील नव्या तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन करून शेती हा व्यवसाय म्हणून निवडला जाऊ शकतो.



कृषी शिक्षणाची सुरुवात सन १९०० नंतर देशात पाच कृषी महाविद्यालयांची स्थापना पुणे, नागपूर (महाराष्ट्र), कोईमतूर (तामिळनाडू), लायलपुर, पुसा (बिहार) या ठिकाणी स्थापन करून झाली आहे. या सर्व कृषी शिक्षण संस्थानी आज शंभरी ओलांडली असून, आज आपला देश कृषी तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन वाढीमध्ये स्वयंपूर्ण झाला आहे. यामध्ये या संस्थांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

## करिअर संधी

शेती विषयात माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेता येते. कृषी विद्यापीठांतर्गत कृषी संशोधन केंद्रामध्ये शास्त्रज्ञ या पदावर तसेच कृषी विस्तार अधिकारी म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध होते. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या विविध राष्ट्रीय संशोधन केंद्रांवर शास्त्रज्ञ म्हणून काम करता येते. तसेच राज्य सरकारच्या कृषी विभागामध्ये विविध पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध होते. स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतमध्ये विविध पदांवर कृषी अधिकारी म्हणून काम करता येते. तसेच आंतराष्ट्रीय बँका, आशियाई विकास बँक, आंतरराष्ट्रीय वित्त, कार्पोरेशन, बहुराष्ट्रीय कंपन्या, व कृषी आयात-निर्यातमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध होते.

## कृषी विद्यापीठे

१. महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर
२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
३. वसंतराव नाईक, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
४. डॉ. बाळासाहेब सावंत, कृषी विद्यापीठ दापोली, रत्नागिरी

## कृषी शिक्षणाचे महत्त्व

सद्य:स्थितीत कृषी क्षेत्रात मिळवलेल्या ज्ञानाचा तसेच तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांसाठी यशस्वीपणे उपयोग होत आहे. कृषी क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत असल्याचे चित्र आज दिसत आहे.

आपल्या देशातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था, शिक्षण संस्था, कृषी विद्यापीठे, केंद्रीय व राज्यस्तरीय कृषी व संलग्न विभाग, कृषिविषयक बी-बियाणे, खते, औषधेसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय कंपन्या, कृषी प्रक्रिया उद्योग, कंपन्या, निर्यात, विपणन, बँका, स्वयंसेवी व खासगी संस्था या व अशा विविध क्षेत्रांमध्ये कृषी-

**कृषी व संलग्न विषयातील अभ्यासक्रम**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयांची संख्या | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | बी.एस्सी. ऑनर्स (कृषी) | ९५ | १०,१३८ |
| २ | बी.एस्सी. ऑनर्स (उद्यानविद्या) | १६ | १,१७२ |
| ३ | बी.एस्सी. ऑनर्स (वनविद्या) | ०२ | ८२ |
| ४ | बी.एस्सी. ऑनर्स (सामुदायिक विज्ञान) | ०१ | ६० |
| ५ | बी.टेक (कृषी अभियांत्रिकी) | २१ | १,२२४ |
| ६ | बी. टेक. (कृषी जैवतंत्रज्ञान ) | १८ | १,३५० |
| ७ | बी. टेक (अन्नतंत्रज्ञान ) | २७ | १,६४० |
| ८ | बी. एफ. एस्सी. ऑनर्स (मत्स्यविज्ञान) | ०१ | ४० |
| ९ | बी. एस्सी. (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | १३ | ९६० |
| | **एकूण** | **१९४** | **१६,६६६** |

| महाराष्ट्रात कृषी व संलग्न क्षेत्रात कृषिशिक्षित लागणारे एकूण मनुष्यबळ | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कृषिविषयक संस्था** | **कृषी तांत्रिक/ कुशल पदांची संख्या** | **आवश्यक शिक्षण** |
| १ | आय.सी.ए.आर. संशोधन संस्था (राष्ट्रीय स्तरावर) - १०३ | १,०३० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर व आचार्य |
| २ | राज्यस्तरावरील राष्ट्रीय संस्था -१३ | ५०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर व आचार्य |
| ३ | कृषी विज्ञान केंद्र ४२ | ५०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर व आचार्य |
| ४ | चार कृषी विद्यापीठे | ५,००० | कृषि पदविका, पदवीधर, पदव्युत्तर व आचार्य |
| ५ | खासगी कृषी व संलग्न महाविद्यालये -१५२ | ७,८०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर व आचार्य |
| ६ | कृषी तंत्र विद्यालये -२३० | २,०२० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| ७ | राज्य शासन कृषी विभाग | १७,००० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| ८ | जिल्हा परिषदा /महानगरपालिका | ५,००० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| ९ | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ | २५० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| १० | साखर कारखाने व वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट | २,५०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| ११ | राज्य कृषी पणन महामंडळ व इतर | २०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| १२ | टिश्यु कल्चर लॅब व इतर | १०० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| १३ | बँका | ५,००० | कृषी पदवीधर, पदव्युत्तर |
| १४ | अन्नप्रक्रिया व इतर कृषी उद्योग | ५०० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| १५ | खत, बियाणे व कीटकनाशक संस्था | ५,००० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| १६ | कृषी सेवा केंद्र | १०,००० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| १७ | कृषी अवजारे तयार करणाऱ्या संस्था | ७,००० | कृषी पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| १८ | राष्ट्रीय/राज्यस्तर विभागातील तांत्रिक संधी | ५,००० | कृषी व संलग्न पदवीधर, पदव्युत्तर |
| १९ | पीक विमा कंपनी | १,५०० | कृषी व संलग्न पदवीधर, पदव्युत्तर |
| २० | कृषि पत्रकारिता | ५०० | कृषी व संलग्न पदवीधर |
| २१ | कृषिपूरक व्यवसाय (कुक्कुटपालन/ रेशीम/मत्स्यपालन/ दुग्धव्यवसाय | १०,००० | कृषी व संलग्न पदविका, पदवीधर, पदव्युत्तर |
| | **एकूण** | **८०,१००** | |

शिक्षित कुशल मनुष्यबळ गरजेचे आहे.

वरील सर्व विषयात उच्च शिक्षणाच्या (पदव्युत्तर/ आचार्य) संधी राज्यात चारही कृषी विद्यापीठात उपलब्ध आहेत. तसेच पारंपरिक शिक्षणासोबत असणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रीडास्पर्धा व अभ्यासेतर उपक्रम/स्पर्धा कृषी शिक्षणाच्या सर्व महाविद्यालयात आयोजित केल्या जातात. राज्यात कृषी शिक्षण घेतल्यानंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षणाच्या संधीदेखील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. कृषी शिक्षण हे व्यावसायिक असल्यामुळे शेतीचा व्यवसाय करणाऱ्यांसाठीदेखील या शिक्षणाचा उपयोग होतो.

याशिवाय भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) ही या देशातील जगातील सर्वांत मोठी राष्ट्रीय कृषी शिक्षण व संशोधन पद्धती असणारी संस्था आहे. महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये अविरतपणे सुधारित कृषी तंत्रज्ञानाविषयी संशोधन सातत्याने सुरू आहे. शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि या उपलब्ध कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती उत्पादन वाढावे, यासाठी कृषी विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी महाविद्यालये प्रचार आणि प्रसार करत असतात.

अशा प्रकारे महाराष्ट्रात कृषी व संलग्न क्षेत्रात कृषी शिक्षित लागणारे एकूण कुशल /तांत्रिक मनुष्यबळ ८०,१०० एवढे आहे. रिक्त होणाऱ्या पदांमुळे दरवर्षी एकूण मनुष्यबळाच्या ३ टक्के मनुष्यबळाची अतिरिक्त आवश्यकता असते.

कृषी क्षेत्र हे जगातील सर्वांत मोठे खासगी व्यावसायिक क्षेत्र आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या अधिकाधिक संधी असल्याने कृषीविषयक शिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत स्वायत्त संस्था आहे. सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या योजनांचे मूल्यांकन, प्रशिक्षण, कौशल्य विकास इत्यादीद्वारे ही संस्था समता आणि सामाजिक न्याय करण्यासाठी कार्य करते.**

# समता व सामाजिक न्याय

**सुनील वारे**

बार्टीमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना यूपीएससी एमपीएससी, आयबीपीएस व इतर अनुषंगिक स्पर्धा पूर्व प्रशिक्षण देणे, अधिछात्रवृत्ती माध्यमातून एम.फील/पीएच.डी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्थसाहाय्य बार्टीमार्फत देण्यात येते.

## संशोधन विभाग

बार्टी या संस्थेमार्फत समता, सामाजिक न्याय, नैतिक मूल्ये, राष्ट्रीय एकात्मता, जातीय सलोखा, भेदभावाचे उच्चाटन, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भातील अनेक पैलू, भारतीय समाजसुधारक यांच्या संदर्भातील संशोधनाचा अभ्यास करून शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक शिफारसीसह अहवाल सादर केला जातो. आत्तापर्यंत ९ प्रकल्पांचे अहवाल शासनाकडे सादर करण्यात आहेत. त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक : महान अर्थशास्त्रज्ञ हा एक उल्लेखनीय प्रकल्प पूर्ण बार्टीने पूर्ण केला आहे.

## सद्य:स्थितीत सुरू असलेले प्रकल्प

- महाराष्ट्र राज्यातील ५९ अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाबाबत बेंचमार्क सर्वेक्षण
- बंगाली नम:शूद्र समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या १३ मातंग परिषदांचे दस्ताऐवजीकरण होऊन सामाजिक सलोखा, सद्भावना वाढीस लागावा यासाठी एका अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली.
- अनुसूचित जातीचा विकास व पुढील आव्हाने यावर मंथन घडवून आणण्यासाठी आणणाऱ्या राज्यस्तरीय परिषदांचे आयोजन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

सामजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांपैकी महत्त्वाच्या योजनांचे मूल्यमापन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येते व तसा अहवाल राज्य शासनास सादर केला जातो.

आतापर्यंत विभागामार्फत १३ योजनांचे मूल्यमापन अहवाल शासनास सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही योजनांच्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या असून त्यानुसार शासन निर्णयांत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आलेले आहेत.



## सद्य:स्थितीतील प्रकल्प

१. सफाई कामगारांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना
२. रमाई आवास योजना
३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन योजना
४. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेबाबत जिल्हानिहाय माहिती संकलन करून धोरणात्मक अहवाल सादर करणे.
५. बार्टीच्या योजनांचे मूल्यमापन करणे. (अधिछात्रवृत्ती योजना BANRF)

## अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ (सुधारित अधिनियम २०१६)

अनुसूचित जाती अनुसूचित जमातींवरील अत्याचारास पायबंद बसावा हा या मागचा मूळ उद्देश आहे. या

कायद्यानुसार अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती सदस्यावर अत्याचार करेल ते कृत्य गुन्हा ठरवण्यात येईल. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती समुदायांना हिंसाचार आणि सामाजिक भेदभावापासून संरक्षण मिळावे, यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. प्रतिबंध कायदा प्रशिक्षण बार्टी संस्थेमार्फत २०१४-१५ पासून तालुका व जिल्हास्तरीय ॲट्रोसिटी प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते. आतापर्यंत एकूण १७३ ॲट्रोसिटी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

२०१३ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सुरू करण्यात आली. त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील एम.फिल व पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता प्रोत्साहन व आर्थिक सहाय्याच्या स्वरूपात अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) २०१३ ते २०२१ करिता एकूण २,२६४ विद्यार्थ्यांनी अधिछात्रवृत्तीचा लाभ घेतला आहे. त्यापैकी एम.फिल, पीएच.डी अभ्यासक्रमांचा कालावधी पूर्ण केलेल्या एकूण ५३० विद्यार्थ्यांनी शोधप्रबंध



सादर केलेले आहेत.

## समतादूत

राज्यात तालुकास्तरावर समतादूत नेमण्यात येतात. समतादूतांचे मुख्य कार्य बार्टी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना समाजामध्ये पोहोचवणे, समाजात सामाजिक सलोखा, बंधुभाव निर्माण करणे, दुर्बल घटकांतील युवक-युवतींच्या आर्थिक, सामाजिक व वैचारिक विकास साधून आदर्श नागरिक घडवणे याकरिता स्वयंसाहाय्यता युवा गट तयार करणे, तरुणांना समाजाच्या सर्वांगीण विकासाठी उद्योग व्यवसाय सुरू करणे, दुर्बल घटकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम समतादूतमार्फत केले जाते.

## प्रत्येक घरात संविधान

भारतीय संविधान या ग्रंथास विविध संस्था, शाळा, कॉलेज, ग्रंथालय, लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांच्याकडून या ग्रंथास विशेष मागणी आहे. प्रत्येक नागरिकास संविधान वाचता यावे, यासाठी प्रत्येक घरात संविधान ही मोहीम बार्टीमार्फत सुरू करण्यात आली आहे.

तसेच येरवडा येथे सांस्कृतिक केंद्र, शिल्पसृष्टी महाड येथे म्युझिकल फाँटन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित विविध स्थळांचे चित्रीकरण, त्यांचे परदेशात वास्तव्य असलेली ठिकाणे, लंडन, अमेरिका, नेपाळ, ब्रह्मदेश, श्रीलंका इत्यादी देशात भेटी दिलेल्या स्थळांचे संशोधन/त्याचे चित्रीकरण इ. महत्त्वाचे प्रकल्प बार्टीमार्फत राबवण्यात येणार आहे. त्यामुळे बार्टीचे कार्य तळागाळातील लोकांपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार आहे.

## बार्टी संस्थेला आंतरराष्ट्रीय नामक प्रमाणपत्र प्राप्त

बार्टी संस्थेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली ९०००/२०१५ अंतर्गत प्रणालीचा विकास, मूल्यांकन तपासणी, कागदपत्रे पडताळणी, अंतर विश्लेषण, पुनर्रचना विकास, साहित्य प्रशिक्षण, कौशल्य विकास व्यवस्थापन, संस्थेच्या कामकाजात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय मानक संस्थेने बार्टी संस्थेला आयएसओ प्रमाणपत्र बहाल केले आहे.

राज्यात कार्यरत असणाऱ्या संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रात बार्टीचा नावलौकिक मोठ्या प्रमाणावर आहे. लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्याचे काम बार्टीच्या माध्यमातून करण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय महापुरुषांच्या विचारांवर आधारित समाजातील सर्व घटकांचा समग्रपणे विकास घडवण्यासाठी बार्टी नेहमीच कटिबद्ध असणार आहे. येणाऱ्या काळातही बार्टीकडून विविध शैक्षणिक प्रशिक्षण परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी नियोजन करण्यात येणार आहे.

(लेखक हे बार्टी संस्थेमध्ये महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.)

## बार्टींतर्गत योजना

यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. पोलीस व मिलिटरी, बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी तत्सम पदाच्या परीक्षेकरिता पात्र उमेदवारांना मोफत (निवासी व अनिवासी) प्रशिक्षण देण्यात येते. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधीत ही बार्टी संस्थेमार्फत ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देऊनही योजना अखंड सुरू ठेवली.

१. यशदा येथे युवा नागरी सेवा - सीएसपी परीक्षेचे प्रशिक्षण देणे.
२. भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्रामध्ये यूपीएससी नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण देणे.
३. दिल्ली येथील कोचिंग संस्थांमध्ये युपीएससी पूर्व परीक्षा नागरी सेवा प्रशिक्षण देणे.
४. महाराष्ट्र राज्यातील सहा महसूल विभागातील खासगी संस्थेमध्ये यूपीएससी पूर्व परीक्षेच प्रशिक्षण देणे.
५. युपीएससी नागरी सेवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण देणे. यूपीएससी नागरी सेवा व्यक्तिगत चाचणी परीक्षेसाठी अर्थसाहाय्य करणे. अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, मुलाखत, भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा, मुलाखतीसाठी अर्थसाहाय्य करणे.
६. युपीएससी निवासी प्रशिक्षण देणे, बँक, रेल्वे, एलआयसी, पोलीस भरती व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण देणे.
७. यूजीसी नेट/सेट ऑनलाइन प्रशिक्षण देणे.

**विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध संशोधन व प्रशिक्षण प्रकल्प, कार्यक्रम तसेच उपक्रम राबवण्यासाठी 'महाज्योती' संस्थेची स्थापना झाली आहे.**

# बहुजनांच्या विकासासाठी

**सुवर्णा पगार**

'महाज्योती' संस्थेमार्फत अनेक उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यात येतात. विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गांच्या जातीच्या युवक-युवतींचा अनेक माध्यमातून विकास घडवण्याच्या कामात या संस्थेचा मोठा हातभार लाभला आहे.

## महाज्योतीची उद्दिष्ट्ये

- इतर मागासवर्गीय (ओबीसी), विमुक्त जाती (व्हीजे), भटक्या जमाती (एनटी), आणि विशेष मागास वर्ग (एसबीसी) मधील वंचित व उपेक्षित जनसमूहांशी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करून तसा अहवाल सरकारला सादर करणे.
- कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच रोजगार, स्वयंरोजगार, उद्यमशीलता, औद्योगिक घटकांची उभारणी व विकास यासाठी क्षमता निर्मित करणे, विविध सर्वेक्षण व संशोधन करून एक डाटा बँक, ग्रंथालये, ज्ञान बँक (knowledge bank) विविध क्षेत्रातील अभ्यास व समन्वय मंडळे स्थापन करणे, ते विकसित करणे.
- लघु उद्योजक, शेतकरी आणि महिलांना विकासाची दिशा दाखवणारे, मार्गदर्शन करणारे, समुपदेशन केंद्रे स्थापन करणे.
- नोकरीसाठी विविध स्पर्धा परीक्षा, उद्योग, व्यवसाय इत्यादींसाठी प्रशिक्षण, कोचिंग इ. प्रदान करणे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्टायपेंड, शिष्यवृत्ती, फेलोशिप अनुदान देणे.
- सामाजिक स्तर उंचावण्यासाठी धोरणात्मक कार्यवाही करणे, सामाजिक शास्त्राच्या विविध क्षेत्रांशी संबंधित विविध कार्यक्रम, उपक्रम इत्यादींशी संबंधित कृती संशोधन कार्यक्रम राबवणे. लक्ष्य गटांकरिता सामाजिक नियोजन, घटनात्मक कर्तव्ये आणि अधिकारांसह विविध क्षेत्रांमध्ये योग्य आणि व्यावसायिक कौशल्य प्राप्त करणे.राष्ट्रीय एकात्मता आणि वैज्ञानिक स्वभावाचा प्रचार करणे. त्याकरिता बंधुता, जातीय सलोखा आणि शांततापूर्ण सहअस्तित्व वाढवणे. स्वच्छता, सत्यशोधक विवाह, व्यसनमुक्ती, आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- सामाजिक न्यायाचा प्रचार प्रसार करणे. लिंगभेद, जातीय भेदभाव, वंश पूर्वाग्रह आणि अंधश्रद्धा दूर करणे. महिला सक्षमीकरणाकरिता हुंडा निर्मूलन, जात-पंचायती, सामाजिक बहिष्कार, घरगुती हिंसाचार याबाबत विविध शैक्षणिक कार्यक्रम राबवणे. सामाजिक माध्यमांचा वापर करून यावर निबंध, वाद-विवाद, चर्चा घडवून आणणे.
- रोजगार, स्वयंरोजगार, उद्योजकता, कृषी औद्योगिक घटकांसह औद्योगिक युनिटस्‌ची स्थापना आणि विकास यासाठी क्षमता निर्माण करणे. त्याकरिता विविध सर्वेक्षणांचा अभ्यास करणे, मूल्यमापन कौशल्य विकास प्रशिक्षण राबवणे.



## पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण योजना

**उद्देश :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना महाराष्ट्रातील तसेच केंद्रातील पोलीस सेवेत संधी मिळण्यासाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण दिले जाते.

**स्वरूप :** महाज्योतीमार्फत हे प्रशिक्षण हे ऑफलाइन स्वरूपात राबवण्यात येते,

या प्रशिक्षणात लेखी परीक्षेतील सामान्य अध्ययन, मराठी व्याकरण, अंकगणित, बुद्धिमत्ता चाचणी या घटकांचे तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकाच्या मार्फत ऑफलाइन प्रशिक्षण देण्यात येते.

**अर्ज प्रक्रिया :** प्रशिक्षणास इच्छुक नॉनक्रिमिलेअर उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर मागवण्यात येतात.

## जेईई/नीट/एमएचटी-सीईटी परीक्षेचे प्रशिक्षण योजना

**उद्देश :** इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना JEE/NEET/MHT-CET परीक्षेत यश मिळून अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळण्यासाठी JEE/NEET/MHT-CET परीक्षेचे प्रशिक्षण देणे.

**स्वरूप :** हे प्रशिक्षण महाज्योतीच्या डिजिटल क्लासरूममधून ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येते, प्रशिक्षणात संबंधित परीक्षेतील गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या घटकांचे तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येते.

**पात्रतेचे निकष :** विद्यार्थ्याने अकरावीसाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे. शहरातील विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत ७०%, तर ग्रामीण, आदिवासी किंवा नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना ६०% गुण असणे आवश्यक आहेत.

## पीएच.डी. करणाऱ्या उमेदवारांना अधिछात्रवृत्ती योजना

महाज्योतीच्यावतीने ओबीसी, भटक्या जाती-जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ, महाविद्यालय, संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्ण वेळ व नियमितरीत्या संशोधन करण्यात यावे, यासाठी कमाल पाच वर्षांसाठी अर्थसाहाय्य करण्याची योजना राबवण्यात येते. यात पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमाह ३१,००० रुपये; तसेच घरभाडे आणि आकस्मिक निधी दोन वर्षांसाठी देण्यात येतो. उर्वरित ३ वर्षांसाठी ३५,००० अधिछात्रवृत्ती देण्यात येते.

**संपर्क :** या योजनेचा लाभ घेण्यासाठी नॉनक्रिमिलेअर उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून अर्ज महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात येतात.

उमेदवाराने कोणताही रोजगार/स्वयंरोजगार करत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

## एमपीएससी प्रशिक्षण योजना

**उद्देश :** महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागात अधिकारी म्हणून कार्य करण्याची संधी मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील



उमेदवारांना मिळावी, यासाठी एमपीएसी परीक्षेचे प्रशिक्षण दिले जाते.

**स्वरूप :** हे प्रशिक्षण नामांकित संस्थेत ऑफलाइन पद्धतीने दिले जाते. प्रशिक्षणास ग्रामीण, आदिवासी तसेच नक्षलग्रस्त क्षेत्र, निमशहरी व शहरी भागातील विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

## यूपीएससी प्रशिक्षण योजना

**उद्देश :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना यूपीएससी परीक्षेत यश मिळून संघ लोकसेवा आयोगामार्फत अधिकारी म्हणून कार्य करण्याची संधी मिळण्यासाठी यूपीएससी परिक्षेचे प्रशिक्षण दिले जाते.

**स्वरूप :** उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात येतात. पात्रता परीक्षेच्या आधारे उमेदवारांची निवड केली जाते.

प्रशिक्षणात ग्रामीण, आदिवासी तसेच नक्षलग्रस्त क्षेत्र, निमशहरी व शहरीभागातील नॉनक्रिमिलेअर विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.

## मुलाखतीसाठी अर्थसाहाय्य योजना

यूपीएससी मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना एकरकमी २५,००० रुपये अर्थसाहाय्य करण्यात येते.

## कमर्शिअल पायलट प्रशिक्षण योजना

व्यावसायिक वैमानिक (Commercial Pilot) प्रशिक्षणांतर्गत दरवर्षी २० विद्यार्थ्यांना नागपूर फ्लाईंग क्लबमार्फत मूलभूत प्रशिक्षण सुविधा देण्यात येते.

**निकष :** ● उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. तसेच तो भटक्या जाती, विमुक्त जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गापैकी असावा. ● उमेदवार हा नॉन क्रिमिलेअर गटातील असावा. ● उमेदवाराची वयोमर्यादा किमान १८ वर्षे ते २८ वर्षे असावा. ● उमेदवार हा बारावी विज्ञान शाखेतून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित हे विषय घेऊन पहिल्या प्रयत्नात ६५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. ● शहरी भागातील उमेदवार बारावी विज्ञान शाखेतून ७०% गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेला असावा. ● जो उमेदवार हा १० वर्ग हा नगरपंचायत किंवा ग्रामपंचायत क्षेत्रातून उत्तीर्ण झालेला/झालेली असेल अशा उमेदवारांना ग्रामीण क्षेत्रातील समजण्यात येईल. ● प्रवेशाच्या एकूण २० जागांपैकी ५०% जागा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

वंचित आणि दुर्लक्षित घटक यांच्या सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक विकासाच्या अनुषंगाने संशोधन व अभ्यास करण्यासाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या संस्थेमार्फत विविध योजना, उपक्रम राबवले जातात.

२०२२-२३ या वर्षासाठी लाभ घेतलेल्या ४४ विद्यार्थ्यांमधून ११ विद्यार्थी संघ लोकसेवा आयोगाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण झाले आहे.

वरिष्ठ साहाय्यक, महाज्योती.

**राज्य शासनाने मराठा, कुणबी यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी या संस्थेची स्थापना केलेली आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती येथे वसतिगृह, अभ्यासिका, ग्रंथालय, कौशल्य विकास केंद्रे विकसित करण्यात आलेली आहेत.**

# ‘सारथी’च्या विशेष योजना

**अशोक काकडे**

मराठा, कुणबी या समाजातील महिला तरुण विद्यार्थी, शेतकरी अशा विविध घटकांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने विविध उपक्रम प्राधान्याने राबवलेले आहेत. या गटातील समाज हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या प्रगत होण्यासाठी राज्य सरकारने विशेष उपाययोजना केलेल्या आहेत.

## अधिछात्रावृत्ती अभिनव उपक्रम

सहायक प्राध्यापक, विविध संशोधन संस्थांच्या ठिकाणी नोकरीच्या संधी निर्माण व्हावी, भविष्यामध्ये लक्षित गटाच्या विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढावा, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढावे, यासाठी ‘छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती’ ही योजना सुरू करण्यात आली आहे.

अधिछात्रवृत्ती उपक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये एकूण ५०३, सन २०२० मध्ये एकूण २०४, सन २०२१ मध्ये एकूण ५५१ व सन २०२२ मध्ये एकूण ८५१ असे एकूण २१०९ अधिछात्रवृत्तीधारकांनी लाभ घेतलेला आहे.

## शाश्वत वृद्धी कौशल्य विकास

शाश्वत वृद्धी व विकास होण्यासाठी प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ असणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर उद्योग व इतर क्षेत्रांतील कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांना आधुनिक तंत्रज्ञानानुरूप कौशल्य प्रशिक्षणाद्वारे उत्पादनक्षम बनवण्याच्या सारथी संस्थेचा प्रयत्न असतो.

१) छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (CSMS-DEEP). या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये एकूण ४ मॉड्युलचा समावेश करण्यात आला आहे.

- इंग्रजी भाषेतील कौशल्ये, संप्रेषण कौशल्ये आणि सॉफ्ट स्किल्समधील प्रमाणपत्र.
- मूलभूत माहिती तंत्रज्ञानातील प्रमाणपत्र.
- डोमेन :- विशिष्ट मूलभूत डिजिटल कौशल्यांमध्ये प्रमाणपत्र जसे :- डेटा एंट्री आणि डेटा व्यवस्थापन, प्रगत एक्सेल अकाऊंटिंगसह डेटा व्यवस्थापन, डिझाइनिंग, हार्डवेअर आणि नेटवर्किंग, प्रोग्रामिंग, डिजिटल फ्रिलान्सिंग, व्यवस्थापन.
- डोमेन :- विशिष्ट प्रगत डिजिटल कौशल्यांमध्ये प्रमाणपत्र.

वरील प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यातून लक्षित गटातील २०,००० उमेदवारांना नि:शुल्क प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षणाकरिता प्रवेश घेण्यासाठी सारथी व MKCLच्या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेश अर्ज उपलब्ध आहे.

२) श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टुल रूम (IGTR), औरंगाबाद

इंडो जर्मन टुल रूम (IGTR), औरंगाबाद ही संस्था भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय या विभागांतर्गत काम करते. औरंगाबाद, पुणे, नागपूर व कोल्हापूर या प्रशिक्षण केंद्रांमधून पुढील अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

१) सीएनसी टर्निंग आणि मिलिंगमधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, २) कंडेन्स्ड कोर्स इन टूल अँड डाय मेकिंग, ३) सीएनसी मशिनिंगमधील ॲडव्हान्स सर्टिफिकेट कोर्स, ४) मशिनमधील ॲडव्हान्स सर्टिफिकेट कोर्स, डॅनलॉमिनटॉइज ५) / CAM, ६) CAD/CAM मध्ये मास्टर सर्टिफिकेट कोर्स, ७) कॉम्प्युटर टूल इंजिनीअरिंगमधील मास्टर सर्टिफिकेट कोर्स, ८) ॲडव्हान्स डिप्लोमा इन स्ट्रक्चरल डिझाईन आणि ॲनालिसिस, ९) रूम एअर कंडिशनर आणि ॲप्लिकेशन

या प्रशिक्षणाचे संपूर्ण शुल्क सारथीमार्फत देण्यात येते. या प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांना रोजगार व स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

३) राजमाता जिजाऊ सारथी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS).

या प्रशिक्षणांतर्गत १२०० पेक्षा अधिक कार्यक्रमांचे प्रशिक्षण ५ स्टार, ४ स्टार व ३ स्टार रेटिंग असलेल्या संस्थेमधून २०,००० उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

## विविध प्रकाशने

सारथी छत्रपती शिवाजी महाराज स्मृती ग्रंथ, सारथी दिनदर्शिका तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती ग्रंथ प्रकाशित करून विविध कार्यालयांना, ग्रामपंचायत कार्यालये, शासनमान्य माध्यमिक शाळा,

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, महानगरपालिका कार्यालय, नगरपालिका कार्यालय, नगरपंचायत कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, शासकीय ग्रंथालये इ. कार्यालयांना सारथी संस्थेमार्फत विनामूल्य वितरित केले जाते.

### करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिर

सारथी संस्थेने तज्ज्ञ समुपदेशकांच्या मदतीने विभागस्तरीय करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरे कोल्हापूर, लातूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नशिक, मुंबई या ठिकाणी आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना स्वत:ची ओळख व्हावी, विविध अभ्यासक्रमांची ओळख, नोकरीची उपलब्ध कार्यक्षेत्रे तसेच ताणतणावाचे व्यवस्थापन इत्यादी विषयांवर मार्गदर्शन, चर्चा, शंका समाधान या विषयांचे आयोजन केले जाते.

### सयाजीराव गायकवाड परदेश शिक्षण शिष्यवृत्ती

लक्षित गटातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाकरिता जागतिक स्तरावरील रँकिंगमध्ये (QS) २००च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतल्यानंतर ही शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांला येणारा खर्च, भत्ता, सारथी मार्फत केला जातो.

### डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. भारतातील निवडक २०० कॉलेजेसमध्ये शिक्षण घेणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. लक्षित गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींच्या शिक्षणातील अडचणी दूर करून सर्वसमावेशक सर्वांगीण विकास घडवून आणणे, हा उद्देश आहे.

### निधीची तरतूद

सारथीचे विविध उपक्रम राबवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधीची गरज असते. सन २०२२-२३ साठी १६९.७३ कोटी इतकी व सन २०२३-२४ साठी ३०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

### भविष्यकालीन योजनांचा आराखडा

संस्थेच्या शैक्षणिक विकासासाठी अल्पकालीन तथा दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document) - २०३० तयार करण्यात आला आहे.

भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document)- २०३० मध्ये एकूण १२४ योजना प्रस्तावित केल्या असून २०३० पर्यंत ४,३५० कोटी रुपये इतक्या खर्चाचे नियोजन केले आहे. तसेच सारथी संस्थेचे मुख्यालय, विभागीय कार्यालये व वसतिगृह यांच्या उभारणीकरिता अंदाजित १,६०० कोटी रुपये इतक्या खर्चाचे नियोजन आहे.

### छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पातळीवर NMMS (National Merit Cum Means Scholarship) धर्तीवर सारथीने शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

बुद्धिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळावे, आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखता यावी, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र राज्यातील NMMS ही शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेले; पण केंद्र सरकारची शिष्यवृत्ती अप्राप्त असलेल्या लक्षित गटातील तसेच आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता ९वी ते १२ वी पर्यंत नियमित शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सारथीने ही शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

२०२२-२०२३ या वर्षात इयत्ता नववी मधील १३,१२७ व इयत्ता दहावीमधील ९,१७३ अशा एकूण २२,३०० विद्यार्थ्यांना ९६००/- प्रमाणे २१,४०,८०,००० इतकी शिष्यवृत्ती प्रदान केली आहे. सदर शिष्यवृत्ती प्राप्त करण्यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय आहे.

### कृषी योजना

लक्षित गटातील सदस्यांना शेती व शेतीपूरक व्यवसायातील कौशल्य विकास प्रशिक्षणे देऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे हा उद्देश ठेवून खालील योजना राबवण्यात येतात.

- **शेती प्रशिक्षण आयोजित करणे -** राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि महाराष्ट्र राज्य पणन अंतर्गत ५,००० शेतकऱ्यांना, उद्योजकांना उच्च तंत्रज्ञानावर आधारित हरितगृहातील शेतीबाबत प्रशिक्षण आयोजित करणे, निवासी प्रशिक्षणे, साईट पाहणी करणे, वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील IFAT व WBAT या व्यावसायिक शिक्षण घेण्याकरिता साहाय्य करणे.
- **बांधावरील प्रयोगशाळा -** लक्षित गटातील शेतकऱ्याला बांधावरच जैविक खते, जैविक कीटकनाशके कमी खर्चात उपलब्ध करून देणे, यासाठी सारथी प्रयत्नशील आहे.
- **शेतकरी मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापना करणे -** राज्यातील मुंबई व नवी मुंबई वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये शेतकरी मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रे स्थापना करून शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञान सल्ला देणे, आधुनिक पीक मशागत पद्धती, पीक संरक्षण व नवीन तंत्रज्ञान केंद्रे स्थापना करणे.

### विविधांगी प्रशिक्षणांचे आयोजन

होतकरू विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या MPSC महाराष्ट्र आभियंत्रिकी सेवा (MPSC-MES) तयारीकरिता विद्यावेतन देणे, नामांकित कोचिंग संस्थेत निःशुल्क प्रशिक्षण देणे, वैयक्तिक मार्गदर्शन करणे, विषयाच्या अनुषंगाने तज्ज्ञांचे मार्गदर्शन करणे, वैयक्तिक विकास यासारखे इ. उपक्रम सारथीमार्फत राबवले जातात.

**(लेखक सारथी संस्थेत व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत.)**

**भारतातील उच्च शिक्षण संस्थांच्या मानांकनाचा सन २०२३ चा अहवाल नुकताच जाहीर झाला आहे. शिक्षण आणि संशोधन, शोध आणि व्यावसायिक कार्यप्रणाली, पदवी परिणाम, संपर्क आणि समावेशिता, कल्पना, नवीन संशोधन या मापदंडावर संस्थांचे मानांकन ठरत असते. त्यात महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि संस्थांचा क्रमांक यादीत वरचा असावा, त्यासाठी विद्यापीठांनी गुणात्मक सुधारणा करावी. उच्च शिक्षणाच्या विस्तारात दर्जा आणि समान संधीवर भर देणे या दोन पर्यायांवर उच्च शिक्षणाचा विकास करणे आवश्यक असते.**

# शैक्षणिक संस्थांची उपयुक्तता

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

भविष्यातील शैक्षणिक क्षेत्राला चालना देण्यासाठी मुक्त, नावीन्यपूर्ण, बहुविद्याशाखीय उच्च शिक्षण प्रणाली आत्मसात करणे गरजेचे आहे.

## नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क

नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क(NIRF) रँकिंग सिस्टिम ही भारतातील शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता व कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक संस्थांसाठी मौल्यवान साधन म्हणून काम करते. अध्यापन, संशोधन, पदवी परिणाम, रोजगार, आउटरीच साधने, ग्रंथालय सुविधा यांसारख्या बाबींचा विचार करून रँकिंग संस्थांचे सर्वसमावेशक मूल्यमापन केले जाते.

केंद्र सरकारने विद्यापीठांच्या मानांकनाबाबत अत्यंत पारदर्शी प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २०१५-१६ पासून एनआयआरएफची प्रक्रिया सुरू झाली.

मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी २९ सप्टेंबर २०१५ प्रक्रियेची सुरुवात केली. गुणवत्तेच्या आधारावर शैक्षणिक संस्थांचे मानांकन करण्याचे काम क्युएस रँकिंग, टाइम्स रँकिंग यांसारख्या पश्चिमी संस्था करत. त्यांचे निकष ही प्रामुख्याने पश्चिमी दृष्टिकोनातून आलेले असत. भारतीय शिक्षण संस्थांचे नेमके प्रतिबिंब त्यामध्ये उमटत नसायचे.




त्यामुळे केंद्र सरकारने विद्यापीठांच्या मानांकनाबाबत अत्यंत पारदर्शी प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. एनआयआरएफमध्ये १२ प्रकारच्या प्रवर्गात मानांकनाची सुविधा आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, तसेच विषयनिहाय जसे विधि महाविद्यालये, कृषी, वैद्यकीय महाविद्यालये, फार्मसी, दंतचिकित्सा महाविद्यालये आदींचा यामध्ये समावेश आहे. प्रामुख्याने पाच निकषांच्या आधारावर मानांकन ठरवले जाते.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे आणि ते कोणत्या शिक्षण संस्थेमध्ये मिळेल याची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, यासाठी दरवर्षी शिक्षण मंत्रालयाकडून या मानांकनांची घोषणा केली जाते. यंदाच्या एनआयआरएफ रँकिंगची घोषणाही केंद्रीय शिक्षण राज्यमंत्र्यांकडूनच ५ जून २०२३ला करण्यात आली.

२०१५ ते २०१८ या दरम्यान या मानांकनासाठी अर्ज दाखल करणाऱ्या संस्थांचे प्रमाण अडीच ते साडे तीन हजारांच्या दरम्यान राहिले. हे लक्षात घेता २०१८ मध्ये प्रत्येक शैक्षणिक संस्थेने आपले मानांकन करून घेणे सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार २०२३ मध्ये जवळपास ८६०० संस्थांनी आपले मानांकन करून घेतले आहे. यातून प्रत्येक क्षेत्रातील १००-२०० उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांचे मानांकन करण्यात आले आहे.

## नॅक आणि एनआयआरएफ

आजघडीला देशामध्ये नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रेडिटेशन कौन्सिल ऊर्फ नॅक ही संस्थाही एनआयआरएफप्रमाणेच शैक्षणिक संस्थांची एकूण कामगिरी आणि कार्यपद्धती पडताळून मानांकन देत असते; परंतु या दोन्हीमध्ये एक मूलभूत फरक आहे. नॅकचे मानांकन दर पाच वर्षांनी जाहीर केले जाते; पण एनआयआरएफचे मानांकन दरवर्षी दिले जाते. याखेरीज नॅकपेक्षा एनआयआरएफमध्ये असणाऱ्या निकषांचे प्रमाण वेगळे आहे. नॅकचे मानांकन हे केवळ त्या संस्थेपुरते मर्यादित असते. पण

एनआयआरएफमध्ये तुलनात्मक अभ्यास करून गुणांकन दिले जाते. त्यामुळे या दोन्हींची उद्दिष्टे सारखी असली तरी प्रक्रिया भिन्न आहेत.

## महाराष्ट्राची स्थिती

एनआयआरएफमध्ये देशातील ८५०० शिक्षण संस्थांमधील सर्वांत आघाडीच्या १०० संस्थांची निवड केली जाते. याखेरीज विद्यापीठनिहाय, महाविद्यालयनिहाय, संशोधन संस्थानिहाय रँकिंगही काढले जाते. यापैकी ओव्हरऑल मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा समावेश पहिल्या दहा संस्थांमध्ये होता. २०१८ ते २०२३ अशी सलग पाच वर्षे आयआयटी चेन्नई पहिल्या स्थानावर आहे. इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, बेंगलोर (आयआयएस) ही संस्था संशोधनाच्या क्षेत्रात सातत्याने पहिल्या स्थानावर आहे. हे सातत्य टिकवून ठेवण्यामागचे प्रयत्न काय आहेत, याचा तुलनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यातून एक गोष्ट लक्षात येते की, गुणवत्ता टिकवून ठेवणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. त्या दृष्टिकोनातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. महाराष्ट्राबाबत विचार करता संशोधनाची गुणवत्ता, माहितीचे अचूक आणि सिस्टेमॅटिक संकलन यावर जोर द्यायला हवा.

आयआयटी आणि आयआयएस यांच्या तुलनेत आपल्या विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.

माहितीही संकलित स्वरूपात असणे गरजेचे आहे. केवळ पेटंट नोंदणी नाही, तर त्याचा व्यावसायिक उपयोग व्हायला हवा. याखेरीज पब्लिक पर्सेप्शनबाबत आपल्याकडे मोठी अनास्था आहे. राष्ट्रीय पातळीवरील संस्था याबाबत गांभीर्याने प्रयत्न करताना दिसतात. यामध्ये आपल्या माजी विद्यार्थ्यांना, स्थानिक प्रतिष्ठित लोकांना चांगला अभिप्राय देण्याचे आवाहन केले जाते. तसे प्रयत्न आपल्याकडील संस्थांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### एनआयआरएफचे पाच प्रमुख निकष

१) **टीचिंग ॲण्ड लर्निंग -** यामध्ये प्रामुख्याने शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे हे तपासले जाते. याखेरीज पीएच.डी.चे विद्यार्थी किती आहेत, कोणकोणत्या विषयावर तेथे संशोधन केले जाते, शिक्षक कोणकोणत्या प्रकारचे आहेत, ते कायमस्वरूपी आहेत की तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत, कोणकोणते विषय शिकवले जातात आणि यावर शैक्षणिक संस्था किती निधी खर्च करते, या मुद्यांवरही विचार या निकषांतर्गत केला जातो.

२) **संशोधन -** सदर महाविद्यालयांकडून अथवा विद्यापीठांकडून, प्राध्यापकांकडून ठरवून दिलेल्या संशोधनपत्रिका, इंडेक्समध्येच ते प्रकाशित होतात का, सायटेशन्स तपासली जातात. नोंदणी झालेल्या पेटंटचा विद्यापीठासाठी, विद्यार्थ्यांसाठी, व्यावसायिकरीत्या काही उपयोग होतो आहे का हे पाहिले जाते. कारण संशोधन हा उच्च शिक्षणाचा गाभा आहे. पश्चिमी देशांच्या शैक्षणिक संस्था या प्रामुख्याने पेटंटवरच आणि त्याच्या व्यावसायिकतेवर आधारलेल्या आहेत. संशोधन करणे, त्याचे पेटंट नोंदवणे, त्या पेटंटचे व्यावसायिक हक्क मिळवणे आणि त्यातून पैसा मिळवणे, या आधारावर पश्चिमी संस्था भरभक्कम पैसा कमवत आहेत. हे पाहिले जाते.

३) **ग्रॅजुएशन आउटकम -** कोणत्याही शिक्षण संस्थेतून पदवी प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष बाजारात किती मागणी आहे, त्यांना किती महत्त्व आहे, त्यांना रोजगार मिळतो का, त्यांना देण्यात येणारे शिक्षण बाजाराशी पूरक आहे का, समाजाच्या आणि उद्योगांच्या गरजा लक्षात घेणारे शिक्षण तेथे दिले जाते का, त्या आधारावर संशोधन केले जाते का याची पडताळणी केली जाते.

४) **इन्क्लुजविटी / सर्वसमावेशकता -** यामध्ये तीन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे शिक्षण संस्थेमध्ये परदेशातील विद्यार्थी किती प्रमाणात येतात, त्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया त्या संस्थेत आहे का, विद्यार्थिनींची संख्या किती आहे, दिव्यांगांसाठी सुविधा कोणत्या आहेत हे पाहिले जाते.

५) **पब्लिक पर्सेप्शन -** यामध्ये सदर शैक्षणिक संस्थेविषयी समाजामध्ये काय भावना आहेत, काय मते आहेत हे तपासले जाते. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. कारण लोकसमुदायाचा विश्वास संपादन करणे हे गुणवत्तेशिवाय शक्य नसते.

या पाच निकषांच्या आधारावर एनआयआरएफचे गुणांकन केले जाते. यासाठीची प्रक्रिया अत्यंत अवघड असल्याने यामध्ये पारदर्शकता अधिक आहे. कोणत्याही संस्थेने सादर केलेल्या माहितीची पुनर्पडताळणी (क्रॉस व्हेरिफिकेशन) करण्याची संस्थात्मक संरचना एनआयआरएफकडे आहे. तसेच ती माहिती त्या शिक्षण संस्थेने आपल्या संकेतस्थळावर अपलोड करणे सक्तीचे केले जाते. जेणेकरून त्याबाबत काही आक्षेप असल्यास एखादी बाब समोर येऊ शकते. यामुळे संस्थेच्या काही अदृश्य व्यवहाराला आळा बसला आहे.

## उपयुक्त माहितीचे संकलन आवश्यक

आपल्याकडे अनेक प्राध्यापक आपापल्या महाविद्यालयीन स्तरावर संशोधनपत्रिका प्रकाशित करत असतात; परंतु त्याचे संकलन व्यवस्थित केले जात नाही. याखेरीज उद्योगप्रधान अभ्यासक्रम कोणकोणते आहेत, विद्यापीठांमधून, महाविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या किती पदवीधरांना, कोणकोणत्या स्तरावर नोकऱ्या मिळालेल्या आहेत. या सर्वांची माहितीही संकलित स्वरूपात असणे गरजेचे आहे.

आहे. शैक्षणिक संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड, अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचे निकाल, प्लेसमेंट, संशोधन कार्य, विद्याशाखा सदस्यांचे प्रकाशन मूलभूत सुविधा, संसाधनांची स्थिती, सेवा, आदींची शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेबाबत राज्यात नक्कीच सजगता दिसून येईल.

(लेखक हे उच्च शिक्षण संचालनालयात प्रभारी संचालक म्हणून कार्यरत आहेत.)

**मरगळलेल्या मनात चैतन्याचा संचार करवणारा प्रेरणामंत्र म्हणजे 'छत्रपती शिवाजी महाराज'. महाराष्ट्राचा ऊर्जस्वल इतिहास, मार्गदर्शक वर्तमान आणि दिशादर्शक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. नकारात्मक परिस्थितीशी झगडण्याचे बळ देणारा हा मंत्र आहे. छत्रसालपासून ते आतापर्यंत कित्येक राष्ट्रनायकांना लढण्याची आणि विजयाची गाढ प्रेरणा देणारे अद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.**

# शिवराज्याभिषेक महोत्सव

**सुधीर मुनगंटीवार,**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शालिवाहन शके १५९६ या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. या ऐतिहासिक घटनेला या वर्षी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतकाळात येणारा हा शिवराज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापनकाळ महाराष्ट्र शासनाने पूर्ण वर्षभर शिवराज्याभिषेक महोत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे.

## शिवराज्यभिषेकाचा ३५०वा वर्धापन काळ

राज्याभिषेक शकाची सुरुवात करून शिवराय शककर्ते राजे झाले. इतर सर्व शक हे त्या त्या राजाच्या नावाने ओळखले जातात. हिंदवी स्वराज्याचा विचार युगानुयुगे पुढील पिढ्यांपर्यंत जात राहावा, यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. जी गोष्ट जगातल्या बलाढ्यातल्या बलाढ्य राजांनाही साध्य झाली नाही, ती महाराजांनी साध्य केली. मराठी राजभाषा बनली. दरबारातून फारसी हद्दपार झाली. ही काही सामान्य गोष्ट नाही. या घटनेने मायमराठीला तिचे वैभव पुन्हा प्राप्त झाले. निव्वळ महाराष्ट्राच्याच नाही, तर देशाच्या इतिहासातील इतका परमोच्च क्षण पुन्हा एकदा अनुभवता यावा आणि सकल मराठी जनांमध्ये शिवनाद पुन्हा एकदा घुमावा ह्या उद्देशाने राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने हे शिवराज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष उत्साहात साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे.



शालिवाहन शक १९४५-४६, म्हणजे इसवी २०२३-२४ या वर्षांत ३५० वा शिवराज्याभिषेक होत आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी ही तिथी या वर्षात २ जून रोजी आली असून इ.स. २०२४ मध्ये ती तिथी २० जून रोजी येत आहे. २ जून २०२३ पासून २० जून २०२४ या काळात शिवराज्याभिषेक महोत्सव पूर्ण राज्यभर साजरा करण्यात येणार आहे. शिवराज्याभिषेक महोत्सवाच्या अनुषंगाने राज्य शासनाने संपूर्ण वर्षामध्ये विविध प्रकारचे उपक्रम हाती घेतले आहेत.

विशेष म्हणजे हा महोत्सव आयोजित करण्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात ३५० कोटी रुपयांची विशेष तरतूदही करण्यात आली आहे.

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

राज्य शासनामार्फत ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला रायगडावर ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा झाला. स्वराज्याच्या स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा हा दिवस असून त्यानिमित्त राज्यात वर्षभर प्रत्येक जिल्ह्यात सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, शाहिरी स्पर्धा, महाराष्ट्रातील प्रमुख किल्ल्यांवर शिववंदना, जाणता राजा महानाट्याचे राज्यभर प्रयोग आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी भोजन, पाणी, मंडप, आरोग्य सुविधा यांची चोख व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात आली. रायगडावर राज्य सरकारकडून आयोजित कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करून शिवप्रेमींना सोबत घेऊन हा सोहळा भव्यदिव्य आणि देखणा व्हावा यासाठी शिस्तबद्ध तयारी करण्यात आली.

शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्ष झाली तरी त्या घटनेचे महत्त्व आजही तितकेच आहे. तमाम भारतीय जनतेसाठी ही महत्त्वाची घटना आहे. या वर्षी ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा असल्याने त्याचे आयोजन राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागामार्फत करण्यात आले. सोहळ्यानिमित्त रायगडावर रोषणाई करण्यात आली. राज्याने केंद्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाशी समन्वय ठेवून

सोहळ्याच्या दिवशी शिवभक्तांसाठी मोफत बससेवा महाड ते पाचाड या दरम्यान उपलब्ध होती.

## जगदंब तलवार व वाघनखे भारतात आणणार...

महाराष्ट्राचा स्वाभिमान, मराठी माणसाचा अभिमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांची ब्रिटन येथे असलेली जगदंब तलवार व वाघनखे भारतात आणण्याच्या दृष्टीने ब्रिटिश उपउच्चायुक्त श्री. ॲलॅन गॅम्मेल यांनी ब्रिटिश सरकारच्या वतीने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे प्रत्येक मराठी माणसाच्या मनातील दृढ निश्चय पूर्ण होणार आहे. ब्रिटनकडून जगदंब तलवार व वाघनखे शिवराज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षपूर्तीच्या महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात देण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जगदंब तलवार आणि वाघनखे भारतात आणण्याबाबत ब्रिटनमध्ये संबंधित अधिकाऱ्यांसमवेत तपशीलवार चर्चा झालेली आहे. शिवराज्याभिषेक महोत्सवादरम्यान जगदंब तलवार आणि वाघनखे भारतात आणली जातील, यासाठी राज्य शासन पूर्णपणे सकारात्मक आहे.

> **''छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आणि जगदंब तलवार भारतात आणण्याबाबत ब्रिटिश उप उच्चायुक्तांकडून सकारात्मक प्रतिसाद.''**
>
> **- सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्ये मंत्री**

## आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय केंद्र उभारणार

सांस्कृतिक कार्य विभागाने ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त राज्यात वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय केंद्राची निर्मिती करणे, छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय अध्ययन केंद्र उभारणे, राज्यात अकृषिक विद्यापीठ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास केंद्र स्थापन करणे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित साहित्य, ग्रंथ, आणि संदर्भ साहित्याचे डिजिटायझेशन इ. उपक्रम या विभागामार्फत राबवण्यात येणार आहेत.



## २० अभ्यास केंद्रांची निवड

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत भारतातील विविध राज्यांच्या राजधानीच्या ठिकाणी किंवा मराठा साम्राज्य, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित ठिकाणी देशभरात २० अभ्यास केंद्रे निवडली जाणार आहे. यासाठी दिल्ली, दमण, दिव, तंजावर, अंदमान, बेळगाव, बडोदा, श्रीशैलम, उदयपूर, भोपाळ दार्जिलिंग, अहमदाबाद, गुवाहाटी, कोलकाता, पानिपत, भुवनेश्वर, लडाख, विजयपुरा, पाटणा, अमृतसर, पणजी ही ठिकाणे राज्य सरकारने प्रस्तावित केली आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान

पुण्यातील हवेली तालुक्यातील आंबेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान उभारण्यासाठी राज्य सरकारकडून ५० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवाय मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही दृकश्राव्य माध्यम सुविधेसह छत्रपती शिवाजी महाराजांना समर्पित सार्वजनिक उद्याने विकसित करण्यात येणार आहे. या उद्यानांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जीवनगाथा प्रदर्शित करण्यात येणार असून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## शिवनेरी येथे संग्रहालय आणि किल्ल्यांचे संवर्धन

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरीवर महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित संग्रहालय उभारण्यात येणार आहे. शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य शासनातर्फे ३०० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**पारतंत्र्याच्या अंधकारातून स्वराज्याच्या प्रकाशाकडे महाराष्ट्राला आणि देशाला घेऊन जाणाऱ्या ऐतिहासिक आणि तेजोमय शिवराज्याभिषेक सोहळ्याला २०२४ या वर्षी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. अर्थात या वर्षी या सोहळ्याने ३५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतकाळात येणारा शिवराज्याभिषेकाचा ३५०वा वर्धापनकाळ राज्याचा सांस्कृतिक विभाग शिवराज्यभिषेक महोत्सव म्हणून साजरा करणार असून हा महोत्सव अधिकाधिक चांगल्या प्रकारे साजरा व्हावा, यादृष्टीने राज्यातील सर्वच लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी कर्मचारी प्रयत्नशील आहेत.**

# तेजोमय शिवराज्याभिषेक

**सुनील कदम**

भारतातील परकीय सत्ताधीशांना त्यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला होता. राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांची शक्ती सर्व परकीय सत्ताधीशांना दिसून आली. महाराजांची दखल सर्व शत्रूंना घ्यावी लागली. यातूनच महाराजांच्या शौर्याचे आणि महानतेचे दर्शन घडून येते. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचा पराक्रम, महाराष्ट्राचा स्वाभिमान, महाराष्ट्राची दुर्दम्य आकांक्षा, महाराष्ट्राच्या शौर्याचे तेजस्वी प्रतीक आहेत.

बलाढ्य मोगल सत्तेशी युक्ती आणि बुद्धीने लढत महाराजांनी अक्षरशः शून्यातून विश्व निर्माण करत स्वराज्याची स्थापना केली. हा सगळा संघर्षपूर्ण कालखंड म्हणजे महाराजांच्या अद्भुत प्रतिभेचा, दिव्यत्वाचा, अफाट सामर्थ्याचा साक्षात्कार होय. सर्वसामान्य मावळ्यांच्या बळावर आणि विश्वासावर झालेली ही वाटचाल म्हणजे भावी पिढ्यांसाठी कोरल्या गेलेली प्रेरणागाथाच होय. या दिवशी महाराजांचा राज्याभिषेक झाला. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर साऱ्या देशाच्या दृष्टीने ही एक असाधारण गोष्ट होती, एक सुवर्णक्षण होता. या क्षणाने मराठी माणसाच्या आयुष्यात नवीन पहाट उगवली, सामान्य माणसांच्या शक्तीने मदांध सत्तेला आव्हान दिले जाऊ शकते हा विश्वास महाराष्ट्रीयांच्या मनात रुजवला गेला. अनेक शतकांचे दास्य निखळून पडले आणि महाराष्ट्र धर्माची पुन्हा स्थापना झाली. या क्षणाने महाराज छत्रपती झाले, शिवराज्यभिषेक शकाचा प्रारंभ झाला, महाराजांच्या दिग्विजयाची आणि मराठा



साम्राज्याची ख्याती सर्वत्र निनादू लागली. परकीय शत्रूवर वचक आणि जरब बसवण्यासाठी शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करून घेणे गरजेचे होते म्हणून शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून घेतला. राज्याभिषेक झाल्यानंतर संपूर्ण जगात त्यांना 'छत्रपती' ही पदवी मिळाली. भारतात खऱ्या अर्थाने शिवशाहीचा काळ सुरू झाला.

६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला. भारतीय इतिहासात या घटनेकडे खूप महत्त्वाची घटना म्हणून पाहिले जाते. कारण त्या काळात संपूर्ण भारत परकीय आक्रमणांनी ग्रासला होता आणि एवढ्या मोठ्या शत्रूंना तोंड देऊन छत्रपतींनी आपला राज्याभिषेक केला होता. ही भारतीय इतिहासातील सामान्य गोष्ट नव्हती. राज्याभिषेक करून राजा ही पदवी धारण करून भारतातील परकीयांना शह देणे ही त्या काळात खूप धाडसाची कामगिरी छत्रपतींनी केली, म्हणून भारतीय इतिहासात या घटनेकडे एक युगप्रवर्तक घटना म्हणून बघितले जाते. राज्याभिषेक झाल्यानंतर छत्रपतींनी अनेक सुधारणा घडवून आणल्या. परकीय शत्रूंना शह देणारा छत्रपती म्हणून शिवाजी महाराजांकडे बघितले जाऊ लागले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक होणार आणि राजा म्हणून राजाला बसण्यासाठी सिंहासन असावे लागते म्हणून छत्रपतींच्या राज्याभिषेकासाठी खास ३२ मण सोन्याचे सिंहासन बनवून घेण्यात आले. राज्याभिषेकाचे एक धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने वेदमंत्रघोषात सुरू झाले. राज्याभिषेकाचा मुहूर्त होता ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचा सूर्योदय. क्षत्रिय राजाकरिता असलेला विशेष मुहूर्त म्हणजे सर्प देवता असलेली तिथी, आश्लेषा नक्षत्र असलेली ती तिथी म्हणजे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी.

सुशोभित राजदरबारात अष्टप्रधान, राजमंडळातील मात्तबर व्यक्ती, शाही पाहुणे, व्यापारी आणि परदेशी वकील हजर होते. त्यातच हेन्री ऑक्झेंडन इंग्रजांचा वकीलसुद्धा होता. त्याने राजदरबारचे वर्णन करून ठेवलेले आहे. त्यात त्याने राजचिन्हे पहिली होती. सर्वसार्वभौमत्वाचे प्रतीक असलेली ती राजचिन्हे महाराजांचे ऐश्वर्य पराक्रम, शौर्य, धैर्य आणि धाक दिमाखात सांगत होती.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारातील राजचिन्हेः-**

### चवरी



वैभवाचे प्रतिक असलेल्या चवरी. देवदेवतांचे पूजा-अर्चेतील हे साधन... हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राजा म्हणजे विष्णूचा अंश! म्हणून

ही देवांची चामरे राजास प्राप्त होतात. देवत्वाची जाणीव राजास सतत असावी हा यामागचा उद्देश... शिवाजी महाराजांची चामरे सुवर्ण मुठींची होती.



### मोरचेल

चामराप्रमाणे मोरचेल या राजचिन्हाचे महत्त्व.... म्लेंच्छ बादशहा ते वापरत असत. म्हणूनच आपणही त्यांच्याच बरोबरीचे स्वतंत्र राजे आहोत हे दर्शवण्यासाठी महाराजांनी मोरचेल हे राजचिन्ह स्वीकारले.



### स्वराज्याचा ध्वज


प्रारंभापासूनच केशरी ध्वज स्वराज्याचे अधिकृत निशाण होते.

हिंदू संस्कृती आणि तत्त्वज्ञानाच्या अग्नितेजाप्रमाणे हा अरुणध्वज वारकरी आणि धारकरी यांनी सांभाळला आहे. महाराज आग्र्याला गेले असताना पुढे केशरी ध्वज असल्याचे वर्णन आलेले आहे. स्वराज्याच्या गडकोट किल्ल्यांवर आणि आरमारावर फडकणारा हा ध्वज मंदिरांच्या शिखरांवर सर्वोच्च स्थानी असतो.

### माहीमरातब

भाल्याच्या टोकावर लावलेला सुवर्णमत्स्य असलेले चिन्ह.

अर्थात उघडलेल्या जबड्यातील कराल दंत दाखविलेला सुवर्णाचा मासा....




समुद्रावरील सत्ता असलेल्या सार्वभौम स्वराज्याचे बलाढ्य आरमार सुसज्ज असल्याचा संदेश हे सुवर्णमत्स्य देतात. मुसलमान बादशहा यास माहीमरातब म्हणत. या चिन्हाचा फार मोठा दबदबा असे, म्हणून महाराजांनी हे चिन्ह स्वीकारले होते.



### अश्वपुच्छ

सुवर्ण भाल्यावरील घोड्याची शेपटी म्हणजे स्वराज्याच्या शक्तिशाली समर्थ घोडदळाचे प्रतीक म्हणून राजसभेत प्रदर्शित केले होते. राजसभेत असे अश्वपुच्छांनी युक्त भाले घेऊन भालदार उभे होते.

### सुवर्णाचा तराजू



तराजू हे न्यायाचे प्रतीक आहे. स्वराज्यात न्याय समतोल असतो हे दाखवण्यासाठी हे राजचिन्ह महाराजांनी वापरले होते. अन्यायाचे निर्दालन याचे प्रतीक म्हणून समसमान पातळीतील सुवर्णाचा तराजू. स्वराज्यात सर्वांनाच समसमान न्याय मिळेल, याचे द्योतक असलेले हे राजचिन्ह राजसभेचे भूषण ठरला.



### छत्र

शिवाजी महाराज छत्रपती झाले ते प्रजेने राजाच्या मस्तकावर धरलेले छत्र आणि प्रजेवर छत्र धरणारे प्रजापती छत्र धारण करणारे पहिले छत्रपती श्री शिवाजी महाराज. छत्रपतींच्या छत्रछायेखाली सुरक्षित रयत. याचे प्रतीक म्हणजे छत्र होय.

### ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी

**तिथी** - शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला त्याकरिता हिंदू पंचांग प्रमाण मानून त्यातील कालगणनेवरूनच मुहूर्त निवडला गेला होता. आजही हिंदू लोक आपापले सणवार, मुंज, लग्न, वास्तुशांती आणि सर्व धार्मिक समारंभ पंचांगावरूनच निश्चित करतात. म्हणजे त्या काळात स्वतंत्र स्वराज्यात महाराजांनी हे ओळखून पंचांगातील तिथीनुसारच स्वतःच्या राज्याभिषेकाची वेळ आणि मुहूर्त मान्य केला. त्यांनी प्रमाण मानलेला दिवस पंचांगानुसारच आपणही मानले पाहिजे. तिथीला असलेले महत्त्व म्हणजे हिंदुत्वाचा स्वाभिमान आहे. तसेच शिवरायांचे अनुयायी असल्याचे त्यातूनच सिद्ध होईल. म्हणून तिथीचा उल्लेख सदरहू बोधचिन्हात केलेला आहे. हिंदू जनतेत हा संदेश प्रकर्षाने जावा, म्हणून तिथीचा स्पष्ट उल्लेख करण्याचे प्रयोजन आहे.

**राज्याभिषेक शक** : छत्रपती शिवाजी महाराजांना आपण शककर्ते राजे म्हणतो. त्यांनी सर्वत्र मुसलमानी राज्य असता स्वातंत्र्याची ज्योत जनमानसात पेटवून, गडकोटांच्या साहाय्याने संघर्ष करून स्वराज्याची स्थापना केली. राज्याभिषेक करून घेऊन हिंदूंचे सुवर्ण सिंहासन प्रतिष्ठित केले. म्हणूनच शिवाजी महाराज शककर्ते राजे आहेत. त्यांच्या नावाने कालगणना सुरू होणे ही प्राचीन हिंदू परंपरा होती. त्यास अनुसरून परंतु श्रीमंतयोगी असलेल्या महाराजांनी स्वतःच्या नावाने ती कालगणना सुरू न करता श्रींच्या नावे, श्रींच्या इच्छेने निर्माण झालेल्या राज्याच्या नावाने कालगणना सुरू केली. स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक अशा प्रकारे शक सुरू केला.

राज्याभिषेक शक हिंदू पंचांगावर आधारित असून राज्याभिषेकादिवशी म्हणजे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या दिवशी सुरुवात झाली. त्याच वर्षीच्या अखेरच्या दिवशी म्हणजे कालचक्र फिरून ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला राज्याभिषेक वर्ष पूर्ण होऊन दुसरे दिवशी सूर्योदयाला येणाऱ्या ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या दिवशी राज्याभिषेक शकाचे नवीन वर्ष सुरू होते. म्हणून वृद्धिंगत होणारा राज्याभिषेक शक दरवर्षी फक्त आणि फक्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या दिवशीच येईल. हे सिद्ध करण्यास कोणत्याही निकषांची गरज नाही, याकरिता जसा आणि जेव्हा शिवाजी महाराजांनी तो राजशक सुरू केला, त्याचप्रमाणे तो भविष्यात केला जावा. इति लेखनालंकार.

***टीप*** *:- वरील बोधचिन्हांच्या आकृत्यांचा प्रतीकरूपाने वापर केलेला आहे, ती सर्वच राजचिन्हे शिवरायांच्या राजदरबारात राज्याभिषेकप्रसंगी होती. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी इंग्रजांचा वकील 'हेन्री ऑक्झेंडन' रायगडावर हजर होता. रायगडावर झालेल्या राज्याभिषेकाचे वर्णन त्याच्या डायरीत लिहून ठेवले होते. 'हेन्री ऑक्झेंडन' याची डायरी एक समकालीन अस्सल ऐतिहासिक साधन आहे.*

**राज्य मंत्रिमंडळाच्या ३, १६, ३० मे आणि १३ जून २०२३ रोजीच्या बैठकीत वन, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक आरोग्य, महसूल, कौशल्य, रोजगार, उद्योजकता, पशुसंवर्धन, उद्योग, कामगार, कृषी, पर्यटन, मदत व पुनर्वसन, ग्रामविकास, दिव्यांग कल्याण, पशुसंवर्धन, विधि व न्याय, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, शालेय शिक्षण आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**



# पायाभूत सुविधांना बळ

## परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

कांदळवन व सागरी जैवविविधता या विषयात जगभरातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठात जाऊन संशोधन करण्यासाठी ७५ मुलांना तीन वर्षांसाठी परदेशी शिष्यवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आली. दरवर्षी २५ मुलामुलींना शिष्यवृत्ती दिली जाईल.

वन विभागाच्या कांदळवन सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून ही शिष्यवृत्ती देण्यात येणार असून टाइम्स हायर एज्युकेशन रँकिंग (THE च्या २०० च्या आतील किंवा QS - Quacquarelli Symonds रँकिंग १५० च्या आतील) परदेशी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाईल. यापैकी ३० टक्के जागांवर मुलींची निवड करण्यात येईल. मरिन सायन्स, मरिन इकॉलॉजी, ओशोनोग्राफी, मरिन बायोलॉजी, मरिन फिशरीज, मरिन बायोटेक्नॉलॉजी, मायक्रोबायोलॉजी, बायोडायव्हर्सिटी या अभ्यासक्रमांसाठी १५ पदव्युत्तर पदवी आणि १० पीएच.डी. अशा दरवर्षी २५ शिष्यवृत्ती दिल्या जातील. पदव्युत्तर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे वय कमाल ३५ वर्षे आणि पीएच.डी.साठी कमाल वय ४० वर्षे असावे. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. या योजनेसाठी ३१ कोटी ५० लाख रुपये इतका खर्च येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी दरवर्षी एप्रिल किंवा मे महिन्यात कांदळवन प्रतिष्ठानच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.

## घनकचरा प्रक्रिया प्रकल्प

राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील घनकचरा प्रक्रियेसाठी आयसीटी तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातून १०० टक्के अर्थसाहाय्य करण्यात येईल. ५७८ कोटी ६३ रुपये किमतीचा हा प्रकल्प असेल.

शहरांमधील घनकचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वाहतूक यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया होणे आवश्यक आहे. केंद्रीय पद्धतीने याचे प्रभावी संनियंत्रण होण्यासाठी आयसीटी तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीचा वापर त्रयस्थ संस्थांमार्फत बंधनकारक केले होता. मात्र निधीअभावी या प्रणालीची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले. आता या प्रणालीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याचा तसेच घनकचरा उचलणाऱ्या सर्व वाहनांचे जीपीएस किंवा आयसीटी आधारित ट्रॅकिंगदेखील करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्वच्छ भारत मिशन-नागरी हे राज्यस्तरावर करारनामा करतील व आयुक्त, मुख्याधिकारी यांच्यामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी करतील.




## पायाभूत सुविधा विकास महामंडळ

राज्यातील रस्त्यांच्या गुणवत्तापूर्ण, वेगवान देखभाल-दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या महामंडळाचे भागभांडवल १०० कोटी रुपये राहणार असून ५१ टक्क्यांचा शासन हिस्सा टप्प्या-टप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार आहे. रस्ते आणि इमारती विकास व देखभाल पूरक निधीची देखील उभारणी करण्यात येईल. राज्यातील ३ लाख कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्यांपैकी १ लाख कि.मी.चे प्रमुख राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत. या रस्त्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करावी लागते. अवजड वाहनांच्या रहदारीमुळे रस्ते खराब होतात. त्यामुळे या महामंडळाची स्थापन करण्यात येत आहे.

## प्रादेशिक मनोरुग्णालय

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील जयसिंगपूर येथे मौजे उदगाव येथे ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी येणारा १४६ कोटी २२ लाख रुपयांचा निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल.



या मनोरुग्णालयास रत्नागिरीच्या प्रादेशिक रुग्णालयाच्या पदांप्रमाणे पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात पुणे, ठाणे, नागपूर आणि रत्नागिरी या ठिकाणी प्रादेशिक मनोरुग्णालये असून, त्यात ५ हजार ६९५ मनोरुग्णांना भरती करता येते. अंबेजोगाई येथे १०० खाटांचे वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र स्थापन केले असून, जालना जिल्ह्यात ३६५ खाटांच्या प्रादेशिक मनोरुग्णालयांची स्थापना करण्यात येणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शासकीय मनोरुग्णालय नसल्याने रुग्णांना पुणे किंवा रत्नागिरी येथे जावे लागते. त्यामुळे मौजे उदगाव (ता. शिरोळ) प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## करमणूक शुल्क आकारणीमध्ये सूट

राज्यात १६ सप्टेंबर २०१७ पासून वस्तू व सेवा कर (जीएसटी) अधिनियम लागू करण्यात आला. या दिनांकापासून ते राज्य शासनाचे करमणूक शुल्क आकारणी व वसुलीचे अधिकार स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी करमणूक शुल्क आकारणीतून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला.

महसूल व वन विभागाच्या १ जुलै २०१७ च्या निर्णयानुसार करमणूक शुल्क भरण्यापासून १५ सप्टेंबर २०१७ पर्यंत दिलेली सूट पुढे १६ सप्टेंबर २०१७ पासून ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतच्या कालावधीसाठी सुरू ठेवण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

## इमारत पुनर्विकास धोरण

मागासवर्गीय व्यक्तींना घरे उपलब्ध करून देण्यासाठी मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजनेत इमारतींचे पुनर्विकास धोरण जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचे बांधकाम होऊन जवळपास ५५ ते ६० वर्षे कालावधी लोटला आहे. बहुतांश इमारती मोडकळीस आलेल्या असून त्या धोकादायक बनल्या आहेत. अशा संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. राज्य शासनाने १९४९ ते १९६९ व त्यापुढील कालावधीत पोस्ट वॉर रिहॅबिलिटेशन-२१९ ही योजना सुरू केली. या योजनेत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंडाचे वाटप केले. मुंबई, पुणे, नाशिक अशा शहरी ठिकाणी त्यांना निवारा उपलब्ध होऊन पक्की आणि



सोयी सुविधांची घरे मिळावी आणि त्यांचे जीवनमान उंचवावे असा यामागील हेतू होता.

आता या नवीन धोरणामुळे अशा इमारतींच्या पुनर्विकासाबाबत यापूर्वी शासनाने काढलेले सर्व शासन निर्णय रद्द झाले असून नव्या धोरणाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. अशा संस्थांमध्ये मूळ सभासदांच्या बाबतीत ९० टक्के मागासवर्गीय व १० टक्के अमागासवर्गीय हे प्रमाण जैसे थे ठेवून पुनर्विकासानंतर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सदनिकांमध्ये मागासवर्गीयांचे प्रमाणे २० टक्के व अमागासवर्गीयांचे प्रमाण ८० टक्के राहील.

पुनर्विकासाकरिता प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव म्हाडामार्फत सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

## आयटीआय निदेशकांचे मानधन

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) कंत्राटी निदेशकांच्या मानधनात वाढ करून ते २५ हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा फायदा २९७ कंत्राटी निदेशकांना होईल. यापूर्वी त्यांना १५ हजार रुपये मानधन मिळायचे. सध्या या आयटीआयमध्ये २९७ निदेशक आहेत.

राज्यातील मनपा क्षेत्रातील आयटीआयमध्ये दुसरी व तिसरी पाळी आणि उर्वरित आयटीआयमध्ये दुसरी पाळी ऑगस्ट २०१० पासून सुरू करण्यासाठी एकूण १५०० शिक्षकीय पदांना २०१० मध्ये मंजुरी देण्यात



## पशुवैद्यकीय महाविद्यालय



अकोला येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महाविद्यालयातील ५६ शिक्षक, ४८ शिक्षकेतर संवर्ग असे १०४ पदे तसेच बाह्य स्रोताद्वारे ६० पदे अशी १६४ पदे नव्याने निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली. या पदांसह इतर अनुषंगिक खरेदी वगैरेसाठी मिळून ३१६ कोटी ६५ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पीय भाषणात जळगाव आणि अकोला जिल्ह्यांत २ नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

आलेली आहे. कंत्राटी शिल्प निदेशकांच्या सेवा २०१० पासून २०२२ पर्यंत १२ वर्ष इतक्या झाल्या असून वाढलेली महागाई बघता आणि त्यांचा प्रदीर्घ अनुभव लक्षात घेता ही वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. दर वर्षांनी या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेऊन सेवा पुढे ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

## उद्योग धोरणांना मुदतवाढ

उद्योग विभागाशी संबंधित इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश व संरक्षण, रेडिमेड



गारमेंट उद्योग धोरणांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित विषयांची नवीन धोरणे तयार होईपर्यंत या धोरणांना मुदतवाढ असेल. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६ आणि त्या अंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहन या धोरणाचा कालावधी ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त झाला आहे. रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अ‍ॅण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण-२०१८ चा कालावधी १३ फेब्रुवारी २०२३ रोजी समाप्त झाला आहे. तसेच महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८ चा कालावधीदेखील १३ फेब्रुवारी २०२३ रोजी समाप्त झाला आहे. त्यामुळे या धोरणांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कामगार नियमांना मान्यता

केंद्र शासनाने सर्व २९ कामगार कायदे एकत्र करून ४ कामगार संहिता तयार केल्या असून व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता (Code on Occupational Safety, Health and Working Conditions) २०२० या चौथ्या संहितेस राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. नवीन कामगार नियमांना मान्यता दिल्याने लाखो कामगारांचे हित जपण्यात आले आहे.

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहितेस मान्यता देण्यात आली आहे. यातील ठळक बाबी पुढील प्रमाणे- १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये उपाहारगृह बंधनकारक, २५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात कल्याण अधिकारी, ५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यात पाळणाघर अशा काही तरतुदी असतील.

यापूर्वी वेतन संहिता (Code on Wages) २०१९, औद्योगिक संबंध संहिता (Code on Industrial Relations), २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता (Code on Social Security) २०२० या ३ संहितांच्या नियमांना राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.



केंद्र शासनाने १९९९ मध्ये माजी केंद्रीय कामगार मंत्री रवींद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नेमला होता. या आयोगाने सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करून या ४ कामगार संहिता (Labour Codes) तयार करण्याची शिफारस केली होती. या ४ संहिता अधिनियम संसदेने पारित केल्या आहेत.

कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट असल्याने केंद्र शासनाने सर्व

राज्यांसाठी एकत्रित संहिता तयार केली आहे. सर्व संहितांची अंमलबजावणी सर्व राज्यांमध्ये एकत्रितरीत्या करावयाची असल्याने राज्यांनी संबंधित संहितांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियम पारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र शासनाने व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता अधिनियम २०२० प्रसिद्ध केले आहेत.

या अधिनियमात राज्यांना समुचित शासन व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती (कामगार) संहिता नियम तयार करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार या संहितेस मान्यता देण्यात आली आहे.

## पीक विमा योजना

राज्यात सर्वसमावेशक पीक विमा योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषित केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्यात येईल.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई निश्चितीसाठी पिकांचे सरासरी नुकसान काढताना किमान ३० टक्के तंत्रज्ञान आधारित उत्पादन व पीक कापणी प्रयोगांतर्गत प्राप्त होणाऱ्या उत्पादनाचा मेळ घालून उत्पादन निश्चित करण्यात येईल. ही योजना खरीप व रब्बी हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी निविदा प्रक्रियेने राबवण्यात येईल. विमा हप्ता दरांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारे नफा आणि तोटा शेअरिंग मॉडेल किंवा कप अॅण्ड कॅप मॉडेल (८०:११०) नुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने उचित पर्यायासह राबवण्यात येईल.



योजनेसाठी अंमलबजावणी यंत्रणांची निवड झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देते वेळी मागील हंगामातील राज्य हिस्सा विमा हप्ता रकमेच्या ५० टक्के रक्कम केंद्र व राज्य शासनाच्या एस्क्रो अकाऊंटमध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात आली.

## नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

२०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषित केल्याप्रमाणे अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्री



कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना राबवण्यात येईल. या योजनेतून प्रतिवर्ष रक्कम ६ हजार रुपये लाभ (दर चार महिन्यांनी रु. २,०००/- अशी वार्षिक समान तीन हप्त्यात) पात्र लाभार्थींच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात येतील. पहिला हप्ता एप्रिल ते जुलै २ हजार रुपये, दुसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर २ हजार रुपये, तिसरा हप्ता डिसेंबर ते मार्च २ हजार रुपये.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत पी.एम.किसान पोर्टलवर नोंदणी करणे व पात्र लाभार्थींना मान्यता देण्यासंदर्भात कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आली. संनियंत्रणासाठी ग्रामस्तरीय, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय समित्यादेखील गठित करण्यात येतील.

## नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ

राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

या योजनेस २०२७-२८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. या मिशनअंतर्गत १ हजार ८३ कोटी २९ लाख रुपये आर्थिक तरतुदीस तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान व मोठ्या क्षेत्राचे प्रमाणीकरण योजनेंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाचे मिळून ८३७ कोटी ७० लाख रुपये आर्थिक तरतुदीसही मान्यता देण्यात आली.

यावेळी अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक आणि तंत्र अधिकारी यांच्या ३८ अतिरिक्त पदांनादेखील मान्यता देण्यात आली. यापूर्वी मिशनच्या पहिल्या टप्प्यात अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांत हे मिशन राबवण्यात येत होते. आता याची व्याप्ती वाढवण्यात आल्यामुळे येत्या ३ वर्षात राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्यात येईल. तसेच १००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्रे स्थापन करण्यात येतील.

मिशनच्या पहिल्या टप्प्यात ४१६ गट स्थापन झाले असून, त्यातून त्यात ७,८५५ शेतकरी आहेत. या गटांचे भागभांडवल २ कोटी ४७ लाख इतके आहे. याशिवाय ३६ शेतकरी उत्पादक कंपन्यांचीदेखील स्थापना झाली आहे.

## मका संशोधन केंद्र

सिल्लोड तालुक्यातील मौजे कोटनांद्रा व डोईफोडा येथे शासकीय जागेवर मका संशोधन केंद्र स्थापन करण्यात मान्यता देण्यात आली.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठांतर्गत मौजे कोटनांद्रा व डोईफोडा, येथील शासकीय जागेवर मका संशोधन केंद्र सुरू करण्यात



येईल. या मका संशोधन केंद्रासाठी २२.१८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या मका संशोधन केंद्रासाठी आवश्यक २१ पदे व बाह्यस्रोताद्वारे १८ पदे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्माण करण्यात येतील.

## महिला केंद्रित पर्यटन धोरण

महिलांना पर्यटन व्यवसायात अधिकाधिक वाव मिळावा आणि त्यांचे सक्षमीकरण व्हावे, म्हणून आजादी का अमृतमहोत्सवांतर्गत 'आई' हे महिला केंद्रित पर्यटन धोरण राबवण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे काही पर्यटन स्थळी महिला बाईक-टॅक्सी सेवा सुरू करण्याससुद्धा यावेळी मान्यता देण्यात आली. हे धोरण पर्यटन संचालनालय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत सर्व संबंधित विभागांच्या विविध योजनांशी समन्वय साधून राबवण्यात येईल. याकरिता पर्यटन संचालनालयामध्ये महिला पर्यटन धोरण कक्ष तयार करण्यात येईल.

या धोरणात महिला उद्योजगता विकास, महिलांकरिता पायाभूत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, महिला पर्यटकांसाठी कस्टमाईज्ड उत्पादने, सवलती व प्रवास आणि पर्यटन विकास या पंचसूत्रींचा अवलंब करण्यात येणार आहे. महिलांना पर्यटन क्षेत्रात व्यवसाय व रोजगाराच्या संधी तसेच महिला पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा लाभ घेता यावा, याकरिता विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता पर्यटन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यदलाची स्थापना करण्यात येणार आहे.

यामध्ये राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत महिलांच्या मालकीच्या व त्यांनी चालवलेल्या १० पर्यटन व्यवसायांना (होमस्टे, हॉटेल / रेस्टॉरंट, टूर ॲण्ड ट्रॅव्हल एजन्सी इ.) पर्यटन व्यवसाय उभारणीसाठी साहाय्य करण्यात येणार आहे. या महिलांना बँकांमार्फत घेतलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याजाची १५ लाखांपर्यंतच्या मर्यादेत व ७ वर्षे किंवा ४.५ लाखांपर्यंतची मर्यादा यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत प्रतिपूर्ती करण्याकरिता योजना असेल. तसेच पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत महिला टूर ऑपरेटरर्स यांचा वार्षिक विमा हप्ता पहिली ५ वर्षे शासनामार्फत भरण्यात येणार आहे.

## ऑनलाइन बुकिंगमध्ये ५० टक्के सूट

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त १ ते ८ मार्च या कालावधीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सर्व रिसॉर्ट्स/युनिट्समध्ये सर्व महिला पर्यटकांना ऑनलाइन बुकिंगमध्ये ५० टक्के सूट देण्यात येईल. वर्षभरात एकूण ३० दिवस महामंडळाच्या सर्व रिसॉर्ट्समध्ये महिला पर्यटकांना ऑनलाइन बुकिंगमध्ये ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. तसेच महिला पर्यटकांच्या विविध गटांसाठी अनुभवात्मक टूर पॅकेजेसचे आयोजन करण्यात येईल व महिला बचतगटांना महामंडळाच्या रिसॉर्ट्समध्ये हस्तकला, कलाकृती, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ इत्यादींच्या विक्रीसाठी स्टॉल किंवा जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



## शेतकऱ्यांना मदत

गेल्या वर्षी सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे बाधित शेतकऱ्यांना १५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे १५.९६ लाख हेक्टर बाधित क्षेत्रातील २७.३६ लाख शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल.



राज्य शासनामार्फत 'सततचा पाऊस' नवीन आपत्ती घोषित करून मदत देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या ५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे शेतीपिकांच्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने व निकषानुसार मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर सुधारित केले आहेत. त्यानुसार जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ८,५०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी १७ हजार रुपये प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २२,५०० रुपये प्रति हेक्टर अशी दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत देण्यात येईल.

## कंत्राटी ग्रामसेवकांचे मानधन

कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या या ग्रामसेवकास सहा हजार रुपये दर महिना मिळतात. आता ते १६ हजार मिळतील.

राज्यात सध्या २७ हजार ९२१ ग्रामपंचायती असून १८ हजार ६७५ नियमित ग्रामसेवकांची पदे आहेत. त्यापैकी



१७ हजार १०० पदे भरली असून १,५७५ पदे रिक्त आहेत. वर्ष २००० पासून ग्रामसेवकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतात. कृषी सेवक, ग्रामसेवक, शिक्षण सेवक यांच्या मानधनात वाढ झाल्यामुळे कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव होता. यापूर्वी वर्ष २०१२ मध्ये वाढ करण्यात आली होती, यासाठी १ कोटी ५७ लाख ५० हजार रुपयांचा आर्थिक भार पडेल.

## आजारमुक्त व्यक्तींकरिता पुनर्वसनगृह

मानसिक आजारमुक्त व्यक्तींकरिता चार जिल्ह्यांत स्वयंसेवी संस्थामार्फत १६ पुनर्वसनगृह स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यामध्ये नागपूर, पुणे, ठाणे व रत्नागिरी येथे ही पुनर्वसनगृह स्थापन करण्यात येतील. या पुनर्वसनगृहांमध्ये १८ ते ५५ वयोगटातील तसेच ५५ वर्षांवरील वयोगटातील ज्येष्ठ अशा दोन्ही वयोगटातील पुरुष व महिलांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण १६ पुनर्वसनगृहे सुरू करण्यात येतील. या पुनर्वसनगृहांच्या खर्चापोटी पाच कोटी ७६ लाख रुपयांच्या तरतुदीसदेखील बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच पुढील टप्प्यामध्ये प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या शिफारशीनुसार मानसिक आजारमुक्त व्यक्तींची संख्या वाढल्यास, ती विचारात घेऊन आवश्यकतेनुसार पुनर्वसनगृहांच्या संख्येत वेळोवेळी वाढ करण्याच्या तरतुदीसही मान्यता देण्यात आली.

मानसिक आजारमुक्त व्यक्तींना पुढील उपचाराची गरज नसते किंवा ज्या मानसिकमुक्त व्यक्ती बेघर आहेत किंवा त्यांचे कुटुंबीय स्वीकारत नाहीत, अशांसाठी ही पुनर्वसनगृहे असतील. पुनर्वसनगृहाने प्रवेश देण्यात आलेल्या व्यक्तीस विविध प्रकारचे कौशल्यपूर्ण प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याचप्रमाणे त्यांचे पुनर्वसन करणे, समुपदेशन करणे, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करणे, त्यांचा निवास, भोजन, क्रीडा व मनोरंजन, स्वच्छता, संरक्षण आदी बाबींची जबाबदारी घ्यावयाची आहे. पुनर्वसनगृह चालवणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस १२ हजार रुपये प्रति व्यक्ती प्रति महिना सहायक अनुदान देण्यात येईल. अशा संस्थांची निवड करण्यासाठी राज्यस्तरावर निवड समिती असेल.

## पशुरोग निदान प्रयोगशाळा

लातूर येथे स्वतंत्र विभागीय पशुरोग निदान प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रयोगशाळेसाठी २ कोटी ५१ लाख रुपये खर्चासदेखील मान्यता देण्यात आली. या प्रयोगशाळेसाठी ११ पदांना मंजुरी देण्यात आली आहे.



सध्या राज्यामध्ये लातूर विभाग वगळता नागपूर, अकोला, औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर), नाशिक, पुणे, कोल्हापूर, चिपळूण अशा सात ठिकाणी विभागीय पशुरोग निदान प्रयोगशाळा आहेत. लातूर विभागामध्ये असलेल्या गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या यांची मोठी संख्या विचारात घेता या विभागासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा असणे गरजेचे होते. सध्या येथील पशुपक्ष्यांमधील रोगांचे नमुने तपासणीसाठी औरंगाबाद किंवा पुणे येथे पाठवण्यात येतात. लातूर येथे ही प्रयोगशाळा स्थापन झाल्यास शेतकऱ्यांची गैरसोय दूर होऊन त्यांचे आर्थिक नुकसानही टळणार आहे.

## उत्पन्न मर्यादेत वाढ

स्वातंत्र्य सैनिकांना घरांसाठी म्हणून जमीन देण्याकरिता एकत्रित मासिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १० हजार रुपयांवरून ३० हजार रुपये वाढवण्यास मान्यता देण्यात आली.

राज्यातील किमान मासिक वेतनामध्ये मोठी वाढ झालेली आहे. त्यानुसार स्वातंत्र्य सैनिकांच्या कौटुंबिक उत्पन्न मर्यादेत वाढ करणे आवश्यक होते. ज्या स्वातंत्र्य सैनिकांकडे किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडे निवासी जागा नाही त्यांना २,५०० चौ. फू. मर्यादेत जमीन देण्यात येईल. त्यासाठी त्यांना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्वातंत्र्य सैनिक कक्षाची सहमती घेऊन महसूल विभागाकडे तसा प्रस्ताव दाखल करण्यात येईल.

## जलदगती न्यायालयांना मुदतवाढ

पुणे येथे चार अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यास त्याच प्रमाणे २३ जलदगती न्यायालयांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुणे येथे पाच कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत. या न्यायालयांमधून ९०६५ प्रकरणे प्रलंबित आहेत. पुणे महापालिकेत नव्याने ३४ गावांचा समावेश झाल्याने न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांत २५२० एवढी वार्षिक वाढ झाली आहे. या बाबी विचारात घेऊन ही अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यास आणि ५२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली, यासाठी ४ कोटी ७२ लाख खर्च येईल.

राज्यात सध्या कार्यान्वित १६ अतिरिक्त न्यायालयांना व २३ जलदगती न्यायालयांना त्यांचा कालावधी संपल्यामुळे २ वर्षे आणखी मुदतवाढ देण्याचा निर्णयही आज घेण्यात आला. १४ व्या वित्त आयोगांतर्गत



ही जलदगती न्यायालये व अतिरिक्त न्यायालये स्थापन करण्यात आली होती. जलदगती न्यायालयांमार्फत खून, बलात्कार, दरोडा, हुंडाबळी, अपहरण, अनैतिक मानवी वाहतूक, त्याचप्रमाणे वरिष्ठ नागरिक, महिला, बालके, दिव्यांग वगैरेंची दिवाणीप्रमाणे, भूसंपादन, संपत्तीचा वाद अशी प्रलंबित प्रकरणे चालवण्यात येतात, तर अतिरिक्त न्यायालयांमध्ये मोटार वाहन

चलान, विमा दावे, चेक बाऊन्सिंग ही प्रकरणे चालवली जातात.

सध्या जलदगती न्यायालयात ३५,६८८ प्रकरणे, तर अतिरिक्त न्यायालयात २३,०१० प्रकरणे प्रलंबित आहेत.

## अपर जिल्हाधिकारी कार्यालये

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तसेच अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

या दोन्ही कार्यालयांसाठी प्रत्येकी सहा पदे निर्माण करण्यात येतील. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, सिंदेवाही, नागभीड, ब्रम्हपुरी हे तालुके चंद्रपूरपासून दूर अंतरावर आहेत. त्याचप्रमाणे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा हरितपट्टादेखील असल्यामुळे चंद्रपूर जिल्हा दोन भागात विभागला गेला आहे. यामुळे जनतेची शासकीय कामासाठी पायपीट होते. तसेच विकास कामांनाही विलंब होतो. त्यामुळे चिमूर येथे हे कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.



अहमदनगर हा जिल्हा राज्यातला क्षेत्रफळाने सगळ्यात मोठा जिल्हा असून नागरिकांना महसूलशी संबंधित सर्व कामांकरिता जिल्हा मुख्यालयी जावे लागते. त्यामुळे शिर्डी येथे देखील अपर जिल्हाधिकारी कार्यालयाचा निर्णय घेण्यात आला.

## निर्वाह भत्यात सुधारणा

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्यात केंद्राप्रमाणे सुधारणा करण्याचा तसेच त्याचा लाभ सर्व अभिमत विद्यापीठे, खासगी महाविद्यालयांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचना केंद्राने दिल्या असून त्यादेखील राज्यात लागू करण्यात येतील.



अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना उच्च शिक्षण घेणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्च विद्याविभूषित होणे, हा उद्देश ठेवून अनुसूचित जाती (नवबौद्धांसह) विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना १९५९-६० पासून राज्य शासनामार्फत राबवण्यात येत आहे. मार्च २०२१ पासून या योजनेंतर्गत २०२०-२१ ते २०२५-२६ या वर्षांकरिता दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यात येतील.

निर्वाह भत्यात सुधारणा करण्यात आली असून, यासाठी ६ कोटी ५० लाख इतक्या वाढीव खर्चासदेखील मान्यता देण्यात आली. ही योजना केंद्र आणि राज्यामध्ये ६०:४० अशी राबवण्यात येते. सुधारित निर्वाह भत्याचे दर पुढीलप्रमाणे आहेत :-

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गटांप्रमाणे ४ हजार रुपये ते १३ हजार ५०० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गटांप्रमाणे २ हजार ५०० ते ७ हजार रुपये असे सुधारित दर असतील. शिष्यवृत्तीचा लाभ थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होईल.

## विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीत वाढ

पाचवी, आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा योजनेत आता पाचवीसाठी ५ हजार रुपये प्रति वर्ष आणि आठवीसाठी ७ हजार ५०० प्रति वर्ष अशी शिष्यवृत्ती राहील. ही शिष्यवृत्ती २०२३-२४ पासून लागू राहील. संच एच आणि संच आय करिता २० हजारपेक्षा कमी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे. पाचवीनंतर ३ वर्षांकरिता आणि आठवीनंतर २ वर्षांकरिता शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र गेल्या १३ वर्षांत यात वाढ झाली नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे पाचवीच्या विद्यार्थ्यांस दर महिन्याला ५०० रुपये आणि आठवीच्या विद्यार्थ्यांस दर महिन्याला ७५० अशी शिष्यवृत्ती मिळेल. ही शिष्यवृत्ती १० महिन्यांसाठी असते.

सध्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीकरिता किमान २५० रुपये ते कमाल १,००० रुपये प्रति वर्ष, तर माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी किमान ३०० ते कमाल १,५०० प्रति वर्ष एवढी संचनिहाय शिष्यवृत्ती देण्यात येते.

## शहरांतील प्राधिकरणांना मुदतवाढ

प्रारूप विकास योजनांसाठी प्राधिकरणांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम २६ (१) मध्ये महानगरपालिका किंवा नियोजन प्राधिकरण, असा मजकूर टाकण्यात येईल व अध्यादेश प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सध्या पुणे महानगर प्रदेशाची विकास योजना तयार करण्याची कार्यवाही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सुरू आहे. महानगर प्रदेशाची लोकसंख्या १७ लाख १२ हजार असून ६ हजार ९०० चौ. कि.मी. क्षेत्र आहे. इतर नगर परिषदांप्रमाणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रारूप विकास योजनेस मुदतवाढ देण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी अपुरा पडतो. राज्यातील नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर या शहरांकरिता देखील विकास प्राधिकरणे असून महानगरांची विकास योजना तयार करताना त्यांना देखील कालावधी कमी पडू शकतो, ही बाब विचारात घेऊन विकास योजना तयार करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**– टीम लोकराज्य**

**महाराष्ट्र हे जैवविविधतेने समृद्ध अन् संवर्धनाचा ऐतिहासिक वारसा असलेले राज्य आहे. याच सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या वाघांच्या संवर्धनासाठी राज्यात, मेळघाट, ताडोबा, पेंच, नवेगाव नागझिरा, सह्याद्री आणि बोर असे सहा व्याघ्र प्रकल्प जाहीर करण्यात आलेले आहेत. या वर्षीच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जाहीर केलेल्या व्यवस्थापन मूल्यांकनामध्ये सर्व व्याघ्र प्रकल्पांनी अतिशय चांगले दर्जा प्राप्त केला आहे, तर पेंच व्याघ्र प्रकल्प अतिशय उत्तम दर्जासह देशात ८व्या क्रमांकावर आला आहे. याच पेंचविषयी आपण अधिकची माहिती जाणून घेऊ या.**

# पेंच व्याघ्र प्रकल्प
# पर्यटकांना विशेष पर्वणीच!

**अतुल देवकर**

पेंच व्याघ्र प्रकल्प हा २३ फेब्रुवारी १९९९ रोजी भारतातील २५वा आणि महाराष्ट्रातील तिसरा व्याघ्र प्रकल्प म्हणून अधिसूचित करण्यात आला. पेंच महाराष्ट्राच्या उत्तर-पूर्व भागात नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवणी तालुक्यात आहे. याला लागूनच मध्य प्रदेश राज्यातील पेंच व्याघ्र आहे.

## संवर्धन मूल्य जास्तच

सामरिकदृष्ट्या पेंच व्याघ्र प्रकल्प हे मध्य भारतीय व्याघ्र प्रदेशाच्या मध्यभागी स्थित आहे जे देशाच्या एकूण वाघांच्या संख्येपैकी १/६ योगदान देते. हे क्षेत्र मध्य भारतात आढळणाऱ्या जवळपास सर्व प्रमुख वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजातींसाठी उत्तम निवासस्थान आहे. पेंच मध्य भारतातील इतर प्रमुख व्याघ्र प्रकल्प जसे ताडोबा, मेळघाट, नवेगाव-नागझिरा कान्हा, बांधवगड, सातपुडा यांच्याशी व उमरेड-कऱ्हांडला अभयारण्य आणि ब्रम्हपुरी विभागासारख्या महत्त्वाच्या व्याघ्र धारण क्षेत्राशीदेखील जोडलेले आहे. व्याघ्र विचरण मार्गाने जोडले गेलेले आहे. त्यामुळे याचे संवर्धनमूल्य निश्चितच जास्त आहे!

## बांबू मुबलक प्रमाणात

चॅम्पियन आणि सेठ वर्गीकरणानुसार प्रमुख वन प्रकार शुष्क पानझडी असल्याने उन्हाळ्यात झाडांची पानगळ आढळते. काही भागात काटेरी झाडेही आढळतात. येथे चांगल्या दर्जाचे जंगल पेंच नदी खोऱ्यांमधील खोल, ओलसर मातीत आणि नाल्याच्या बाजूने आढळतात. व्याघ्र प्रकल्पाच्या विविध भागांमध्ये ओलावा असलेली खोल माती उपलब्ध आहे, तेथे बांबू मुबलक प्रमाणात आढळतो. पर्यटकांना पेंचमधील बांबू वनातून फिरणे एक विशेष पर्वणीच आहे!

## लुप्तप्राय प्रजातींचे निवासस्थान

पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये ७२ सस्तन प्राण्यांच्या प्रजाती, स्थलांतरित पाणपक्ष्यांसह पक्ष्यांच्या ३१० हून अधिक प्रजाती, सरीसृप वर्गातील प्राण्यांच्या सुमारे ४८ प्रजाती आणि उभयचरांच्या अनेक प्रजातींसह अनेक लुप्तप्राय प्रजातींचे निवासस्थान आहे. हे पेंच पक्ष्यांच्या आढळासाठी प्रसिद्ध आहे.



वाघ आणि बिबट्यासारखे मोठे मांसाहारी आणि रानकुत्रे, लांडगा, कोल्हा, रानमांजर यांसारखे लहान मांसाहारी आणि अस्वलांची चांगली संख्या पेंचमधून नोंदवली जात आहे. महत्त्वाच्या शाकाहारी प्राण्यांमध्ये चीतळ, सांबर, नीलगाय, चौसिंगा, भेकर, रानडुक्कर आणि रानगवा यांचा समावेश होतो. इतर प्राण्यांमध्ये खवल्या मांजर, चांदी अस्वल, साळिंदर, उदमांजर आणि मुंगूस प्रजाती इत्यादींचा समावेश आहे. या परिसरातून १२५ हून अधिक प्रजातींची फुलपाखरे अन् ४४ प्रजातींचे पतंग आढळून आले आहेत आणि मोठ्या संख्येने इतर कीटक, मासे, साप इ. आहेत.












## जनजीवन जंगलांवर अवलंबून

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात ४४ गावे आहेत. येथील एकूण लोकसंख्या ८० हजार आणि जनावरांची संख्या अंदाजे २० हजार आहे. बफर क्षेत्रात प्रामुख्याने गोंड, हलबा, गोवारी, गवळी, कुणबी, धिवर इत्यादी समुदाय आहेत. येथील स्थानिक शेती, वनीकरणाचे काम आणि अकाष्ठ वनोपजांच्या संकलनावर अवलंबून आहेत. पेंच परिसरात मेघदूत (तोतलाडोह), नवेगाव खैरी आणि बावनथडी हे ३ मोठे जलाशय आणि अनेक गाव तलाव असल्याने मासेमारी ही एक प्रमुख उपजीविका आहे. बफर झोनमधील गावे त्यांच्या दैनंदिन गरजेसाठी वनसंपदेवर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाचा थेट परिणाम जंगलांवर होतो, कारण इमारती लाकूड,

जळाऊ लाकूड, बांबू आणि गवत यांचा नेहमीचा वापर! घर, गोठे बांधण्यासाठी आणि शेतीची अवजारे तयार करण्यासाठी जंगलांवर अवलंबून असतात. त्यांना चारा, फुले आणि फळे आणि इतर अकाष्ठ वन उत्पादनांची देखील आवश्यकता असते. मोह, डिंक, मध, तेंदूपत्ता, औषधी वनस्पती, वन्य भाज्या आदींच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाच्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत ग्राम परिसर विकास समिती गठित करून गावातील युवक, महिला अन् शेतकऱ्यांसाठी विविध कौशल्य विकास व रोजगार निर्मितीबाबत प्रकल्प राबवले जातात. स्थानिकांच्या सहकार्यातून व्याघ्र संवर्धनासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## कार्बन क्रेडिट पहिलाच प्रयोग

पेंच व्याघ्र प्रकल्पात व्यवस्थापकीय दृष्टीने अधिवास विकास व संरक्षणविषयक कामे केली जात आहेत. यात केंद्र शासन पुरस्कृत National Adaptation Fund for Climate change अंतर्गत तोतलाडोह वसाहतीचे पूनर्वनिकरण (Eco-Restoration) हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर गौरवला जात आहे. यात व्याघ्र अधिवासात विना वापर असलेल्या ५८ इमारती पाडून तेथे अटल घन वन वनीकरण आणि कुरण विकसित करण्यात आले आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच हवामान बदलाचा होणारा परिणाम आणि त्यावरील उपाययोजना याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. याच प्रकल्पाला जोडून व्याघ्र प्रकल्पातील व्यवस्थापनामुळे हवेतील प्रदूषणकारी कार्बन वायू शोषून घेण्यामुळे तयार होणारे कार्बन क्रेडिट विकून मिळणारा निधी स्थानिक गावात वितरित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात येत आहे. हा अशा प्रकारचा भारताच्या व्याघ्र प्रकल्पातील पहिलाच प्रयोग आहे!

## युवकांना आदरातिथ्य प्रशिक्षण

स्थानिकांना व्याघ्र अधिवसामुळे रोजगार उपलब्धता कमी होत आहेत, अशी भावना निर्माण होत असते. यावर उपाययोजना म्हणून प्रथम अरोरा सेंटर फॉर एज्युकेशन या संस्थेसोबत करार करून पेंच आदरातिथ्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. यात वनाशेजारील गावात राहणाऱ्या युवकांना २ महिन्याचे नॅशनल स्किल डेव्हलपमेंट प्रमाणपत्र प्रमाणित आदरातिथ्य प्रशिक्षण देण्यात येते. याचा संपूर्ण खर्च हा व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत करण्यात येतो. आजतागायत या केंद्रातून १५०० हून अधिक युवक-युवतींनी प्रशिक्षण घेतले असून ९०% हून अधिक जणांना रोजगार मिळाला आहे! यामुळे स्थानिक लोकांकडून व्याघ्र संवर्धनात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षापासून इतर राज्यातीलही युवक प्रशिक्षणासाठी येत आहेत.

## प्रतिसाद दल

पेंच क्षेत्रात मानव वन्यजीव संघर्षाच्या घटना इतर क्षेत्रापेक्षा तुलनेने कमी आहेत. मात्र वाघांची वाढलेली संख्या पाहता या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनासाठी पेंचने त्रिस्तरीय कार्यक्रम राबवला आहे. यात गावस्तरावर प्राथमिक प्रतिसाद दल, वन परिक्षेत्र स्तरावर जलद प्रतिसाद दल आणि विभाग स्तरावर जलद बचाव दल अशी रचना ठेवली आहे. गाव स्तरावरील दलामुळे गावातील घटना तत्काळ निदर्शनास येऊन अतिशय कमी वेळेत त्याला प्रतिसाद देण्यात येतो. त्यामुळे गावकरी व वन विभाग यांच्यात सहकार्याची भावना राहून संघर्ष टाळला जातो. याचा अतिशय सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.



## पर्यटनातून महसूल

पेंच व्याघ्र प्रकल्पात सुरू असलेल्या विविध अधिवास व्यवस्थापनामुळे सन २००८ मध्ये असलेली ९ इतकी वाघांची संख्या सध्या जवळपास ५० इतकी वाढली आहे. यात एकूण क्षेत्रफळ तिप्पट वाढले असले तरी संख्येत झालेली वाढ पाचपट इतकी आहे. याचा फायदा पर्यटन वाढीस झाला असून मागील काही वर्षात कोविडचा कालावधी वगळता वार्षिक अंदाजे २.५ कोटी रुपये महसूल पर्यटनातून मिळत आहे. देशातूनच नव्हे, तर विदेशातूनही पर्यटक पेंचला भेट देण्यास येत आहे. यात सिल्लारी व खुर्सापार ही पर्यटकांकडून विशेष आवड असलेली गेट म्हणून पुढे येत आहेत. पर्यटनातून मिळणारा निधी पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत स्थानिकांच्या व जंगलाच्या विविध विकास कामात वापरण्यात येत आहे. यात जिप्सी चालक व पर्यटक मार्गदर्शक यांना चांगला रोजगार उपलब्ध होत आहे. तसेच इतरांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होत आहेत.

पेंच व्याघ्र प्रकल्पात कर्तव्य बजावणारे सर्व स्थानिक, क्षेत्रीय वन कर्मचारी, अधिकारी यांच्यातील समन्वय, नियोजन व व्यवस्थापकीय कौशल्य, नावीन्यपूर्ण प्रकल्प यामुळे व्याघ्र प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर नावारूपास येत आहे. जागतिक व्याघ्र परिषदेकडून २०२२ मध्ये महाराष्ट्रात प्रथमच पेंचला CATS ( Conservation Assured / Tiger Standards) मानांकन जाहीर केले! तसेच व्याघ्र संख्येत दुपटीहून अधिक वाढ केल्याने WWF यांचेकडून Tx2 पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. NAFCC अंतर्गत प्रकल्पाला पर्यावरण क्षेत्रातील SKOCH चा सुवर्ण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

स्थानिक जनतेच्या सहकार्यातून, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या अथक मेहनतीमुळे अन् शासनाच्या पुढाकाराने पेंच व्याघ्र प्रकल्प भविष्यात राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट व्याघ्र प्रकल्प ठरेल, यात शंका नाही.

**(लेखक हे पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर येथे साहाय्यक वन संरक्षक म्हणून कार्यरत आहेत.)**

**राज्य शासनाने प्रवाशांच्या सुविधेसाठी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पायाभूत सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. तसेच एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठीही निर्णय घेण्यात येत आहेत. प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी एसटीचे आधुनिकीकरण करून या लोकवाहिनीला सक्षम करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. एसटीला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.**

# लोकवाहिनी सक्षम

**निलेश तायडे**

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे एसटीचे ब्रीदवाक्य...! त्याप्रमाणे समाजातील विविध घटकांना एसटीच्या प्रवासामध्ये अनेक सवलती दिल्या जात आहेत. १ जून १९४८ रोजी पुणे-नगर मार्गावर पहिली बस धावली. यापूर्वी तत्कालीन मुंबईत खासगी वाहतूक अस्तित्वात होती. सदरचे वाहतूकदार हे नफा असलेल्या मार्गावरच वाहतूक करत असल्याने शासनाला वाहतूक सेवेची पुन:स्थापना करणे गरजेचे वाटले. तेव्हापासून आजपर्यंत एसटीचा प्रवास महाराष्ट्रात सुरू आहे.

## एसटीने गावागावांना जोडले

अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत राज्यातील ३८ हजार खेड्यांना एसटीने जोडले असून ९७ टक्के जनतेपर्यंत एसटी पोहोचली आहे. एसटीकडे १६,५०० बसेस असून २५० आगार आणि ५८० बसस्थानके आहेत. एसटीतर्फे रोज ५३ लाख प्रवाशांची ने-आण होते. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाचा लाभ देण्यात येत आहे, तर महिला सन्मान योजनेंतर्गत सर्व प्रकारच्या बसमध्ये ५० टक्के तिकीटदरात सवलत देण्यात येत आहे. तसेच अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजनेंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना घरापासून शाळेपर्यंत मोफत प्रवासाची सवलत देण्यात आली आहे.




## लोकाभिमुख सेवा

एसटीचे अमृतमहोत्सवी वर्ष व देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्ष हा दुग्ध-शर्करा योग आहे. एसटीचा ७५ वर्षांचा प्रदीर्घ प्रवास झाला असून ही महाराष्ट्राची लोकवाहिनी आहे. एसटी महामंडळाचे 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याप्रमाणे काम होत आहे. गुणवत्तापूर्वक व लोकाभिमुख एसटीची सेवा देण्यावर शासनाचा भर आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास व महिलांना ५० टक्के प्रवास सवलत अशा योजनांना प्रवाशांनी उदंड प्रतिसाद दिला.

## महिला सन्मान योजना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांना सन्मान देऊन एसटी बसमधून प्रवास सवलत देण्याचा निर्णय घेतला. राज्याच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बस तिकीटदरात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत केली. त्यानुसार १७ मार्च २०२३ पासून महिला सन्मान योजना या नावाने ही योजना सुरू करण्यात आली. यामध्ये लालपरी म्हणजेच साध्या बसपासून ते नव्याने सुरू झालेल्या इ-शिवनेरीपर्यंत महिलांना प्रवासात सवलत देण्यात आली आहे.

## महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अर्ध्या तिकिटात एसटीचा प्रवास करता येत असल्याने महिला, शाळकरी व महाविद्यालयीन मुली, शेतमजूर महिला छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्या महिला, भाजी




विक्री करणाऱ्या महिला, शासकीय आणि निमशासकीय नोकरी करणाऱ्या महिला, रोजगाराकरिता बाहेर पडणाऱ्या महिला, माहेरी जाणाऱ्या ग्रामीण भागातील महिला, धार्मिक पर्यटन स्थळांना भेटणे, औषध उपचारासाठी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाणे, नातेवाईकांना भेटी देणे अशा विविध कारणांसाठी महिलांचा दररोज प्रवास सुरू झाला आहे.

प्रवास स्वस्त झाल्याने महिला या योजनेला चांगला प्रतिसाद देत आहेत. एसटी प्रवाससुद्धा सुलभरीत्या होत आहे. त्यामुळे महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तसेच खासगी वाहनाऐवजी एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांच्या संख्येत बऱ्याच प्रमाणात वाढ झाली आहे. ही सवलत मिळाल्यामुळे महिला आनंदी तर आहेतच शिवाय एसटीने प्रवास अधिक प्रमाणात करू लागल्या आहेत.

यापूर्वी अनेक मार्गांवर एसटी बसेस विनाप्रवासी दिसायच्या. त्या आता भरगच्च भरून चालल्या असतानाचे चित्र सर्वत्र दिसत आहे. याचा एसटी महामंडळाला फायदा होत आहे. दिवसेंदिवस महिला प्रवाशांबरोबरच त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यदेखील एसटीने प्रवास करू लागल्यामुळे एसटीच्या अनेक फेऱ्या हाऊसफुल होत आहेत. या योजनेच्या माध्यमातून दररोज सरासरी ५५ लाख महिला ५० टक्के तिकीटदरात प्रवास करत आहेत.

आतापर्यंत करोडो महिला प्रवाशांनी ५० टक्के प्रवासी तिकीट सवलत घेऊन प्रवास केला आहे. या योजनेमुळे दैनंदिन प्रवासी संख्येतसुद्धा जवळपास १० टक्के वाढ झाली आहे. महिला सन्मान योजनेमुळे आतापर्यंत महिलांची तिकीटदरातील बचत ३०० कोटी रुपये झाली आहे. या योजनेची प्रतिपूर्ती रक्कम शासनाकडून महामंडळाला दिली जाणार आहे.

अगदी पहिल्या दिवसापासून महिलांनी या योजनेला अतिशय चांगला प्रतिसाद दिला आहे. स्वस्त, सुरक्षित आणि सन्मानजनक प्रवासाचा नवा पर्याय महिलांना एसटीच्या रूपाने प्राप्त झाला आहे. राज्य सरकारने हा क्रांतिकारी निर्णय घेऊन 'प्रवासी देवो भव...' ही भावना जोपासली आणि महिलांचा सन्मान वाढवला आहे. सवलत योजनेसोबतच अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या सुमारे १८ लाख विद्यार्थिनींना त्यांच्या घरापासून शाळेपर्यंत सुरक्षित आणि मोफत प्रवास एसटी घडवते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा मुख्य आधार एसटीच आहे.

## बसपोर्टसाठी निधी

एसटीच्या अमृतमहोत्सवी वर्षात राज्यातील एसटी बसस्थानकांमध्ये कॉँक्रिटीकरण पूर्ण करून बसपोर्ट ही संकल्पना राबवण्यात येत आहे. त्यासाठी ५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात २५० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल. एसटीच्या जमिनीचे मूल्यवर्धन करून त्यावर महामंडळातर्फे उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यात येत आहे.

## मराठी चित्रपटांसाठी मिनी थिएटर

एसटीचा चेहरा-मोहरा बदलून टाकण्याचे काम शासन करत आहे. नवीन इलेक्ट्रिक बसेस, वातानुकूलित बसेस महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात येत आहे. महामंडळाच्या ताफ्यात लवकरच ७ हजार बसेस येणार आहेत. तसेच बसस्थानकांवर जमीन उपलब्धतेनुसार मराठी चित्रपटांसाठी मिनी थिएटर ही नवीन संकल्पना राबवण्यात येणार आहे.

## चालकांना प्रेरणा

एसटीमध्ये २५ वर्ष सतत विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांचा सत्कार करण्यात येतो. जेणेकरून अन्य चालकांनाही प्रेरणा मिळून ते आपली एसटी स्वत:ची गाडी असल्यासारखी चालवतील. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील विभाग, आागारे यांनाही पुरस्कार देण्यात येतो. अशाप्रकारे एसटी केवळ प्रवासाचे साधन नसून महाराष्ट्रातील जनतेची लोकवाहिनी आहे, यात शंकाच नाही.

## अमृतमहोत्सवी वर्धापन दिन सोहळा संपन्न

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) अमृतमहोत्सवी वर्धापन दिन सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे नुकताच साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार भरत गोगावले, 'एसटी'चे सदिच्छादूत, अभिनेते मकरंद अनासपुरे, परिवहन व बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, 'एसटी'चे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, परिवहन आयुक्त श्री. विवेक भिमनवार आदी उपस्थित होते.

'अमृतमहोत्सव महाराष्ट्राच्या लोकवाहिनीचा' कॉफी टेबल बुकचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच २५ वर्ष सतत विना अपघात सेवा देणाऱ्या पाच चालकांचा सत्कार करण्यात आला.

विभागीय संपर्क अधिकारी

**शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आणि सेवांचा लाभ सर्वसामान्य जनतेला देण्यासाठी राज्यात सध्या ‘शासन आपल्या दारी’ अभियान सुरू आहे. १४ मे २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे शुभारंभ झालेल्या या अभियानामुळे आजपर्यंत राज्यातील सुमारे ३५ लाख लाभार्थ्यांना विविध लाभ मिळाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले ‘शासन आपल्या दारी’ अभियान आता गतिमान शासनाचा महत्त्वाचा भाग बनले आहे. लाभार्थ्यांनी शासनाकडे येण्याऐवजी आता शासनच जनतेच्या दारात पोहोचले आहे. पाटणनंतर रत्नागिरी, कन्नड, कुडाळ, कोल्हापूर, पालघर, नांदेड, जळगाव येथे आयोजित कार्यक्रमांना जनतेचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि गरजू, सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान अभियानाच्या यशस्वितेची प्रचिती देते.**

# शासन आपल्या दारी !

**किशोर गांगुर्डे**

शासन ही लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून राज्यातील जनतेच्या आर्थिक, सामाजिक कल्याण आणि सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. त्या अनुषंगाने शासन सर्वसामान्यांच्या हितासाठी विविध लोकाभिमुख योजना, कार्यक्रम, उपक्रम, प्रकल्प राबवत असते. मात्र शासकीय योजनांचा लाभ घ्यायचा, तर लाभार्थ्यांना शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन माहिती घेणे, अर्ज, कागदपत्रे जमा करणे, त्याचा पाठपुरावा करणे, त्याशिवाय वेगवेगळ्या योजनांसाठी त्या-त्या विभागांच्या विविध ठिकाणी असलेल्या कार्यालयांमध्ये जाणे, पुन:पुन्हा अर्ज करणे, कागदपत्रे देणे, दिलेल्या कागदपत्रांमधील त्रुटी दूर करण्यासाठी वारंवार चकरा माराव्या लागतात, ही प्रक्रिया टाळून शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा विचार पुढे आला.




पालघर येथे ‘शासन आपल्या दारी’ अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.

## महासंकल्प

लोककल्याणाचे ध्येय ठेवून शेवटच्या गरजू लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजना सहज, सुलभपणे (Ease of Access to Government Schemes) पोहोचवण्याचा निर्धार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. या निर्धाराला निमित्त लाभले स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे! त्यातून प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याचा ‘महासंकल्प’ सरकारने केला आणि राज्यात ‘शासन आपल्या दारी’ अभियानाची मुहूर्तमेढ रोवली गेली. सुरुवातीला ‘शासकीय योजनांची जत्रा : योजना कल्याणकारी, सर्वसामान्यांच्या दारी’ अशी संकल्पना असलेले हे अभियान ‘शासन आपल्या दारी’मध्ये रूपांतरित झाले आणि विकासाच्या योजनांच्या लाभाचा, वेगवान अंमलबजावणीचा एक नवा अध्याय महाराष्ट्रात सुरू झाला.

## विशेष कार्यक्रमांचे आयोजन

जलद गतीने (कमी वेळेत), कमी कागदपत्रे आणि शासकीय निर्धारित शुल्कात योजनांचा लाभ देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ‘शासन आपल्या दारी’ हे अभियान राबवण्यात येत आहे.

पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यातून शासकीय योजनांची गतिमान अंमलबजावणी तर होतच आहे, शिवाय सरकार आणि प्रशासन यांच्याबद्दल विश्वासवृद्धी होते आहे. सरकार थेट सर्वसामान्यांच्या दारी पोहोचल्याने ‘गरज तिथे मदत’ या उक्तीप्रमाणे गरजूंना मदत होत आहे.

शासनाच्या सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी एकाच छताखाली, एकाच ठिकाणी पूर्ण वेळ उपस्थित राहून लाभार्थ्यांना फक्त शासकीय योजनांचा लाभ

मिळवून देत आहेत, आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून देण्यासह गरजूला त्याच्या गरजांशी निगडित योजनांची माहिती देऊन त्या योजनांचा लाभ मिळण्यासाठीची प्रक्रिया केली जात आहे.

### अभियानाचे स्वरूप

'शासन आपल्या दारी' अभियानातून प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष कार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यात विविध शासकीय विभागातील योजना, रोजगार मेळावे, आरोग्य शिबिरे, रक्तदान व अवयवदान शिबिरे, चष्मे, दिव्यांगांना साहित्य वाटप, शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के विद्यार्थ्यांना शाळा प्रवेश, कृषी प्रदर्शन, महिलांना सखी कीटचे वाटप, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन, शेतकरी ते ग्राहक थेट बाजार आणि बचतगटांचे स्टॉल्स, विविध सरकारी विभाग आणि महामंडळांच्या योजनांची माहिती देणारे स्टॉल्स, सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) अंतर्गत गरजूंना वैयक्तिक लाभ, नवमतदार नोंदणी आदि कार्यक्रमांचा समावेश आहे.

### गरजूंना मिळतो आहे 'या' योजनांचा लाभ

या अभियानातून महाडीबीटी-कृषी यांत्रिकीकरण योजना, विविध महामंडळांच्या योजना, इ-श्रम कार्ड, स्वनिधी योजना, इमारत बांधकाम कामगारांसाठीच्या योजना, शिधापत्रिका, आयुष्यमान कार्ड, संजय गांधी व श्रावणबाळ योजना, ज्येष्ठ नागरिक कार्ड, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, जन्म, मृत्यू दाखले, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, बचतगट योजना, गायी, म्हशी आणि शेळी-मेंढी वाटप, सीमांत शेतकरी गट बांधणी- प्रतिगाव एक

### लाख मोलाच्या मदतीबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार



कागल तालुक्यातील सादीक गुलाब मकुभाई यांच्या नवजात कन्येला मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून वैद्यकीय उपचारांसाठी लाखमोलाची मदत केल्याबद्दल या कुटुंबाने मुख्यमंत्री शिंदे यांना आभारपत्र देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री. व सौ. मकुभाई या नवदाम्पत्याकडून आभारपत्र स्वीकारले, आणि चिमुकलीला हातात ही घेतले. कौतुकाने या चिमुकलीला न्याहाळत शेजारी असलेल्या मंत्री चंद्रकांत पाटील यांना बाळाला दाखवले. मुख्यमंत्र्यांनी या दाम्पत्याला 'मुलीचे नाव काय ठेवले आहे?' या प्रश्नाला अतिशय भावनिक उत्तर देताना 'तुमची आमच्या कुटुंबावर दुवा आहे; म्हणून आमच्या मुलीचे नाव आम्ही 'दुवा'च ठेवणार आहोत,' असे उत्तर चिमुकलीच्या आईने दिले.




### एक दृष्टिक्षेप

- समाजातील सर्व तळागाळातील घटकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी अभियान सुरू.
- भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रत्येक जिल्ह्यातून सुमारे ७५ हजार नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवण्याचा प्रयत्न.
- या अभियानांतर्गत नागरिकांना एकाच छताखाली शासकीय योजनांचा, सेवांचा लाभ मिळत आहे.
- योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक विविध कागदपत्रांची केली जाते पूर्तता.
- समन्वयासाठी राज्य, जिल्हा, तालुकास्तरावर जनकल्याण कक्ष स्थापन.
- कमीत कमी कालावधीत, कमी कागदपत्रांमध्ये विविध योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित.
- नागरिकांना योजनांची अधिकृत माहिती देण्याबरोबरच लाभासाठी संपूर्ण प्रक्रिया करून घेणार.
- सुमारे ५ हजार ४५७ कोटी निधीच्या वस्तू, साहित्य, यंत्रसामग्री, कृषी उपयोगी उपकरणांचे या अभियानाद्वारे होणार वाटप.
- या अभियानाच्या यशासाठी १६ हजार योजनादूत नेमणार.
- 'शासन आपल्या दारी'सोबतच रोजगार मेळावे, आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, प्रदर्शन, दिव्यांगांना साहित्य वाटप आदी विविध उपक्रमांचे आयोजन.

## लोकाभिमुख कारभाराचा नवा चेहरा

देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी राज्यात 'शासन आपल्या दारी' या अनोख्या अभियानाचा पाटण (जि. सातारा) येथे शुभारंभ झाला, अल्पावधीत हे अभियान लोकप्रिय झाले आहे, ३१ मे पर्यंत ३० लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांना या अभियानातून लाभ मिळाला आहे. हे जनतेचे सरकार आहे, जनतेच्या दारात जाऊन आम्ही काम करतो आहे, कामांना गती देतो आहे. एकाचवेळी एका छताखाली शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी काना-कोपऱ्यातून लोक येताहेत.. ना प्रवास, ना कागदपत्रांचा नाहक त्रास आणि काम मात्र होणार हमखास असा हा उपक्रम आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या समाजकारणाचा वारसा लाभला आहे, शिवाय लोकांची कामे होत नसतील, तर त्या सत्तेला काही अर्थ नसतो. म्हणून आमचे सरकार जनतेची कामे करण्यासाठी थेट त्यांच्यापर्यंत पोहोचले आहे. आपल्याला गावे, खेडी सक्षम करायची आहेत, गावातल्या गावात तरुणांच्या हाताला रोजगार द्यायचा आहे, सरकार त्या दिशेने प्रयत्न करत आहे. आम्ही जनतेला उत्तरदायी आहोत, त्यामुळे लोकांमध्ये जाऊन आम्ही हे अभियान सुरू केले. या ११ महिन्यांत आम्ही ३६ मंत्रिमंडळाच्या बैठका आणि त्यातून ३३० पेक्षा अधिक निर्णय घेतले आहेत. या व्यतिरिक्त ज्या बैठका आम्ही घेतो, त्यातून दोनशे-अडीचशे निर्णय आम्ही घेतले आहेत. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, मागासवर्गीय, अशा सर्वच घटकांसाठीचे हे निर्णय आहेत.

प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार, प्रत्येक तालुक्यात १५ हजार आणि गावात किमान १०० लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळालाच पाहिजे या दृष्टीने हे अभियान राबवत आहोत. या अभियानाने राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. अधिकारी-कर्मचारी झपाटून कामाला लागले आहेत, वेळ, काळ, स्थळ न बघता शासकीय यंत्रणा काम करत आहे, दुर्गम भागातील वाड्या-पाड्यांवर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शासकीय अधिकारी पोहोचले आहेत, जनतेशी सुसंवाद सुरू झाला आहे, या संवादातून शासन जनतेच्या दारी पोहोचले आहे आणि जनतेला शासनाच्या योजनांचा लाभ मिळतो आहे. गडचिरोलीसारख्या आदिवासी, दुर्गम भागात शासकीय यंत्रणा झपाटून काम करत आहे. स्वयंसेवकांची सोबत आणि शासनाचे मार्गदर्शन यातून एकट्या गडचिरोली जिल्ह्यात सुमारे ४ लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यात प्रशासन यशस्वी झाले आहे.

'शासन आपल्या दारी' हे कागदावरचे अभियान नाही, तर प्रत्यक्ष लोकांपर्यंत जाऊन हे अभियान राबवले जात आहे. मुख्यमंत्री सचिवालयाने यावर विशेष लक्ष ठेवले आहे. मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आम्ही सातत्याने या अभियानाचा आढावा घेत आहोत. जिथे काही अडचणी असतील, त्या सोडवून लोकांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचवतो आहोत. या अभियानासाठी खासगी सचिव डॉ. अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेला जनकल्याण कक्ष प्रत्येक जिल्ह्यांमध्ये या अभियानाला कोणतीही अडचण भासू नये, यासाठी समन्वयाची महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. लाभार्थ्यांशी थेट दूरध्वनीद्वारे संवाद साधला जात आहे. इतके नियोजनबद्धरितीने हे अभियान राबवण्यात येत आहे.

३० ऑगस्टपर्यंत किमान ७५ लाख लाभार्थ्यांना लाभ मिळवून



देण्याचा आमचा संकल्प आहे आणि हा संकल्प नक्कीच पूर्ण होईल; किंबहुना संकल्पापेक्षा अधिक लाभार्थ्यांपर्यंत हे सरकार पोहोचेल. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, खान्देश, विदर्भाबरोबरच राज्यातच नव्हे, तर देशात हे क्रांतिकारी अभियान ठरेल, अशी मला खात्री आहे. आपला उद्देश प्रामाणिक असला म्हणजे सर्व बाजूने लोक त्यासोबत जोडले जातात. त्यामुळे 'शासन आपल्या दारी' अभियानदेखील विक्रमी ठरेल आणि महाराष्ट्राचे उदाहरण देशासमोर राहील. महाराष्ट्राच्या सुशासनाचा आणि गतिमान लोकाभिमुख कारभाराचा नवा चेहरा असलेल्या 'शासन आपल्या दारी' अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन मी या निमित्ताने करतो.

**- एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



## सर्वसामान्यांच्या जीवनात गुणात्मक बदल घडवणारे अभियान

सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात गुणात्मक बदल घडावे, यासाठी राज्य शासन प्राधान्याने काम करत आहे. राज्य शासन राबवत असलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत विनासायास पोहोचावा, यासाठी 'शासन आपल्या दारी' हे विशेष अभियान राज्यभर राबवले जात आहे. सर्वसामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, लोकप्रतिनिधींचा पुढाकार आणि प्रशासनाचे अथक परिश्रम यामुळे या अभियानाला चळवळीचे रूप प्राप्त झाले आहे.



आमचे सरकार आले, तेव्हा मंत्रालयात आपल्या समस्या घेऊन येणाऱ्यांची दररोज मोठी रांग असायची. कुणाला शेतीसाठी वीज हवी, कुणाला नुकसानभरपाई असे एक ना अनेक प्रश्न! योजना होत्या; पण त्याचा लाभ संबंधितांपर्यंत पोहोचायला विलंब व्हायचा. जनतेने प्रश्न घेऊन सरकारदरबारी जाण्याचे दिवस आता इतिहासजमा झाले आहेत.

आता सरकारने जनतेपर्यंत जायला हवे, हीच खरी लोकशाही. या भावनेतून 'शासन आपल्या दारी' योजना राबवली जात आहे. दूरवरून लोक मुंबईत लहानशा कामासाठी वेळ, पैसा खर्च करून येणे; हे आम्हाला मान्य नाही. अभियानाच्या निमित्ताने जिल्ह्यातील खेडोपाडी व दुर्गम भागात प्रशासनाने जाऊन विविध योजनांचा




लाभ राज्यातील ३५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवला आहे. या अभियानांतर्गत गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात केवळ दोन महिन्यांत एक लाख लाभार्थी झाले. यावरून या अभियानाची व्याप्ती आणि यश लक्षात येते. 'हे सरकार घरी बसणारे नाही, तर सर्वसामान्यांच्या दारी जाऊन त्यांना लाभ मिळवून देणारे सरकार आहे', अशा लाभार्थ्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया शासन व प्रशासनाचा उत्साह वाढवत आहेत.

३० जून २०२२ मध्ये म्हणजे वर्षभरापूर्वी जनतेच्या मनातील सरकार सत्तेवर आले. सर्वसामान्य जनतेने आमच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरेल, असेच निर्णय गेल्या वर्षभरात घेतले गेले. राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांची उभारणी करत असतानाच सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेण्यावर भर देण्यात आला.

महिला, शेतकरी, विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या अनेक योजना त्यांच्या जीवनात गुणात्मक बदल घडवून आणत आहेत. या योजनांचा थेट लाभ त्यांना मिळवून देण्याच्या उद्देशाने 'शासन आपल्या दारी' अभियान मैलाचा दगड ठरत आहेत. हे अभियान लोकप्रिय आणि लोकाभिमुख करण्यासाठी लोकप्रतिनिधी, स्वयंसेवक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले अथक परिश्रम कौतुकास्पद आहेत.

आता शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक लाभार्थ्याला अगदी सहज, सोप्या पद्धतीने विनाअडथळा मिळायला हवा, म्हणून लोकांची गैरसोय टाळणारे हे अभियान जोमाने राबवण्याबरोबरच ते अधिक व्यापक कसे करता येईल, असाच आमचा प्रयत्न असेल. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना एवढेच आवाहन करतो की, आतापर्यंत आपल्याला सरकारी कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागत होत्या. आता 'शासन आपल्या दारी' आले आहे, त्याचा लाभ करून घेत आपण पात्र असणाऱ्या योजनेचा लाभ घेऊन आपला उत्कर्ष साधावा.

- **देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



## सोशल इंजिनीअरिंगचा अनोखा प्रयोग

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'शासन आपल्या दारी' या अभिनव उपक्रमाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, स्वयंसेवक आणि स्थानिक जनतेने एकत्र येऊन या अभियानातून 'सोशल इंजिनीअरिंग'चा अनोखा प्रयोग राज्यात सुरू झाला आहे.



काही महिन्यांपूर्वी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'कल्याण पॅटर्न'चा एक नवा प्रयोग राबवला गेला. केवळ ३० स्वयंसेवक आणि प्रशासनातील विविध विभागांना सोबत घेऊन अवघ्या दोन महिन्यांमध्ये १६ हजार लोकांना लाभ दिला गेला. अशा स्वरूपाचा कार्यक्रम राज्यभरात राबवण्याची संकल्पना त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी मांडली.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी 'कल्याण पॅटर्न'च्या धर्तीवर उपक्रम राबवण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांपासून सर्व विभागांचे सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांची बैठक घेतली, विचारमंथन झाले, त्यातून 'शासन आपल्या दारी' उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाची स्थापना केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'शासन आपल्या दारी' अभियानाची सुरुवात करताना त्यात अनेक घटकांची उत्कृष्ट सांगड घातली आहे. अगदी मंत्रालयीन सचिवांपासून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबरच गावपातळीवरील ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, तलाठी, बँक सखी अशा सगळ्यांना बरोबर घेतले. त्यामुळे लाभार्थ्यांना लाभ देताना प्रशासकीय मान्यता देताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या आहेत. महाराष्ट्रात एका वर्षभरात साडेआठ कोटी लाभार्थ्यांना विविध लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे, म्हणजे तालुकानिहाय २ लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांना लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

'योजनादूत ॲप'मुळे १६ हजारांपेक्षा अधिक स्वयंसेवक शासनाशी जोडले गेले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयातील जनकल्याण कक्षात मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी अमित हुक्केरीकर यांच्यासह आयआयटी, आयआयएम, पीएच.डी.सारखे उच्चशिक्षित अधिकारी, आर्मी, नेव्हीमधील निवृत्त वरिष्ठ अधिकारी या अभियानाच्या यशस्वीतेसाठी अहोरात्र झटत आहेत.

**- डॉ. अमोल शिंदे,** मा. मुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव तथा प्रमुख जनकल्याण कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

गट नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, विवाह नोंदणी, महिलांना शिलाई यंत्रांचे वाटप, विधवा, दिव्यांग आणि दारिद्र्यरेषेखालील गरजूंसाठी विविध योजना, महालॅबअंतर्गत विविध तपासण्या, रोजगार मेळावे, वीज जोडणी, माती परीक्षण, शिकाऊ चालक परवाने, दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप, 'सखी' कीट वाटप, डिजिटल इंडियांतर्गत शासनाच्या डिजिटल सुविधांची माहिती व प्रशिक्षण, कृषी प्रदर्शन, विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप, मनरेगा योजना लाभार्थी, नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लाभार्थ्यांसाठी घरकूल योजना, मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधी, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके वाटप यांसारख्या विविध विभागांच्या लोकहिताच्या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे.

### अभियानातील सहभागी यंत्रणा

स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मुख्यमंत्री सचिवालय, मुख्य सचिव, विविध विभागांचे सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचे अधिकारी, जिल्हास्तरीय वॉर रूम, कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण, शिक्षण, कौशल्य विकास, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, आदिवासी विकास, अल्पसंख्याक विकास, ग्रामविकास असे शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसेवक, तलाठी, रोजगारसेवक, आशा, अंगणवाडी सेविका, नागरिक सेवा केंद्रे, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक असे सर्वच घटक या अभियानात सहभागी झाले.

### जनकल्याण कक्षाची स्थापना

'शासन आपल्या दारी' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी तसेच समन्वयासाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री सचिवालयात खासगी सचिव डॉ. अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जनकल्याण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

त्याशिवाय जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा जनकल्याण कक्ष आणि प्रत्येक विभागप्रमुखांच्या नेतृत्वाखाली विशेष जनकल्याण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

### योजनांच्या लाभासाठी ऑनलाइन अर्ज

'शासन आपल्या दारी' अभियानाचा फायदा अधिकाधिक लोकांना व्हावा म्हणून आता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. 'महालाभार्थी' या पोर्टलवर नोंदणी करून योजनांचा लाभ घेता येईल. जिल्ह्यातील एमएससीआयटी केंद्रे, सीएससी केंद्रे तसेच कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्युटमधून अर्ज भरताना तेथील स्वयंसेवकांची मदत घेता येणार आहे.

### अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

#### पाटण (सातारा)

### अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ

सातारा जिल्ह्यातील दौलतनगर (मरळी) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'शासन आपल्या दारी' अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ झाला. नागरिकांना मोठ्या प्रमाणात शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी हे अभियान अधिक व्यापक करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ

## मुख्यमंत्री जेव्हा ट्रॅक्टर आणि हार्वेस्टर यंत्र चालवतात तेव्हा..



कन्नड येथे कृषी विभागाच्या विविध योजनांतून २५० ट्रॅक्टर्स, १० हार्वेस्टर यंत्रे, ३५ शेती अवजारे, नांगर, रोटावेटर, पेरणी यंत्र तसेच मालवाहतुकीसाठी १० वाहने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वाटप करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी ट्रॅक्टर आणि कम्बाईड हार्वेस्टर यंत्र स्वतः चालवून त्याची चाचणी घेतली. शेती आणि संबंधित उद्योगांमध्ये उत्पन्न वृद्धीसाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्याचे आवाहन करून त्यांनी शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

घेण्यासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते, त्यामुळे अनेकजण योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. या योजना सुलभपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ‘शासन आपल्या दारी’ अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांना याचा लाभ देण्यात येत आहे, गरजूंनी या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. या अभियानाच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील २५,६९९ पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला, तर एक लाख गरजूंना लाभ देण्यात येणार आहे.

### कन्नड

#### दीड लाख लाभार्थ्यांना लाभ

कन्नड येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘शासन आपल्या दारी’ अभियानाचा शुभारंभ झाला. महसूल, कृषी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, वन आदि विभागांच्या विविध योजनांचा सुमारे १ लाख ४९ हजार ५७२ लाभार्थ्यांना ५ हजार ४५७ कोटी रुपयांच्या निधीचे थेट लाभ देण्यात आले. दिव्यांग बांधवांची मोठ्या आस्थेने विचारपूस केली. दिव्यांगांना विविध उपयोगी साहित्याचे वाटप केले.

### रत्नागिरी

#### एक लाख लाभार्थ्यांना लाभ मिळणार

‘शासन आपल्या दारी’ या योजनेच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यातील किमान एक लाख लाभार्थ्यांना शासन योजनेचा लाभ प्रत्यक्ष स्वरूपात देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली.

एमएमआरडीएच्या धर्तीवर कोकण




विकास क्षेत्र प्राधिकरणाच्या माध्यमातून कोकणाचा सर्वांगीण विकास साधण्यात येत आहे.

कोकणात दहा हजार मल्टिनॅशनल कंपन्यांनी नोंदणी केली आहे. यातून राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल. केंद्रशासन यासाठी मदत करत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरच पूर्ण होत आहे. मुंबई-सिंधुदुर्ग महामार्ग तयार होणार आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ वाचेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### कुडाळ (सिंधुदुर्ग)

#### ५० हजार लाभार्थ्यांना लाभ

‘शासन आपल्या दारी’ या कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीने सर्व विक्रम मोडले आहेत. राज्यात क्रांती आणणारा हा कार्यक्रम ठरेल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी कुठेही मागे हटणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

‘माका ही गर्दी बघून खूप आनंद झालो. कसे असात... बरे असात ना...’ अशी मालवणीतून आपल्या भाषणाची सुरुवात करून मुख्यमंत्र्यांनी कुडाळ येथे उपस्थितांची मने जिंकली. सिंधुदुर्गासारख्या छोट्या जिल्ह्यात ५० हजार लाभार्थ्यांना लाभ देण्याची जादू आपण सर्वांनी केली आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी विविध योजनांसाठी ६७९ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. यात प्रामुख्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय इमारत बांधकाम, मौजे मिठबांव-




गजबा देवी मंदिर परिसर, सिंधुरत्न समृद्ध योजना, बॅ. नाथ पै स्मारक यांचा समावेश असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## कोल्हापूर

### उद्दिष्टापेक्षा दुप्पट लाभार्थ्यांना लाभ

'शासन आपल्या दारी' अभियानातून कोल्हापूर जिल्ह्यात ७५ हजार उद्दिष्टांच्या दुपटीपेक्षा अधिक १ लाख ५८ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. कोल्हापूरची जनता विकासाच्या मुद्यांवर आग्रही असते. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाचे सर्व प्रश्न मार्गी लावणार आहोत.

गेल्या ११ महिन्यांत शासनाने विविध विकासकामांसाठी जिल्ह्याला ७६२ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. अनेक वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठ मागणीच्या पूर्ततेसाठी लवकरच मा. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना भेटून विनंती करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. पंचगंगा प्रदूषणमुक्त केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

'लयभारी! कोल्हापूरकरांनो... राम राम, कसे आहात, बरे आहात ना?' अशा अस्सल रांगड्या शब्दात कोल्हापूरकरांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी कोल्हापूरकरांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या जनसमुदायाने गर्दीचा उच्चांक मोडून व्यक्त केलेल्या अलोट प्रेमाबद्दल त्यांनी कोल्हापूर जिल्हावासीयांचे आभार मानले.

## पालघर

### २ लाख १२ हजार लाभार्थ्यांना लाभ

पालघर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'शासन आपल्या दारी' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यामध्ये २ लाख १२ हजार ६८३ लाभार्थ्यांना २१२ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे, ३० हजार निराधार, दिव्यांग, परितक्त्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील ६२५ विद्यार्थ्यांना टॅब देण्यात आले आहेत. राज्यातील ३५ लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना अभियानाच्या माध्यमातून पोहोचवल्या जात आहेत. सामान्य माणसाला योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी हे शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

पालघर जिल्हा पोलिसांनी रोजगार मेळावा घेतला, त्यात दहा हजार तरुणांनी सहभाग नोंदवला. या मेळाव्यातून १ हजार ८५० तरुणांना रोजगार मिळाला आहे. पोलीस दलाने कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पोलीसदलाचे कौतुक केले.

### ...तोपर्यंत हे अभियान सुरू राहणार

या अभियानाच्या माध्यमातून एका छताखाली सर्व योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत किमान ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्याचे निश्चित करण्यात आले होते; परंतु पालघर जिल्ह्याने दोन लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांना लाभ देऊन हे अभियान यशस्वी केले आहे. सर्वसामान्यांसाठी काम करणारे हे सरकार सामान्यांच्या जीवनात गुणात्मक बदलासाठी काम करत आहे. जोपर्यंत योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचणार नाही, तोपर्यंत ही सर्व यंत्रणा कार्यरत राहणार असल्याचेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

एकूणच, 'शासन आपल्या दारी' अभियानाने राज्यात गती घेतली आहे. जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये शासन जनतेच्या दारी पोहोचले आहे. सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना आवश्यक ते सर्व साहाय्य, मार्गदर्शन शासनस्तरावरून मिळत आहे. या अभियानाला मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मुदतवाढ मिळाली असून हे अभियान आता ३० ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. हे अभियान केवळ कागदावरचे नाही, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे, अभियानाला शासकीय जत्रेचे स्वरूप आले आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी, कष्टकरी, कामगार, दिव्यांग यांच्यासह विविध घटकांना मिळणाऱ्या लाभामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची लकेर उमटली आहे, यातून शासन आणि जनता यांच्यातील अंतर दूर झाले आहे.

(संचालक (माहिती) तथा मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.)

# क्षणचित्रे...

*'शासन आपल्या दारी' या अभियानांतर्गत विविध योजनांच्या लाभार्थ्यांना; तसेच विविध प्रमाणपत्रे देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.*













R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ







### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**
संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज